
डिटेक्टीव्ह अल्का
द
मूनलाईट
मर्डर
सौरभ वागळे

# द मूनलाईट मर्डर

हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण हे पुस्तक फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# डिटेक्टिव्ह अल्फा

## द मूनलाईट मर्डर

सौरभ वागळे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

# डिटेक्टिव्ह अल्फ़ा

## **द मूनलाईट मर्डर** (रहस्यकथा)

लेखक : सौरभ वागळे
'निसर्ग' प्लाझा, सांगलीवाडी,
सांगली.
फोन : 8983234042
ईमेल : sourabhwagale@yahoo.Com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ५ नोव्हेंबर २०१९

©esahity Pratishthan®2019

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डिटेक्टिव्ह अल्फा

आणि

## ‘द मूनलाईट मर्डर’ प्रकरण

## सौरभ वागळे

नमस्कार वाचकमित्रहो!

जवळपास एका वर्षानंतर ईसाहीत्यवर पुन्हा लिहिताना मला खुपच आनंद होतोय. मधल्या काळात माझं ‘कॉर्पोरेट टू अ‍ॅकॅडेमिक’ असं ट्रान्सफॉर्मेशन झाल्यामुळे काही काळ माझी लेखणी बंद पडली होती. पण म्हणतात ना, थांबला तो संपला! एखादी गोष्ट तुम्ही सतत करत रहाल, तरच तुमचं त्यातलं कौशल्य अबाधित राहिल. हे मला वारंवार जाणवू लागलं. मग मी पुन्हा लिहायला सुरुवात केली. ईसाहीत्यवरच्या ‘डिटेक्टिव्ह अल्फा’ सिरीजच्या चार भागांनंतर मी पुढचे दोन भाग बुकगंगा वेबसाईटवरती प्रकाशित केले. त्यांच्यावर (बऱ्याच जणांची नाराजी पत्करून) ‘प्राईस टॅग’ लावला. त्याबद्दल मला वाचकांतर्फे संमिश्र प्रतिक्रिया आल्या. अर्थातच प्रत्येकाला आपलं मत मांडण्याचा अधिकार आहे. त्यामुळे सर्व प्रतिक्रियांचं मी स्वागतच करतो.

‘डिटेक्टिव्ह अल्फा’ रहस्यकथा विविध प्लॅटफॉर्म्सवर, विविध पद्धतींनी प्रकाशित करण्यामागे माझा अंतिम हेतू एकच आहे – अल्फाला कमर्शियल मार्केटमध्ये आणणे आणि छापील पुस्तकरुपाने त्या कथा प्रकाशित करणे. ‘हेतू’ पेक्षा ‘स्वप्न’ हा शब्द इथं मला जास्त योग्य वाटतो. कारण मराठी साहित्यातील रहस्यकथांची पुस्तके हळूहळू लोप पावत चालली आहेत. ईबुक्समध्ये हा प्रकार तुलनेने जास्त आढळतो, पण छापील पुस्तके अजूनही येत नाहीत. मराठीत ज्या काही रहस्यकथा आज उपलब्ध आहेत, त्या एकतर सुहास शिरवळकर किंवा नारायण धारपांच्या काळातल्या आहेत, किंवा इतर भाषांमधून अनुवादित आहेत. अशा वेळी कोणीतरी पुढाकार घेऊन रहस्यकथा प्रकाराला पुस्तकांच्या बाजारात नवसंजीवनी मिळवून देणं आवश्यक आहे. त्यासाठी फायनान्स आला, मार्केटिंग आलं, रिस्क आली. पण या सर्वांच्या आधी आली ती गरज. त्यामुळे धाडस करायला हवंय, असं मला वाटतं. खरंतर मीही हे धाडस करण्यासाठी अजून धजावलेलो नाहीये, कारण जसा एखादा मध्यमवर्गीय माणूस इन्व्हेस्टमेंट करताना दहावेळा विचार करतो, तसाच मीही करतो. पण मला खात्री आहे, की एक दिवस अल्फाच्या कथा असलेलं पुस्तक तुमच्याआमच्या हातांत नक्की पडेल.

तर, अशा सगळ्या प्रवासात मधला काही वेळ मी ईसाहीत्यसाठी लिहू शकलो नाही. पण ज्या ठिकाणाहून मी लिहिण्यास सुरुवात केली, लोकांपर्यंत पोहोचण्यास सुरुवात केली, तिथे परत आल्याशिवाय मी कसा राहू शकेन? त्यामुळे मी आता ठरवलंय, की माझा लेखनप्रवास एका बाजूने कितीही वळणे घेत चालू दे, पण अधुनमधून ईसाहीत्यसाठी नक्की लिहायचं. त्याचीच एक सुरूवात म्हणून मी रोज कॉफी पिता पिता लिहिलेली डिटेक्टिव्ह अल्फाची एक नवीन चित्तथरारक रहस्यकथा तुमच्यासमोर आणत आहे. तुम्ही ती वाचून मला प्रतिक्रिया नक्की द्याल, अशी मला खात्री आहे.

अखेरीस, सुनील सर आणि ईसाहीत्य टिमने मला नेहमी जी साथ दिली, वेळोवेळी सल्ले आणि मार्गदर्शन दिलं त्याबद्दल मी त्यांचा खूप खूप आभारी आहे. त्यांच्याशी आणि वाचकांशी हे नातं असंच नेहमी टिकून रहावं अशी मी सदिच्छा व्यक्त करतो आणि माझं लांबवलेलं प्रास्ताविक संपवतो.

## Enjoy the thrill of 'The Moonlight Murder' adventure with Detective Alfa!!

सौरभ वागळे

Wholeheartedly dedicated to

# My MOM & DAD

# श्री. सौरभ वागळे यांची ई साहित्यने प्रकाशित केलेली पुस्तके

डिटेक्टिव्ह अल्फा भाग - 1 : रत्नजडित खंजिराचे रहस्य

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/detective_alpha_saurabh_wagale.pdf

डिटेक्टिव्ह अल्फा भाग - 2: 'देखावा'


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/detective_alpha_2_saurabh_wagle.pdf


जुन्या घराचे गूढ


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/detective_alpha_june_ghar_saurabh_wagale.pdf

अंधारातील पाऊल

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/detective_alpha_4_andhaar_saurabh_wagale.pdf






अल्फाच्या आधीच्या सर्व भागांची लिंक :

https://docs.google.com/document/d/1srXJH1GbBIwvnhzQJGNMR2CwT7ZKZdh_VplSpxc_YIA/edit?usp=sharing

**या पुस्तकातील कथा, पात्रे, घटना आणि स्थळे पूर्णतः काल्पनिक असून त्यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही व दिसल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.**

# 1.

नोव्हेंबरमधल्या परिक्षेचा तो काळ होता. माझ्यासाठी खरंतर ‘सत्त्वपरीक्षेचा काळ‘ असं म्हणता येईल, कारण ते माझे इंजिनिअरिंगचे शेवटचे वर्ष होतं आणि ही सेमिस्टर परिक्षा माझ्यासाठी निर्णायक असणार होती. तसे मी पहिल्या तीन वर्षांच्या कालखंडात बरीच पुण्याई करून ग्रेड्स जमवून ठेवले होते आणि सध्या मी माझ्या वर्गाचा टॉपर होतो. या परिक्षेतही मी जर पहिला आलो, तर माझं गोल्ड मेडल पक्कं होतं. पण माझ्या वर्गातला अभिजीत माझ्या तोडीस तोड होता आणि या परिक्षेत त्याने बाजी मारली, तर जामच अनिश्चितता निर्माण होणार होती (तसं माझे सिल्व्हर मेडल पक्कंच होतं, पण माझ्या शाळेपासूनच्या ‘ॲकॅडेमिक वर्चस्वा’ला ते शोभलं नसतं!). त्यामुळे इकडे मी आणि तिकडे तो अभिजीत, दोघेही एकमेकांचा चेहरा समोर आणून घासून घासून अभ्यास करत होतो.

‘सत्त्वपरीक्षेचा काळ’ म्हणण्याचं दुसरं कारण असे, की नोव्हेंबर संपायला आला होता, दिवाळी काही दिवसांपूर्वीच झाली होती आणि कडाक्याची थंडी पडण्यास सुरुवात झाली होती. अशा थंडीत रात्र रात्र जागून अभ्यास करणं म्हणजे निव्वळ ‘टॉर्चर’ होतं. जागायचे तरी पंचाईत आणि झोपायचे तरी पंचाईत! उद्या सकाळी पहिला पेपर होता आणि त्याची रिव्हिजन करण्यासाठी मनाची पूर्ण तयारी करून मी पुस्तक उघडून बसलो. माझा रूममेट निव्वळ मठ्ठ आणि झोपाळू होता. आम्ही जेवण करून आलो आणि पंधरा मिनिटांतच महाशय बेडवर आडवे होऊन घोरायला लागले!! मी परिक्षेच्या वेळी एवढ्या लवकर झोपायचा स्वप्नातही विचार केला नसता. मला इथं मिळालेले दोन्ही रूममेट या बाबतीत अगदी सारखे होते – अभ्यासाच्या नावाने शिमगा! पण ही गोष्ट सोडता दोघांची तसूभरही तुलना करता येत नव्हती. पहिला रूममेट म्हणजे ‘चमत्कार’ या शब्दाचा साक्षात अवतार होता.. अल्फा!!

अल्फा आणि मी पहिली दोन वर्षे सांगलीतील विश्रामबाग चौकाजवळील 'विश्रांती' इमारतीच्या या छोटेखानी फ्लॅटमध्ये राहिलो होतो. मी त्याला 'मराठीतला स्वघोषित शेरलॉक होम्स' म्हणून चिडवायचो (पण त्याने स्वतःची तुलना शेरलॉक होम्सशी करण्यास नकार दिला होता. तो स्वतःला होम्सचा शिष्य मानायचा!), कारण 'मी एक डिटेक्टिव्ह आहे' असे म्हणत तो कित्येक क्राईम केसेसमध्ये लुडबुड करायचा आणि बऱ्याचदा (किंबहुना, नेहमी) त्या सोडवायचादेखील. त्याच्यासोबत रुममेट या नात्याने मीही त्याच्या या साहसांत खेचला जायचो आणि त्याच्यासोबत पळापळ करायचो. ती दोन वर्षे खरंच खूप चमत्कारिक आणि साहसपूर्ण घटनांनी भरलेली होती. त्यानंतर अल्फाचे सांगलीतले शिक्षण संपले आणि तो पुढचे कोर्सेस करण्यासाठी मुंबईला गेला. गेल्याच सुट्टीत आम्ही पुण्यात भेटलो होतो आणि तिथंही दोन गूढ प्रकरणांचा छडा लावण्यात अल्फाने मला सोबत घेतलं होतं. पण नंतर मी पुन्हा सांगलीला आलो आणि अल्फा पुन्हा मुंबईला गेला. आता अधूनमधून कधीतरी आमचा फोन असायचा. तो नेहमी फोनवर म्हणायचा, 'प्रभू, एखाद्या रहस्याची उकल करायची असेल, तर तू सोबत हवास यार! तू किती सहजपणे आणि शांतपणे माझे विचार ऐकून घेतोस! इथे मुंबईला आल्यापासून चारजणांनी माझी रूम सोडली आहे. कोणी टिकतच नाही! तू एकदम 'आयडियल रूममेट' आहेस बघ! '

माझ्याही आयुष्यातील ती 'आयडियल रूममेट' ची पोकळी अल्फा गेल्यानंतर तशीच राहिली होती. न जाणे कधी आम्ही पुन्हा रूममेट म्हणून एकत्र राहू.. मी माझ्याही नकळत माझी जुनी डायरी उघडली आणि तिची पाने पलटू लागलो. मला डायरी लिहीण्याची चांगली सवय होती. इंजिनिअरिंगच्या जवळपास प्रत्येक आठवड्याचा तपशील मी तिच्यात लिहून ठेवला होता. 'दोन वर्षांपूर्वी याच दिवशी आपण काय बरं करत असू?' मी मनातल्या मनात विचार केला. भराभर पाने उलटून मी दोन वर्षांपूर्वीचे आजच्या तारखेचे पान उघडले आणि एकदम माझ्या अंगावर शहारे आले. तिथे वरच्या मार्जिनमध्ये लिहिले होते – 'द मूनलाईट मर्डर'!!

ते नाव वाचून मी रोमांचित एवढ्यासाठी झालो, कारण ते प्रकरणही अशाच थंडीच्या दिवसांत घडलं होतं. त्या प्रकरणामुळे आमच्या तेव्हाच्या हिवाळ्याची सुरुवात एका गूढतेच्या

आच्छादनात झाली होती. मला उद्याच्या पेपरचा आणि त्यासाठी समोर उघडून ठेवलेल्या पुस्तकाचा विसर पडला आणि मी डायरीची पाने पलटू लागलो. माझी लिहिण्याची शैली अतिशय बंडल आहे, हे कबूल करण्यात मला मुळीच कमीपणा वाटत नाही. त्यामुळे डायरीत लिहिलेला काही मजकूर आणि माझ्या स्मृतीपटलावर उमटलेल्या काही आठवणी, यांची सांगड घालत ते प्रकरण माझ्या डोळ्यांसमोर घडले तसे उभे राहिले..

त्यावर्षी आमची परिक्षा लवकर संपली होती आणि मी दोनेक दिवसांत घरचा रस्ता पकडणार होतो. घरचे गरमागरम जेवण जेवायला मिळणार, या कल्पनेनंच माझ्या मनात गुदगुल्या होत होत्या. पेपर संपल्याच्या दुसऱ्या सकाळी मस्तपैकी उशिरा उठून मी नाश्ता करून आलो. अल्फा सकाळपासून माझ्याकडे भकास नजरेने पहात होता. मला ते जरा उशिराच लक्षात आलं.

“काय?” मी भुवया उंचावून त्याला विचारलं.

“कुठं काय!” अल्फा खांदे उडवून म्हणाला.

“मला माहिताय, मी घरी जाणार या कल्पनेने तुझा जळफळाट होतोय. तुझ्यासाठी घरून आलेला दिवाळीचा फराळ ठेवून जातोय. पुरेल महिनाभर.” मी म्हणालो.

“नाही.” तो म्हणाला.

“काय नाही?” मी चक्रावलोच.

“तू घरी जाणार, या कल्पनेने माझा जळफळाट नाहीये होत, उलट कीव येतेय!” तो म्हणाला.

“का??” मी चकीत होऊन विचारले.

“घरी जाऊन तू किती बोअर होणारेस ठाऊकाय का? एकतर तुझे आईबाबा आठवड्याभरासाठी बाहेरगावी जाणार आहेत. त्यानंतर तुमच्या घरातला टी. व्ही. बंद आहे.

तुझ्या घरी ठेवलेल्या बाईकचे टायर पंक्चर झाल्यामुळे तुला कुठे जाताही येणार नाहीये. शिवाय तुझ्या लॅपटॉपवरही तू परिक्षेमुळे काहीच शिल्लक ठेवलेले नाहीयेस. तुझ्या घरी लॅन नाहीये, म्हणजे इंटरनेटही नाहीच. त्यात तू पडलास एकलकोंडा. कोणा मित्राकडे जायची पण सोय नाही. आता मला सांग, तू घरी जाऊन काय गोट्या खेळणार आहेस काय?”

माझ्या मनात प्रथम वैतागल्याचे भाव आले. पुढच्याच क्षणी त्यांची जागा आश्चर्याने घेतली.

“अल्फा, तुला या सगळया गोष्टी कशा ठाऊक? मी तर यातलं काहीच तुझ्यापाशी बोललेलो नाहीये! तू लपूनछपून रोज माझ्या घरी फोन लावतोस की काय?”

“छे रे! तू फक्त थेट काहीच बोलला नाहीयेस. पण अप्रत्यक्षपणे हे सगळं काही तूच मला सांगितलंयस.” अल्फा नेहमीच्या सहज शैलीत हसत म्हणाला,”परवा फोनवर तुझे बाबा तुला बस बुक करायला सांगत होते. त्याच्या तारखा मी टिपल्या. तू दोनच तिकीटे बुक केलीस, म्हणजेच तुझे आईबाबा कुठेतरी जातायत, पण तू घरीच थांबणारेस. शक्यतो ते कुणाचंतरी लग्न असावं, कारण तुला अशा कौटुंबिक समारंभात जायला आवडत नाही. पुढे, तू गेल्या आठवड्यात मला माझा इमेल विचारलास आणि त्यावरून कोणत्यातरी वेबसाईटवर अकाउंट काढलंस. मला जो मेल आला, त्यावरून मला कळालं, की तू एका ऑनलाईन टी. व्ही. सिरीअलच्या वेबसाईटवर माझा मेल वापरून ’30 डेज फ्री ट्रायल’ चं अकाउंट काढलं आहेस. आता तू स्वतः तर टी. व्ही. वरच्या मालिका बघत नाहीस, हे मला ठाऊकाय. मग साहजिकच तू ते अकाउंट तुझ्या घरच्यांसाठी काढलं असणार. पण तुझ्या घरी टीव्ही असताना ऑनलाईन बघण्याची काय गरज पडली? निष्कर्ष – घरचा टिव्ही बंद आहे. बहुधा तो निकामीच झाला असणार. नाहीतर तुझ्या बाबांनी तुला एवढी तसदी देण्यापेक्षा तो दुरुस्त करून घेतला असता.

त्यानंतर, पंक्चर झालेलं टायर, हां. तुझ्या घरी एक बाईक आहे, जी केवळ तूच वापरतोस. तुझ्या बाबांचं ऑफिस घरापासून जवळ असल्याने ते चालतच जातात. हे मला कसे ठाऊक, असे

विचारू नकोस. तूच मागं एकदा म्हणाला होतास. तर, दिवाळीनंतर तू जेव्हा आलास, तेव्हा तुला यायला बराच उशीर झाला होता. तेव्हा तू म्हणालास, की बाईकचे टायर पंक्चर झालंय आणि त्यामुळं बस स्टँडवर पोहोचायला उशीर झाला. आता तू नसताना तुझ्या घरी बाईक वापरणारं कोणीच नाहीये. त्यामुळे साहजिकच तिचं पंक्चर काढण्याची तसदीही कोणी घेतली नसावी. तुझ्या घरी लॅन नसल्याचे तू मला आधीच बोलला आहेस. या सर्वाचा अर्थ असाच नाही का, की तू इथे जितका बोअर होणारेस, त्यापेक्षा दसपट जास्त घरी जाऊन होणारेस?”

मी ते स्पष्टीकरण ऐकून चाट पडलो आणि मनातल्या मनात अल्फाचे बोलणे पुन्हापुन्हा घोळवत राहिलो. अखेर माझ्या तोंडून शब्द बाहेर पडलेच,

“तू कधीकधीचे आणि कायकाय लक्षात ठेवत असतोस रे बाबा अल्फा! कमाल आहे बुवा! यातल्या अर्ध्या गोष्टी तर मी स्वतःच विसरलो होतो! तू तर माझा मूडच पलटवलास! छ्या.. घरी जाण्यात काहीच अर्थ नाही आता!”

माझ्या चेहऱ्यावरून निसटलेला आनंद त्याच्या चेहऱ्याने पकडावा, तसा त्याचा चेहरा खुलला.

“अरे हां, मुख्य गोष्ट तर सांगायचीच राहिली.” अल्फा आणखी एखादा बॉम्ब फोडणार, याची मला जाणीव झाली,”तू सुट्टीत वाचायला विकत घेतलेली दोन नवी अभ्यासाची पुस्तकं तुझ्या आईने चुकून रद्दीत टाकली आहेत. त्यामुळे तू घरी जाऊन तुझी आवडती गोष्ट – पुढच्या सेमिस्टरचा अभ्यास – हेही करू शकत नाहीस!!”

ते ऐकून मी उडालोच.

“काऽऽय?? आर यू सिरीअस?? शिट्!!” मी डोक्याला हात लावून मटकन खाली बसलो. मिनिटभर माझा मेंदू कामच करेनासा झाला होता. अल्फा मला असा गलितगात्र झालेला पाहून गालातल्या गालात हसत होता. मी भानावर येताच तात्काळ घरी फोन लावला.

“आई..” मी धीरगंभीर आवाजात म्हणालो,”अल्फा जे सांगतोय ते खरं आहे का?”

शांतता..

“आई..?”मी पुन्हा विचारले.

“मी तुला सांगणारच होते रे..”

खट्ट! मी पुढे ऐकूच शकलो नाही. फोन कट करून मी खिन्नपणे अल्फाकडे पाहू लागलो. तो माझा चेहरा पाहून मोठ्यानं हसू लागला.

“माझी पुस्तकं- माझ्या घरातून रद्दीला गेली- आणि ही गोष्ट माझ्याआधी तुला कशी काय कळू शकते??” मी एकेका शब्दावर जोर देत ओरडलोच.

“खूप वर्षांची साधना आणि चिंतन यांतून एक दिव्यदृष्टी, किंवा अंतर्ज्ञान प्राप्त होते. त्याचा वापर अशा असंख्य गोष्टी बसल्याजागी जाणून घेण्यासाठी करता येतो.” असं म्हणून अल्फा थोडावेळ थांबला. मी चक्रावून त्याने फेकलेल्या अंतर्ज्ञान, दिव्यदृष्टी वगैरे बोजड शब्दांचा अर्थ पेलण्याचा प्रयत्न करू लागलो. पण तेवढ्यात अल्फा डोळे मिचकावत म्हणाला,”पण त्याची मला गरज पडली नाही. काल तुझ्या आईचा फोन आला होता.”

“मला फोन करायचा सोडून तिने तुला का फोन केला असावा?” मी धुसफुसत विचारलं.

“तिला ठाऊक होतं की तू हे ऐकून आदळआपट करणार.. त्यामुळे तिने मला तुझी समजूत काढायला सांगितलं आहे.” अल्फा म्हणाला.

“वा, छानच समजूत काढलीस बरं का माझी!” मी चिडून म्हणालो. अल्फा हसू दाबण्याचा प्रयत्न करत होता,”ती दोन पुस्तके विकत घेण्यासाठी मी हजार रुपये खर्च केले होते... माझ्या कॉलेजच्या लायब्ररीतही ती उपलब्ध नाहीयेत. शिट्! आता मी काय करू?”

“इथंच थांब.” अल्फा म्हणाला.

“काय?” मी.

“घरी जाऊ नकोस, इथेच थांब.” अल्फा म्हणाला,”हेच तर तात्पर्य आहे सगळ्याचं.”

मी त्याच्याकडे तिरपा कटाक्ष टाकला.

“काही पर्याय ठेवलाच नाही तुम्ही माझ्यासमोर तर काय करणार!” मी निराशपणे म्हणालो,”थांबायलाच लागेल.”

“नक्की?” अल्फानं खुर्चीतून उडी मारून उठत विचारलं,”तू घरी नाहीयेस जात तर?“

“एवढं खुश व्हायला काय झालंय तुला?” मी अवाक् होऊन विचारलं.

“सांग तर खरं!” अल्फा.

“अं.. नाही..” मी म्हणालो. काहीतरी अल्फाच्या मनात होतं खरं! मी ते बाहेर पडण्याची वाट पाहू लागलो.

“व्हेरी गुड! चल तयार हो मग..” तो म्हणाला.

“कशासाठी?” मी.

“एका रंजक प्रकरणाचा छडा लावायचाय आपल्याला.” अल्फा म्हणाला.

“अच्छाऽऽ.. तरीच तू सकाळपासून एवढं कन्व्हिन्स करतोयस मला घरी न जाण्याबद्दल!” मी म्हणालो.

“होय.” अल्फा मिश्किलपणे हसत म्हणाला,”तू सोबत असलास की मजा येते, प्रभवा. चकित करून सोडायला कोणीतरी बरोबर असायलाच हवं ना!”

“माझी पुस्तकं, तो टिव्ही.. हे सगळं खरं आहे ना? की मी इथे थांबावं म्हणून तू काही बनाव रचलायस?” मी डोळे बारीक करून विचारले.

“छे रे! तू आत्ताच तुझ्या आईला फोन करून खात्री करून घेतलीस ना! मी फक्त या सर्वांचा वापर तुझं मतपरिवर्तन करण्यासाठी केला, बस्स!” अल्फा म्हणाला.

“बरं.. बोल, कोणत्या मोहीमेवर जायचंय?” मी विचारले. अल्फाच्या मोहीमांमुळे आमच्या रूममध्ये एक वेगळेच चैतन्य निर्माण व्हायचं आणि आत्ताही तसंच झालं. मी माझ्या (नुकत्याच अल्फाने जाणीव करून दिलेल्या) सगळया समस्या विसरून त्याच्याकडे लक्ष देऊन ऐकू लागलो.

“सांगलीहून आष्ट्याला जाताना मध्ये शेतजमिनी आणि ओसाड माळरानांचा एक पट्टा आहे. त्यांच्या मध्ये तुंग नावाचं छोटंसं गाव आहे. ते गाव तिथं असणाऱ्या हनुमान मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. गावाची लोकसंख्या तुरळकच आहे आणि त्याच्या सर्व बाजूंनी शेतं, रानं आहेत. तिथे राहणारा माझा एक मित्र आहे, ज्याला आपली मदत हवी आहे.”

“नक्की विषय काय आहे खरं?” मी.

“एक खुनाचं प्रकरण आहे.” अल्फा म्हणाला,”त्यामध्ये त्याचे सख्खे काका फसले आहेत असं तो म्हणाला.“

“तो पोलीसांत गेला होता का?”

“हो. पण पोलीसांचा पूर्ण विश्वास आहे, की खून त्याच्या काकांनीच केलाय. आपल्याला जाऊन परिस्थिती पहायला हवी.” अल्फा म्हणाला.

“ठिकाय. कधी निघायचं ते सांग.” मी म्हणालो.

“आत्ता लगेच.” अल्फा म्हणाला,” मी त्याला एक फोन करतो. मग निघुया. तू आवर तोपर्यंत.”

मी आतल्या खोलीत जाऊन कपडे वगैरे केले. बाहेर येईपर्यंत अल्फाचा त्याच्या मित्राशी फोन झाला होता. आम्ही रुमला लॉक करून बाहेर पडलो. हिवाळयातली ती एक स्वच्छ सकाळ

होती. सूर्य बराच वरती आला असला तरी हवेत हलकासा गारठा होता. अल्फाच्या सूचनेनुसार मी माझा स्वेटर सोबत घेतला होता, कारण आम्हाला रात्री यायला उशीर होऊ शकतो, असं त्याचं म्हणणं होतं. त्यात ते गाव रानावनात होतं. त्यामुळे थंडीचा कडाका तिथे चांगलाच जाणवणार होता.

“आपण आष्ट्याला जाणारी बस पकडतोय.” अल्फा चालता चालता म्हणाला,”मध्ये तुंग गावाचा स्टॉप लागेल. तिथे उतरू. माझा मित्र आपल्याला तिथेच भेटेल.”

“या तुझ्या मित्राचं नाव काय आहे?” मी विचारले.

“अं..” अल्फा चक्क आठवू लागला! मी जागीच थबकून त्याच्याकडे मोठ्या डोळयांनी पाहिले.

“तू बरा आहेस ना अल्फा? ज्या मित्राची तू मदत करायला निघालायस, त्याचं नावच तुला ठाऊक नाहीये??”

“थांब, लगेच आठवेल बघ..” अल्फा डोके जोरात हलवत म्हणाला,”संजय! हां!! संजय सातपुते त्याचं नाव!”

“मघाशीच तू तुझ्या स्मरणशक्तीची कमाल दाखवून मला धक्के दिलेस आणि आता स्वतःच्याच मित्राचे नाव विसरलायस? इतकं विचित्र कोणी कसं काय असू शकतं?” मी जोरात हात हलवत विचारलं. आम्ही पुन्हा चालू लागलो.

“एक सवय मी बऱ्याच वर्षांच्या कष्टाने स्वतःला लावून घेतली आहे – ती म्हणजे, ज्या काही निरुपयोगी गोष्टी आहेत, त्या डोक्यातून लगेच काढून टाकणे आणि मेंदूच्या मेमरीतली बहुमूल्य जागा वाया न घालवणे!” अल्फा म्हणाला,”माझं कॉलेजमधील मित्रमंडळ कितीसं मोठं असावं असं तुला वाटतं? शून्य! मी केवळ ज्याच्याकडून परिक्षेच्या आदल्या दिवशी नोट्सच्या झेरॉक्स करून घेतो, तो एक मुलगा सोडल्यास माझी इतर कोणाशी तोंडओळखसुद्धा नाहीये. थोडक्यात, माझ्यासाठी बाकी सगळे निरुपयोगी आहेत, इन्क्लुडींग धिस जन्टलमन – कोण बरं – हां, संजय.. याचा सकाळी फोन आला तेव्हा मी ‘रॉंग नंबर ‘ म्हणून फोन कट करायच्या बेतातच होतो. पण

हा संजय काकुळतीला येऊन म्हणाला, की बाबारे मी तुझ्याच वर्गातला मुलगा बोलतोय आणि मला अत्यंत महत्त्वाच्या कामात तुझा सल्ला हवाय. मी प्रथम खात्री करून घेतली आणि मग जाण्यास कबूल झालो.”

“अजब आहेस बघ तू, खरंच!” आश्चर्य व्यक्त करत मी म्हणालो. अल्फा हसला.

“त्याने नक्की खून कोणाचा झाला, कसा झाला, हे सांगितलं नाही.” तो पुढे म्हणाला,”पण एवढंच म्हणाला, की त्यामध्ये त्याच्या काकांविरूद्ध खूपच भक्कम असा पुरावा आहे. इतका भक्कम, की गावच्या पोलीसांनी मागंपुढं न पाहता थेट त्यांना तुरुंगात टाकलंय .”

“पोलीसांची एवढी खात्री आहे याचा अर्थ त्यांनी खरंच गुन्हा केला नसेल ना?”मी विचारले.

“मी त्याला हेच विचारलं. तुझ्या काकाने खून नाही केला, असं तुला का वाटतं? त्यांनी जर खरंच खून केला असेल, तर माझा एक छान दिवस वाया जाईल. तर तो म्हणाला, की माझा काका अतिशय सरळमार्गी आहे आणि तो खून वगैरे स्वप्नातही करू शकत नाही. शेवटी त्याच्या शब्दांवर विश्वास ठेवून मी जायला तयार झालो.”

मी हलकेच मान हलवली. नक्की काय घडलं होतं अल्फाच्या मित्राच्या काकांसोबत? कोणाचा खून झाला होता? आणि असे काय भक्कम पुरावे त्या काकांच्या विरुद्ध उभे होते?

मी बसमध्ये बसल्या बसल्या पूर्णवेळ हाच विचार करत राहिलो. अल्फा पूर्ण प्रवासात शांत होता. कदाचित तोही याच प्रश्नांचा विचार करत असावा..

*

## 2.

अर्ध्या-पाऊण तासात आम्ही तुंग गावाच्या फाट्यावर उतरलो. अल्फाचा मित्र तिथे आमची वाट बघत उभा होता. सडपातळ, उंचापुरा, भुऱ्या केसांचा, अगदीच सामान्य असा दिसणारा होता तो. अल्फाला पाहून त्यानं हात केला.

“अच्छा.. तू आहेस होय संजय!” अल्फा चुकून बोलून गेला.

“काय?” तो गोंधळून म्हणाला.

“काही नाही. हा माझा मित्र प्रभव.” अल्फाने सारवासारव करून विषय बदलला. मी त्याच्याशी हस्तांदोलन केलं. त्याला बहुधा माझं येणं अपेक्षित नसावं.

“डोन्ट वरी, हा माझा मित्रच आहे आणि आपल्या कामात याची मदतच होणारे.” अल्फा म्हणाला.

“बरं बरं. चल, माझ्या घरी जाऊ.” तो म्हणाला.

“तुझ्या काकांना तुरुंगात ठेवलंय का?” अल्फाने विचारले.

“होय.” संजय.

“मग आधी तिकडेच घेऊन चल आम्हाला. तुझ्या काकांशी थोडं बोलल्यानंतर प्रकरण नक्की काय आहे ते स्पष्ट होईल. ते फार दूर नाही ना इथून?” अल्फा.

“नाही. चल, पोलीस ठाण्यातच जाऊ थेट.”

“तिथे पोहोचेपर्यंत आम्हाला तुला या खुनाबद्दल जे काही ऐकून, पाहून माहिती आहे, ते सगळं सांग. कारण आम्हाला तिथे जाण्याआधी प्रकरणाची थोडी पार्श्वभूमी ठाऊक असणं आवश्यक आहे.” अल्फा म्हणाला. आम्ही बसने जिथे सोडले, त्या मुख्य रस्त्यापासून दूर एका छोट्या, पण नीटनेटक्या रस्त्यावरून चालू लागलो. संजय आम्हाला सांगू लागला,

“दत्ताजी सातपुते हा माझा सख्खा काका. माझे वडील, कृष्णाजी त्याचे थोरले बंधू. ते आष्ट्याला नगरपालिकेत कारकुनाचे काम करतात. आमची गावात काही शेती आहे. ती माझा काका सांभाळतो. तो फार काही शिकलेला नाही. पण व्यवहारात मात्र अतिशय चतुर आहे. तो बोलका आहे आणि लोकांकडून चोख काम कसं करवून घ्यायचं, हे त्याला चांगलं ठाऊक आहे. शेतात काम केल्यानं त्याची शरीरयष्टी चांगलीच दणकट बनली आहे आणि शिवाय तो थोडा तापट स्वभावाचा असल्यानं लोक त्याला थोडे टरकूनच असतात. ही झाली माझ्या काकाची थोडक्यात ओळख.

आमच्या गावातल्या शेताला लागूनच विक्रम सपकाळ नावाच्या माणसाचे शेत आहे. हाच तो खून झालेला मनुष्य. तो एक अतिशय निर्लज्ज आणि तुसडा माणूस म्हणून गावात प्रसिद्ध होता. आईबाप वारले आणि भाऊ गाव सोडून निघून गेला. त्यामुळे एकटाच रहात होता. तो नेहमी दारू प्यायलेला असायचा आणि कुणाला काय बोलेल याचा नेम नसायचा. त्यामुळे त्याच्याशी कोणी सलगी करायला जात नसे. एकदोनदा त्याने बायकांची छेड काढल्याबद्दल लोकांचा मारही खाल्ला होता. तो माझ्या काकापेक्षा कितीतरी पट रागीट आणि चिडका होता. एकदा त्यानं शाळेतल्या काही पोरांना त्याच्या शेतातून ऊस तोडताना पकडलं होतं, तेव्हा त्यांना अत्यंत बेदम मारहाण केली होती. इतकी, की त्या पोरांना थेट हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावं लागलं. त्याचे

माझे वडील आणि काकासोबतही शेताच्या हद्दीवरून वाद होतेच. त्यानं बऱ्याचदा आमच्या जमिनीत घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला होता. पण गावातल्या लोकांनी मध्यस्थी करून विक्रमला माघार घ्यायला लावली.

माझं घर मुख्य गावापासून थोडं दूर, आपण आहोत त्याच्या विरुद्ध दिशेला आहे. ती एक दहावीस घरांची छोटी वाडी आहे असं म्हणता येईल. त्याच्या आणि गावाच्या मधल्या भागात शेतजमिन आहे. तिथे कोणी रहात नसल्यामुळे तो भाग सहसा सुनसान असतो. आमच्या वाडीतून गावाकडे जायला तशा बऱ्याच वाटा आहेत, पण एक मुख्य डांबरी रस्ता आहे त्यावरूनच सगळेजण ये-जा करतात. त्या रस्त्यावर दिवसा शेतकऱ्यांची, शेतमजुरांची आणि येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांची वर्दळ असते. पण रात्री मात्र तो रस्ता स्मशानासारखा शांत आणि भयाण असतो. याच रस्त्यावर काल विक्रम सपकाळचा खून झाला.

आता मी काल रात्री नक्की काय घडलं ते सांगतो. विक्रमला दारूचं व्यसन होतं, हे मी तुला सांगितलंच. तो बऱ्याचदा रात्री उशिरा गावातून पिऊन यायचा. कालही असंच तो दारू पिऊन रात्री उशिरा गावातून परत येत होता. माझा काकाही काही कामानिमित्त गावात गेला होता. त्याला वाटेत हा विक्रम भेटला. तोही आमच्या वाडीमध्येच रहायचा. काका म्हणाला, की तो खुपच प्यायलेला होता आणि त्याला धड चालताही येत नव्हतं. वास्तविक माझ्या काकाला तो माणूस मुळीच पसंत नाही. पण दारूच्या नशेत हा माणूस काहीतरी उलटसुलट करेल, म्हणून त्यानं त्याला सोबत घेतलं आणि ते दोघं त्या डांबरी रस्त्यावरून आमच्या घराच्या दिशेनं येऊ लागले. रात्रीचे साडेबारा वाजून गेले होते. रस्ता नेहमीप्रमाणेच स्तब्ध, निश्चल होता त्यावर दिवे नव्हते आणि या दोघांशिवाय दूरपर्यंत दुसरं कोणी दिसतही नव्हतं. ते दोघेजण साधारण अर्ध्या रस्त्यात आले होते. माझा काका पुढे चालत होता आणि विक्रम मागे. तो काहीबाही बरळत मागून येत होता. अचानक एका क्षणी माझ्या काकाने एक कण्हण्याचा आवाज ऐकला आणि मग धपकन् काहीतरी पडल्याचा आवाज आला. त्यानं मागं वळून पाहिलं, तर विक्रम रस्त्यावर पालथा पडला

होता. काकानं त्याला हाक मारली, पण तो काही उठला नाही. त्याने जवळ जाऊन पाहिलं, तर त्याला रस्त्यावर रक्त ओघळताना दिसलं. बाजूलाच एक दगड पडला होता, जो रक्ताने माखलेला होता. विक्रमाच्या डोक्याच्या मागे जबर जखम झाली होती आणि तो आता निश्चल पडला होता.

माझ्या काकाला काय करायचं, हे सुरुवातीला कळालंच नाही. मग तो मदतीसाठी ओरडू लागला. काही मिनिटांनी गावातून वाडीकडे येणारे मराठे मास्तर तिथे थांबले आणि त्यांनी विक्रमला पाहिलं. तो मरण पावला होता. त्यांच्याकडे सायकल असल्याने ते झटपट वाडीत गेले आणि बाकीच्या लोकांना घेऊन आले. दृश्य परिस्थिती पाहता माझ्या काकानंच खून केला आहे, असे चित्र तयार झालं होतं. त्यामुळे पोलिसांनी ताबडतोब त्याला ताब्यात घेतलं.”

संजयने त्याची हकिकत संपवली. अल्फा खोल विचारांत गढलेला मला दिसला. एक मिनिटभर आमच्यापैकी कोणीच काही बोलले नाही. अखेर अल्फाने विचारले,

“तुझ्या काकांनी जेव्हा मागं वळून पाहिलं, तेव्हा त्यांना रस्त्यावर किंवा आजुबाजूला कोणी दिसलं नाही का?”

“नाही. हाच तर सगळयांना गोंधळात पाडणारा भाग आहे. तो म्हणाला, की मी मागे वळलो, तेव्हा तिथं कोणीच नव्हतं, पण विक्रमचं डोकं मात्र फुटलं होतं. अंधारात जरी दिसलं नाही तरी ऐकू नक्कीच आलं असते. तिथं तसूभरही हालचाल नव्हती आणि अगदी बारीकसा आवाजही स्पष्ट ऐकू येईल इतकी शांतता होती.” संजय म्हणाला.

“हं..” अल्फा म्हणाला. मग पुन्हा शांतता. मीही संजयची कथा मनात घोळवून घडलेल्या प्रसंगाचे चित्र मनात उभे करण्याचा प्रयत्न करू लागलो.

“तू माझ्या काकाला निरपराध सिद्ध करू शकशील ना?” संजयने आशेने पहात अल्फाला विचारले.

“आत्ताच काही सांगता येणं कठीण आहे.” अल्फा म्हणाला,”तू सांगितलेल्या घटनेवरून तर तुझ्या काकांनीच विक्रमचा खून केला आहे, हाच निष्कर्ष समोर येतोय. मला बऱ्याच गोष्टींची पाहणी करावी लागणार आहे. त्यावरून काही गोष्टी स्पष्ट होतील, अशी अपेक्षा आहे.”

“मला आपल्या वर्गातील रमेशनं तुझा नंबर दिला. तो म्हणाला, की तुला अशा प्रकरणांमध्ये बराच रस आहे. म्हणून मी तुला फोन केला. आम्हाला वकील वगैरे करणं परवडणारं नाही. तेव्हा तूच काहीतरी करून यातून मार्ग काढ प्लीज..”

अल्फाने मान डोलावली (बहुधा तो रमेश कोण, हे आठवण्याचा प्रयत्न करत असावा).

“तुझे काका निरपराध असतील, तर नक्कीच सुटतील. मी माझ्या परीने सर्व प्रयत्न करेन.” तो म्हणाला.

आम्ही बराच वेळ चालत होतो. मुख्य रस्त्यापासून बरेच आत चालत आल्यानंतर तुंग गाव लागलं. संजयनं आम्हाला थेट पोलीस चौकीत नेलं. फार मोठी इमारत नव्हती ती. आम्ही गेटमधून आत शिरलो. पहिल्या खोलीत उजव्या बाजूला एक टेबल होतं, ज्यावर ‘सब-इन्स्पेक्टर राठी’ अशी पाटी होती. त्याच्यामागे एक सावळा, भरघोस मिशा असलेला जाडजूड मनुष्य बसला होता. आम्ही त्याच्यापाशी गेलो.

“काय रे सातपुते, कुणाला घेऊन आलास तुझ्या काकाला भेटायला?” राठींनी आमच्याकडे पहात संजयला विचारलं.

“हे.. हे माझे मित्र आहेत, सांगलीहून आलेत. सांगली पोलीसांना शोधकामात मदत करण्याचं काम हे दोघं अधूनमधून करत असतात. मी यांना मदतीसाठी बोलावून घेतलंय.”

“अरे कसली मदत घेतोयस लेका! तुझा काका खुनी आहे, हे आख्खं गाव मान्य करतंय. तुम्हालाच काय दिसत नाही कुणास ठाऊक! काल रात्री त्या रस्त्यावर विक्रम सपकाळचा मृतदेह डोकं फुटलेल्या अवस्थेत पडला होता. त्याच्या शेजारी काही फुटांवर तुझा काका उभा होता.

रक्ताने माखलेला शर्ट, घाबरलेली अपराधी नजर आणि हातात ज्याने खून झाला, तो दगड. आता मला सांग, अशा परिस्थितीत तू यांना बोलावून तुझ्या काकासाठी काय बचाव उभा करणार? माझं ऐक, उगाच लोकांना त्रास द्यायचं बंद कर आणि आपल्या कामाला लाग." राठी निष्काळजीपणे म्हणाले.

"नाही साहेब, तुम्ही चुकीच्या माणसाला पकडलंय. मला ठाऊक आहे, की खून माझ्या काकाने नाहीये केला. तुम्ही आम्हाला एक संधी तर द्या. याला थोडी माहिती लागली तर मिळेल एवढीच व्यवस्था करा, बस्स." संजय.

राठींनी आमच्याकडे निरखून पाहिलं.

"पोलीसमित्र, हं?" ते म्हणाले,"काय नाव तुमचं?"

"मी अल्फा. आणि हा प्रभव." अल्फा म्हणाला.

"अल्फा! काय फॅन्सी नाव ठेवलंय स्वतःचं! आजकाल थोडंफार साहसाचं काम केलं की लोक स्वतःला रॉबिनहूडच समजायला लागतात!" राठी हसत म्हणाले,"कुणासोबत काम केलंय रे तुम्ही?"

"जिल्हा पोलीस अधीक्षकांसोबत काम केलंय, सर. प्रधान सर आणि वाघमारे सर."

ती नावे ऐकून राठींच्या चेहऱ्यावरचा थट्टेचा भाव थोडा उतरला.

"बरं बरं, जे काय करायचंय ते पट्कन करायचं, समजलं? इथं रेंगाळत बसायचं नाही. गुन्हेगार आतल्या तुरुंगात आहे, त्याला तुम्ही भेटू शकता. ज्या दगडाने विक्रम सपकाळच्या डोक्यावर आघात झाला आहे, तो दगडही इथंच आहे. तो फक्त बघायचा, त्याला हात लावायचा नाही. कोणत्याही पुराव्यासोबत छेडछाड करायची नाही. नाहीतर थेट सांगलीला पाठवून देईन. समजलं?"

आम्ही शहाण्या मुलासारख्या माना डोलावल्या. एका हवालदारानं आम्हाला आतल्या खोलीत नेलं. तिथं एक छोटेखानी तुरुंग होतं आणि आतमध्ये एक मनुष्य गुडघ्यांवर डोके ठेवून बसला होता. शरीराने तो चांगलाच आडदांड होता. केस भरघोस आणि काळेभोर होते. वय तिशीच्या घरात होतं. संजयने त्याला हाक मारली. त्याने मान वरती करून आमच्याकडे पाहिलं.

“हे माझे मित्र आहेत, सांगलीहून आले आहेत. कदाचित ते आपली मदत करू शकतील.” संजय म्हणाला. दत्ताजीने आमच्याकडे वरून खालपर्यंत पाहिले. कदाचित त्याला आमच्याकडून फारशी अपेक्षा नसावी. त्यानं एक मंद स्मित करून मान डोलावली.

“मी अल्फा, संजयचा मित्र, आणि हा प्रभव. आम्ही तुमची मदत करायला आलो आहे. याआधी आम्ही सांगली पोलीसांसोबत बऱ्याच केसेसमध्ये काम केलेलं आहे. तुम्ही सहकार्य केलंत, तर यातून तुम्हाला निर्दोष सोडवण्याचा आम्ही प्रयत्न करू. आशा सोडण्याचं काहीच कारण नाही. आम्हाला काल रात्री काय घडलं, हे संजयने थोडक्यात सांगितलं आहे. मला तुम्हाला त्याबाबतीत काही प्रश्न विचारायचे आहेत, जर तुमची हरकत नसेल तर.”

दत्ताजीने एक मोठा श्वास घेतला आणि तो आमच्याकडे वळला.

“माझी काहीच हरकत नाही. मी तुम्हाला सर्वकाही सांगतो. पण तुम्हाला माझ्यावर विश्वास ठेवावा लागेल. मी कालपासून जे काही प्रत्येकाला सांगतोय, ते शंभर टक्के सत्य आहे. पण माझ्यावर कोणी विश्वासच ठेवायला तयार नाहीये. तुम्हालाही मी सत्यच सांगेन. फक्त तुम्ही विश्वास ठेवा.”

तो थोडा भेदरलेल्या अवस्थेत होता. अल्फाने त्याला दिलासा दिला,

“तुम्ही सांगताहात ते जर सत्यच असेल, तर तुम्हाला घाबरण्याचं काहीच कारण नाही. फक्त ते सिद्ध होणं गरजेचं आहे. त्यासाठी आम्ही आमच्या परीने प्रयत्न करू. बरं. मला सांगा, काल तुम्ही रात्री गावात कशासाठी गेला होता?”

“अं.. थोडं काम होतं म्हणून गेलो होतो.” दत्ताजी आमची नजर चुकवत म्हणाला.

“कसलं काम होतं?”

तो थोडा घुटमळला. काय उत्तर द्यायचे, हे त्याला कळेना.

“दारू प्यायला गेला होता तो.” अखेर संजय हताश आवाजात म्हणाला. अल्फाने डोक्याला हात लावला.

“म्हणजे काल ही घटना घडली, तेव्हा तुझा काका प्यायलेला होता?”

“होय..” संजय अडखळत उद्गारला.

“शिट्!” अल्फाने जोरजोरात मान हलवली,” हे आपल्याला अवघड जाणारे.. खूपच अवघड जाणारे..!!”

“माझं ऐका तरी.. मी काल खरंच शुद्धीवर होतो. मी कधीच जास्त पित नाही. त्या विक्रमएवढी तर नाहीच नाही. मला व्यवस्थित कळत होतं काय चाललंय ते. मी खरंच सांगतोय.“

अल्फाने खिन्नपणे संजयकडे पाहिले. तो म्हणाला,

“हे खरंय, की माझ्या काकाला प्यायची सवय आहे. पण तो खरंच कधी प्रमाणाबाहेर पित नाही. कालही तो व्यवस्थित चालतबोलत होता.”

अल्फाने काही क्षण डोळे घट्ट मिटून घेतले आणि पुन्हा उघडले. कदाचित तो दत्ताजीच्या बोलण्यावर विश्वास ठेवण्याची मानसिक तयारी करत असावा. तो म्हणाला,

“ठीक आहे. किती वाजता तुम्ही गावात गेला होता?”

“जेवण झाल्यावर.. साधारण साडेनऊ वाजता.”

“हे प्यायचं ठिकाण म्हणजे तो धाबाच का? काय नाव बरं त्याचं.. लक्ष्मी.. लक्ष्मी धाबा..” अल्फा.

“हे तुला कसं काय ठाऊक?” दत्ताजी.

“गावात आल्यापासून मला रस्त्यात दारू मिळण्याचं ते एकच ठिकाण दिसलंय. विक्रम सपकाळ तुम्हाला तिथंच भेटला का?”

“हो.”

“तो तिथे आधीपासूनच बसला होता, की नंतर आला?”

“नाही, तो थोड्या वेळानं आला, दहाच्या सुमारास.”

“तो चिडलेला, किंवा कुणाशीतरी भांडण करून आल्यासारखा दिसत होता का?” अल्फा.

“त्याचे नेहमी कोणा ना कोणासोबत भांडण झालेले असायचे. पण काल रात्री तर मला असं काही जाणवलं नाही.” दत्ताजी.

“तुम्ही दोघं एकाच टेबलावर बसला होता का?”

“नाही. त्या माणसाशी आपलं काही पटायचं नाही.”

“मग त्याच्या समोर दुसरं कोणी बसलं होतं का?”

“नाही. तोही एकटाच होता आणि मीही एकटाच होतो, पण वेगवेगळ्या टेबलांवर बसलो होतो.”

“मग वाडीकडे येणाऱ्या रस्त्यावर तुम्ही एकत्र कसे काय आला?” अल्फा.

“आम्ही दोघं जवळपास एकाच वेळी उठलो. पण तो खुपच जास्त प्यायलेला होता आणि त्याला धड चालताही येत नव्हतं. मीही वाडीतच जाणार होतो आणि त्याचं घरही वाडीतच होतं.

मग मला माणुसकी म्हणून त्याला सोबत घेऊन जावंसं वाटलं. रस्त्यात कुठेतरी पडेलबिडेल म्हणून मी त्याला सोबत घेतलं.”

“तुम्ही त्याच्या आधीपासून तिथं बसला होता, तरीही तुम्ही शुद्धीवर होता ; आणि तो नंतर येऊनही तर्रर्र झाला. हे कसंकाय?”

“मी माईल्ड घेतो. मला आधी खूप प्यायची सवय लागली होती. पण बऱ्याच कष्टाने मी ती कमी केली आहे. तरीही कधीकधी ताबा रहात नाही. अशा वेळी मी केवळ तहान शमविण्यासाठी माईल्ड घेतो. पण विक्रमला स्ट्राँग घ्यायची सवय आहे. त्यामुळे त्याला लगेच चढते.”

“अच्छा. तुम्ही किती वाजता घराकडे यायला निघाला?”

“सव्वाबारा वाजता.”

“आता पुढचं नीट आठवून सांगा. तुम्ही उठल्यानंतर कोणी तुमच्यापाठोपाठ उठल्याचं तुम्हाला आठवतं का? किंवा कोणी तुमच्या मागोमाग येत होतं असं काही?”

“नाही.. मला तरी असं काही जाणवलं नाही.” दत्ताजी विचार करून म्हणाला.

“तुम्हाला येताना रस्त्यात कोणी भेटलं का? तुमच्याशी कोणी बोललं का?”

“नाही. बराच उशीर झाला होता. त्यामुळे गावात किंवा रस्त्यावर कोणीच नव्हतं.”

“रस्त्यावरून जाताना तुम्हाला आजूबाजूने काही आवाज आले का? चालण्याचे, किंवा सायकलचे.. कोणी तुमच्या मागावर आहे असं भासवणारे? नीट विचार करून सांगा..” अल्फाने डोळे बारीक करत विचारले.

“नाही. पूर्ण रस्ता सुनसान होता आणि कसलाच आवाज येत नव्हता. विक्रम जोरजोरात काहीतरी बडबडत होता. कदाचित त्या आवाजात बाकीचे आवाज दबले गेले असू शकतात.” दत्ताजी उत्तरला.

“जेव्हा विक्रमवर हल्ला झाला, तेव्हा नक्की काय घडलं?”

“आम्ही जवळपास अर्ध्या रस्त्यात आलो होतो. विक्रमला धरून मी पुढं चालत होतो. पण तो वारंवार माझा हात झटकून मागे रहात होता. त्या क्षणी मी पुढे आणि तो मागे होता आणि मी त्याला पाहू शकत नव्हतो.“

“किती पुढे होता?”

“अं.. साधारण दहाएक फूट पुढे असेन. अचानक मला हलकासा ओरडल्याचा आवाज आला आणि धप्पकन काहीतरी खाली पडल्याचा आवाज आला. विक्रमची बडबड एकाएकी थांबली आणि सगळीकडे शांतता पसरली. मी काय झालं, हे पहायला मागे वळलो तर विक्रम रस्त्यावर आडवा झालेला मला दिसला. मला वाटलं तो झोकांड्या खाऊन खाली पडला असेल. मी त्याला एकदोनदा हाक मारली, पण त्यानं काहीच उत्तर दिले नाही. मी त्याच्या जवळ जाऊन पाहतो, तर त्याच्या मानेखालून काळसर गडद रंगाचं काहीतरी ओघळताना मला दिसलं. ते रक्त होतं. विक्रमचा चेहरा स्थिर होता आणि डोळे सताड उघडे होते. तो मेला होता.”

“काल रात्री कितपत चंद्रप्रकाश होता?” अल्फा.

“बराच होता.. त्या ठिकाणचं सगळं स्पष्ट दिसत होतं. फक्त थोडंसं धुकं असल्यामुळे दूरचं दिसलं नसतं.”

“धुकं होतं? कितीसं धुकं होतं?”

”फार नव्हतं. अगदीच तुरळक.“

“त्यात लपून कोणी पळून जाऊ शकलं असतं का”

“छे छे. मुळीच नाही.”

“म्हणजे तो सगळा रस्ता आणि बाजूचा परिसर तुम्हाला व्यवस्थित दिसत होता, असंच ना?”

“हो.”

“बरं.. या वेळी तिथे आजुबाजुला कोणी दिसलं का तुम्हाला?” अल्फा.

“नाही. तिथे कोणीच नव्हतं.” दत्ताजी.

“पुन्हापुन्हा विचार करून सांगा. विक्रमच्या मागं रस्त्यावर कोणीच नव्हतं? तो दगड त्याच्या डोक्यात मारणारं?” अल्फा.

“नाही.”

“त्या ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना काय आहे?” अल्फा.

“दोन्ही बाजूला दूरपर्यंत पसरलेली शेतजमीन आहे.”

“त्यावर काही लागवड केली आहे का?”

“नाही. सध्या ती ओसाडच आहे.”

“थोडक्यात, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना लपण्यासाठी असे काहीच ठिकाण नाही, हो ना?“

“होय.”

“त्या बाजूला एखादी हालचाल दिसली नाही? बारीक अशी?”

“अं.. मी रस्त्याच्या बाजूला फार बारकाईने पाहिलं नाही. पण मला नाही वाटत की विक्रमला दगड मारून कोणी बाजूच्या ओसाड माळावर पळालं असेल. कारण विक्रम जेव्हा खाली

कोसळला, त्याच्या पुढच्या सेकंदाला मी मागे वळलो होतो आणि तिथं मागच्या सेकंदासारखीच नीरव शांतता होती. एखादा दगड मारून पळाला असताच, तर एकदोन सेकंदांत माझ्या नजरेच्या पल्ल्याच्या पलीकडे जाऊ शकला नसता." दत्ताजी म्हणाला.

"मग मला सांगा दत्ताजी, की खूनी नक्की गेला कुठं?" अल्फाने जोर लावून विचारलं,"एका सेकंदासाठी तो रस्त्यावर प्रकट झाला, त्याने विक्रमच्या डोक्यात दगड घातला आणि तुम्ही मागे वळायच्या आत तो अदृश्यही झाला? हे निश्चितच अविश्वसनीय आहे, दत्ताजी. तुम्ही नक्कीच काहीतरी महत्त्वाचं नजरेआड करताय, विसरताय. काहीतरी वेगळं नक्की घडलं असलं पाहिजे!"

दत्ताजीने डोकं धरलं आणि तो ओरडला,

"मला यापेक्षा अधिक काही नाहीये आठवत! देवाची शप्पथ!! मी खरंच सांगतोय!! हेच घडलं होतं तिथं."

अल्फाने एक मोठा निश्वास सोडला.

"बरं.. पुढे काय घडलं? विक्रम मेलाय, हे कळाल्यानंतर पुढच्या पाचदहा मिनिटांत तुम्ही काय केलं? मला अगदी बारीकसारीक तपशीलसुद्धा द्या."

"मी प्रथम विक्रमला हलवून उठवण्याचा प्रयत्न केला." दत्ताजी म्हणाला,"पण तो काही उठायला तयार होईना. मग मी इकडंतिकडं पाहिलं. आजुबाजुला दृष्टीक्षेपात कोणीच दिसत नव्हतं. मी पुन्हा त्याला ओरडून हलवले. माझ्या लक्षात आलं, की तो मेलाय. मी प्रचंड घाबरलो. मला काय करावं तेच सुचत नव्हतं. मी जोरजोरात मदतीसाठी ओरडू लागलो. जवळपास दहा मिनिटे मी रस्त्यावर पुढेमागे धावत ओरडत होतो. अखेर दहा मिनिटांनी मला गावातून वाडीच्या दिशेने येणारा एक सायकलस्वार दिसला. ते मराठे मास्तर होते."

"ते इतक्या रात्री गावात काय करायला गेले होते?" अल्फा.

“मला ठाऊक नाही. हे जाणून घेण्याच्या परिस्थितीत मी नव्हतोच.” दत्ताजी म्हणाला,”गावच्या मारूती मंदिरात बऱ्याचदा रात्री उशिरापर्यंत प्रवचने होत असतात. त्याला वाडीतून बरेच लोक जातात. कदाचित तिकडेच ते जाऊन येत असावेत.”

“बरं, पुढे काय घडलं?”

“ते आमच्या जवळ येऊन थांबले आणि सायकलवरून उतरले. त्यांनी खाली पडलेल्या विक्रमजवळ जाऊन पाहिलं. त्याच्या डोक्याला झालेली जखम, तिथे बाजूला पडलेला दगड आणि समोर उभा असलेला मी, या सगळयाकडे पाहून मीच विक्रमचा खून केलाय अशी त्यांची समजूत झाली. ते घाबरून सायकलजवळ पळाले आणि ती घेऊन जोराने वाडीच्या दिशेने गेले. मी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, पण काही फायदा झाला नाही.”

आम्ही मान डोलावली. दत्ताजी पुढे म्हणाला,

“मग काही मिनिटे मी तसाच बसून राहिलो. माझ्यावर आलेल्या संकटाची मला आत्ता कुठे जाणीव व्हायला लागली होती. तितक्यात पुढून वाडीकडून एक माणूस मला चालत येताना दिसला.”

आम्ही एकदम कुतुहलाने पुढे झुकलो. पण आमची निराशा झाली.

“तो राजाराम चव्हाण होता, वाडीतच राहणारा एक शेतकरी, आमचा शेजारी.” दत्ताजी म्हणाला.

“तो एवढ्या रात्री कुठं चालला होता?” अल्फा.

“माहित नाही. बहुतेक त्याला मराठे मास्तर भेटले असावेत. तो थेट विक्रमच्या प्रेतापाशी गेला आणि त्याने वाकुन पाहिलं. मग एकदम माझ्या अंगावर आला. तो माझा चांगला मित्र आहे. ‘तू हे काय केलंस? ‘ असे तो मला वारंवार विचारत होता. मी त्याला कितीदा सांगितलं, की मी

विक्रमला नाही मारलं. पण त्यानं ऐकलंच नाही. त्यापाठोपाठ गावातून सायकलवरून येणारा संदीप साठेही तिथं थांबला. मग मास्तरांनी वाडीतून काही लोक बोलावून आणले आणि मला सगळ्यांनी मिळून पोलीसांच्या हवाली केलं.“

दत्ताजीचं बोलून झालं. अल्फा त्याच्या छोट्याशा डायरीत त्याला महत्त्वाचे वाटणारे मुद्दे टिपून घेत होता. अखेर त्यानं विचारलं,

“अच्छा. याहून अधिक तुम्हाला काही सांगायचंय का? काल किंवा गेल्या काही दिवसांत घडलेली एखादी विचित्र घटना, तुमच्या अथवा विक्रम सपकाळच्या बाबतीतली.. जिचा काही संबंध नाही असं वाटत असलं तरीही.”

दत्ताजीने थोडा वेळ घेतला.

“सध्या तरी काही आठवत नाहीये.” तो म्हणाला.

“ठीक आहे.” अल्फा आपली डायरी मिटत म्हणाला,”मी तुम्हाला खोटं आश्वासन देणार नाही, संजय आणि दत्ताजी. प्रकरण किचकट आहे आणि यात बऱ्याच चमत्कारिक वाटाव्यात अशा घटना समाविष्ट आहेत. त्यांचा उलगडा करणं निश्चितच कठीण जाणार आहे. आपल्याला जितक्या लवकर पुरावे मिळतील, तितक्या लवकर आपण गुन्हेगारापर्यंत पोहोचू शकू. पण त्याला किती वेळ लागेल, हे मी सांगू शकत नाही. तुम्ही काल अल्कोहोल घेतलेले असल्याने गोष्टी अजूनच वाईट झालेल्या आहेत. पण आपण प्रयत्न करू.”

“मी पुन्हा कधीच पिणार नाही, खरंच. देवाची शप्पथ.. फक्त मला या भानगडीतून सोडवा!” दत्ताजी काकुळतीला येऊन म्हणाला. त्याच्यासारखा दणकट गडी अशा परिस्थितीत येऊन पडल्याचं पाहून मला वाईट वाटलं.

“आणखी काही लागलं, तर तुम्हाला विचारायला येऊच.” अल्फा म्हणाला,”काळजी घ्या.”

आम्ही तिथून बाहेर आलो. अल्फाने तिथल्या एका हवालदाराला विचारलं,

“काल विक्रम सपकाळच्या खुनात जो दगड वापरण्यात आला होता, तो कुठं आहे सांगाल का?”

त्यानं आम्हाला विरुद्ध बाजुच्या एका खोलीत नेलं. तिथे बरीच कपाटं होती. त्यानं त्यातलं एक उघडलं आणि पॉलिथीनच्या पिशवीत ठेवलेला एक दगड आमच्यासमोर ठेवला. अल्फाने त्याचं काळजीपूर्वक निरीक्षण केलं. त्या दगडावर बरंच सुकलेलं रक्त दिसत होतं. ते पाहून मला शिरशिरीच आली. विक्रमच्या डोक्याचे काय हाल झाले असतील, हे त्या दगडाकडे बघूनच कळत होतं. अल्फाने ती पिशवी हातात घेऊन सर्व बाजूंनी फिरवली आणि वरुनखालून सगळ्या बाजूंनी तो दगड निरखून पाहिला. मग तो हातात घेऊन एकदोनदा वरखाली केला. बहुधा तो त्याच्या वजनाचा अंदाज घेत असावा. त्याच्या चेहऱ्यावर गूढ भाव पसरले होते. त्याच्या मनात नक्कीच काहीतरी क्लिष्ट समीकरणे बनत असणार आहेत हे मी ताडलं.

अखेर अल्फाने तो दगड ठेवून दिला. आम्ही त्या हवालदाराचे आभार मानले आणि पोलीस स्टेशनच्या बाहेर पडलो.

“आता कुठं जायचंय तुला?” संजयने विचारले.

“अर्थातच, ही घटना जिथे घडली, त्या ठिकाणी!” अल्फा सगळे काही आधीपासूनच ठरवलेले असल्यासारखा म्हणाला.

“ठीक आहे. चला माझ्या मागे.” संजय म्हणाला.

आम्ही चालतच त्याने दाखवलेल्या वाटेने निघालो.

*

# 3.

आम्ही गावामध्ये ज्या दिशेने प्रवेश केला होता, त्याच्या बरोबर विरुद्ध दिशेने संजय आम्हाला घेऊन गेला. खरंच ते गाव फार छोटं होतं. अर्ध्या तासात आम्ही चालत ते पारही केलं. मध्ये अल्फा मला म्हणाला होता, ते गावचं प्रसिद्ध मारुती मंदिरही लागलं. गावाच्या आत बस येत नव्हती, कारण तिथले रस्ते फारच अरुंद होते. गावाच्या सर्व बाजूंनी शेतं असल्यामुळे गावात शेतकऱ्यांची संख्या जास्त होती. फार मोठ्या इमारती वगैरे नव्हत्याच. पण तिथली स्वच्छता मला भावली. इथली ग्रामपंचायत बरीच कार्यक्षम असावी, असं मला वाटलं.

दुपारचे बारा वाजून गेले होते आणि सूर्य डोक्यावर चांगलाच तळपू लागला होता. मी चालता चालता दमून गेलो. पण अल्फा आणि संजय न थांबता चालत होते. अखेर आम्ही गावाच्या दुसऱ्या टोकाला आलो. या बाजूला हळूहळू घरे आणि वस्ती तुरळक होत गेली होती आणि शेते, माळराने यांचा भाग सुरू झाला होता. या भागातून वळणे घेत जाणाऱ्या एका रस्त्यापाशी आम्ही आलो.

“हाच तो रस्ता.” संजयने त्या रस्त्याकडे बोट दाखवत म्हटले,”आपण आत्ता ज्या वाटेनं आलो, त्याच वाटेनं  काल काका आणि विक्रम आले होते. या रस्त्यावरून पुढे एक-दीड किलोमीटर गेलं, की आमची वाडी लागते. तोही गावाचाच भाग आहे, पण काही लोकांची शेतं त्या बाजूला

असल्याने बऱ्याच वर्षांपूर्वी त्यांनी तिकडेच घरे बांधली. आमचं आणि विक्रमचं घर तिथेच आहे. तिकडे जायला शक्यतो लोक हाच रस्ता वापरतात.”

“काल गुन्हा घडला, ते ठिकाण इथून किती दूर आहे?” अल्फाने विचारले.

“निम्म्या वाटेवर आहे. दहा मिनिटे चालल्यानंतर पोहोचूच आपण.” संजय म्हणाला.

मी ते ऐकून ढेपाळलोच. इतके कष्ट करायची मला कधी सवयच नव्हती. पण अल्फा आणि संजय पुन्हा चालू लागल्यानंतर मला काही पर्यायाच उरला नाही. संजयसाठी हा नेहमीचाच रस्ता असल्याने तो थकत नव्हता आणि अल्फाला त्याच्या समोर उभे ठाकलेले रहस्य आपोआपच खेचून नेत होतं. पण त्यांच्यात माझी चांगलीच पंचाईत झाली होती. मी सुस्त जीवन झटकून व्यायामाला सुरुवात करायला हवी, असं मला वाटलं.

अखेर एका ठिकाणी येऊन संजय थांबला. हे तेच ठिकाण होते.

“इथे बघा.” संजयने ती जागा दाखवली. तिथे एक गडद लाल रंगाचा एक सुकलेला ओहोळ दिसत होता. इथेच काल रात्री विक्रमचा खून झाला होता. अल्फा खाली बसला आणि ती जागा न्याहाळू लागला. आम्ही आमचा थकवा विसरून तो काय करतोय हे पाहू लागलो.

त्याने रक्त सांडलेले ठिकाण काळजीपूर्वक तपासलं. मग आजुबाजूचा रस्त्याचा भाग पाहिला. कुठे काही पुरावा मिळतोय का, हे तो धुंडाळू लागला. पण ती घटना घडून चांगला निम्मा दिवस उलटलेला असल्याने आणि त्यादरम्यान बऱ्याच लोकांनी तिथून ये-जा केलेली असल्याने तिथले सगळे पुरावे धुळीला मिळाले होते. जे काही निशाण होते, तेही विश्वास ठेवण्याजोगे नव्हते, कारण ते खुनाच्या वेळचे आहेत की त्यानंतरचे, याबद्दल काहीच भाष्य करता येत नव्हतं. त्यामुळे आम्हाला तिथं फार काही सापडलं नाही. अल्फाने रस्त्याच्या दोन्ही बाजुंना पाहिलं. दोन्ही बाजुला दूरपर्यंत पसरलेली काळ्या रंगाची ओसाड शेतजमीन होती.

“काल रात्रीपासून इथं काही बदललं नाहीये ना?” त्याने संजयला विचारले.

“म्हणजे?” ‘बदललं नाही ‘ चा अर्थ त्याला कळाला नाही.

“म्हणजे, एखादी वस्तू जी आधी इथे होती, पण कालच्या प्रसंगानंतर इथून गायब झाली – किंवा याउलट – एखादी वस्तू आधी इथे नव्हती पण अचानक इथे येऊन पडली आहे.. असं काही?”

आम्हा दोघांनाही त्याच्या प्रश्नाचा रोख कळाला नाही. पण संजयने मानेनेच ‘नाही’ असे म्हणत अल्फाच्या शंकेचे निरसन केले. अल्फाने स्वतःशीच चर्चा करत असल्यासारखी मान हलवली आणि मागच्या दिशेने पाहिले. गावाच्या दिशेने तोंड करून उभारल्यावर काही अंतरावर रस्त्याच्या दोन्ही बाजुंना शेत सुरू होत होतं. ते चांगले पाचसहा फूट वाढलेल्या ऊसाचं शेत होतं.

“प्रभू, ते ऊसाचे शेत या ठिकाणाहून किती अंतरावर असेल? अंदाजे?” अल्फाने मला विचारलं.

“अं.. कमीतकमी सत्तर-ऐंशी फूट तर असेल इथून.” मी म्हणालो.

“हं. म्हणजे या ठिकाणाहून सर्वात जवळची लपायची जागा ऐंशी फूट अंतरावर आहे, असं म्हणायला हरकत नाही.” तो म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर कोड्यात पडल्याचे भाव होते. मी अल्फाला खोडून काढता येईल का, या विचाराने सगळीकडे पाहिले. पण दोन्ही बाजूंनी सताड उघडी जमीन असल्यामुळे लपण्यासारखी कोणतीच जागा नव्हती. ते काही अंतरावर असलेलं शेत हीच सगळ्यात जवळची लपायची जागा होती.

“इथून त्या शेतापर्यंत पळत जरी गेलं, तरी दहाएक सेकंद तरी नक्कीच लागतील.” मी अल्फाचे विचार कोणत्या दिशेने धावताहेत, हे ओळखून म्हणालो.

“अगदी बरोबर. दत्ताजींना मागे वळायला जास्तीत जास्त दोन सेकंद लागले असतील, असे आपण धरू. मग एवढ्या कमी वेळात गुन्हेगार नाहीसा कसा झाला? आणि कुठे झाला??”

त्याने आमच्यासमोर प्रश्न टाकला. मीही त्याच गोष्टीचा विचार करत होतो. हे अशक्य होतं. संजय त्याच्या काकाला निर्दोष म्हणवत होता खरा, पण तोही गोंधळलेला दिसत होता.

“यक्षप्रश्न आहे हा.. फारच कठीण प्रश्न! गोंधळात पाडणारा..” अल्फा स्वतःशीच बडबडत होता. त्याने पुन्हा सगळया दिशांना पाहिलं आणि आपले काही बघायचे राहात तर नाहीये ना, याची खात्री करून घेतली. मग तो आम्हाला म्हणाला,

“चला, त्या शेताकडे जाऊ.”

आम्ही त्या दिशेने चालत निघालो. ती ओसाड जमीन संपून एका ठिकाणी शेत चालू होत होतं. दोन्हीच्या मध्ये कुंपण वगैरे काहीच नव्हतं. तिथे फक्त एक पायवाटेसारखा जमिनीचा अरुंद पट्टा होता. अल्फा प्रथम त्या मधल्या अरुंद भागाची तपासणी करू लागला. तिथे काही मिळत नाही, हे समजल्यानंतर तो शेतात शिरला. आम्हीही अलगदपणे त्याच्या मागोमाग गेलो. ऊस बराच दाटीवाटीने लावला होता. पायांत काळी माती होती, पण कसलेही निशाण दिसून येत नव्हते. ते शेत बरेच मोठं होतं. आम्ही फार आत न जाता फक्त ओसाड जमिनीच्या बाजूचा शेताचा भाग पायाखालून घातला आणि पुन्हा रस्त्यावर आलो. मग अल्फा रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या शेतात शिरला. तिथेही मघासारखीच थोडी तपासणी झाली. अल्फाला काही समाधानकारक पुरावा मिळालाय, असे एकूणच दिसत तरी नव्हतं. साहजिकच गुन्हेगार विक्रमच्या डोक्यात दगड घालून इतक्या कमी वेळात या शेतामध्ये लपायला येऊ शकणार नव्हता, तेही संजयच्या काकाला लक्षात न येता. त्यामुळे जर तो इथे आलाच नसेल, तर त्याचे निशाण तरी आम्हाला कसे मिळणार? यामागे काहीतरी वेगळं असणार, नक्कीच, मी विचार केला.

आम्ही परत रस्त्यावर आल्यानंतर एकदम अल्फाच्या मनात काय आलं कोण जाणे. तो पुन्हा खून घडलेल्या ठिकाणी जाऊ लागला. आम्ही काहीच न कळून मघापासून जसा करत होतो, तसाच त्याचा पाठलाग केला. तो खुनाच्या ठिकाणी आला आणि तिथून रस्त्याला समांतर असणाऱ्या बाजुच्या शेतजमिनीवर उतरला. ती जमीन पिकाखाली नसल्यामुळे कोरडी ठणठणीत

पडली होती. दुपारच्या उन्हात तापलेल्या त्यावरच्या मातीवरून गरम झळा परावर्तित होत होत्या. अल्फाने तिथेही खाली बसून बारकाईने जमिनीचे आणि त्यावरच्या मातीचे निरीक्षण केले. जसे रस्त्याच्या एका बाजूला, तसेच दुसऱ्या बाजूला. साधारण अर्ध्या तासात आम्ही खून झालेल्या ठिकाणाच्या भोवतालचा जवळपास सगळा परिसर पायाखाली घातला होता. अखेर अल्फा म्हणाला,

“ठीक आहे. इथलं काम झालंय. आता आपण निघुया.”

त्याच्या चेहऱ्यावर तटस्थ भाव होते. त्याला काही सूचक पुरावे मिळाले आहेत की नाही, हे मला सांगता आलं नसतं. पण मला तर त्या सगळ्या भागात विशेष असं काहीच दिसलं नव्हतं.

संजयने आम्हाला त्याच्या घरी चलण्याचा आग्रह केला. त्याचे घर त्या रस्त्यावरून आणखी काही अंतर पुढे होते. माझ्या चेहऱ्यावरचा वैताग पाहून तो म्हणाला,

“सॉरी हां.. खूप चालवलं मी तुम्हाला. मी आमच्या घरची टू व्हीलर आणली असती, पण हा अल्फा म्हणाला, की तुम्ही दोघेजण येताय. त्या गाडीवर आपण तिघे बसणार नाही, असे वाटून मी चालतच आलो.”

“हरकत नाही रे.. ही शहरातली पोरं जरा ढिम्मच असतात. याच्या चेहऱ्याकडे लक्ष देऊ नकोस.” अल्फा मला टोला हाणत म्हणाला. मी कसाबसा हसलो आणि संजयला ‘इट्स ओके’ म्हणालो. मला बहुतेक माझ्या चेहऱ्यावर पटकन बोलके भाव न आणण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज होती.

संजयचं घर एखाद्या खेड्यातल्या घराला शोभेल, असंच होतं. एकमजली, बसकं आणि जुन्या पद्धतीचं. अंगण शेणानं सारवलं होतं. मागच्या बाजूला जनावरांचा गोठा होता. घर साधंच होतं, पण त्या साधेपणातही एक सुंदरता होती. घरात तो, त्याचे आईवडील, आजोबा, त्याचा लहान भाऊ आणि त्याच्या काकाची, दत्ताजीची बायको असे सगळेजण रहात होते. दत्ताजीच्या

अटकेमुळे सध्या त्या सर्वांचेच चेहरे उदास आणि चिंताग्रस्त झाले होते. संजयच्या आईने आम्हाला जेवण वाढले आणि कडाडून भूक लागलेली असल्यामुळे मला ते फारच चविष्ट लागले. घरी न गेल्याने राहून गेलेले ‘घरचे जेवण’ माझ्या अखेर नशिबी लागले.

“मी तुम्हाला खात्रीशीरपणे सांगतो, दत्ता खूनी असूच शकत नाही.” आम्ही जेवताना संजयचे वडील व्याकुळ होऊन बोलत होते,”भलेही तो हट्टाकट्टा आणि शीघ्रकोपी असेल, पण खून – शक्यच नाही! तुम्ही गावातल्या कुणालाही विचारा. तो नेहमी सगळ्यांचं चांगलंच पाहात आला आहे. तो विक्रम तसेही वाया गेलेला माणूसच होता. त्याला मारून दत्ताला काय मिळणार आहे?”

“काका, मला एक सांगा, तुमचा विक्रमशी जमिनीवरून कसला वाद होता? मला संजय म्हणाला.” अल्फानं विचारलं.

“जमिनीवरून? अच्छा शेतजमिनीचा.. हां. तो तर वर्षानुवर्षे चालत आलेला वाद आहे. त्याचं शेत आमच्या शेताला लागूनच आहे ना. आणि दोघांच्या मध्ये कंपाऊंड नाहीये. मग कधीकधी तो आमच्या जमिनीतल्या काही भागावर आपला हक्क सांगायचा. मध्ये एकदा त्यानं कुंपण बांधायचं काम काढलं होतं, तेव्हा तो आमच्या शेतातून कुंपण घालायला निघाला होता. दत्ताजी आणि त्याच्यात बरेच वाद झाले तेव्हा. मग पंचायतीच्या काही लोकांनी मध्यस्थी करून तो वाद मिटवला आणि विक्रमला कुंपण घालण्यास मनाई केली.”

“ही घटना कधी घडली होती साधारण?”

“गेल्या वर्षीची गोष्ट आहे ही.”

“दत्ताजी आणि विक्रमच्यात अलिकडे काही वादावादी नव्हती ना झाली?” अल्फा.

“नाही. पण तो वाद झाल्यापासून ते दोघं एकमेकांशी बोलत नव्हते.” संजयचे वडील उत्तरले,”पण तू हे सगळं का विचारतोयस? तुला असं तर नाही ना वाटत, की दत्तानेच खून केलाय?”

“छे हो! मी फक्त माहिती करून घेत होतो. लोक हा मुद्दा त्यांच्याविरुद्ध वापरू शकतात ना. पण ही गोष्ट घडून वर्षभर झालेलं असल्याने तो मुद्दा फोल आहे, असं उत्तर आपण देऊ शकतो.” अल्फा सारवासारव करत म्हणाला.

“हा माझा मित्र पोलीसांच्या शोधकामात सहभाग घेतो. तो यात आपल्याला काही मदत करू शकेल, यासाठी मी त्याला बोलावलंय.” संजय त्याच्या वडीलांना म्हणाला.

“होय का? या खुनाचा शोध घेता आला तर घ्या.. मला तर काहीच समजेनासं झालंय. दत्ताजी सांगतोय खरं, पण त्याच्या बोलण्यावर लोक विश्वास कसा ठेवणार, हे मला कळत नाहीये. आणि काही दुसरा मार्गही दिसत नाहीये.” ते बोलले.

“हो, आम्ही थोडा शोध घेऊन पाहतो, काही मिळतंय का ते.” उत्तरादाखल अल्फा म्हणाला.

जेवण झाल्यानंतर आम्ही काही वेळ स्वस्थ बसलो. अल्फाचा मनातल्या मनात विचार चालूच होता. थोडा वेळ गेल्यानंतर तो हळूच संजयला म्हणाला,

“मला तुझ्या काकांची खोली बघायची आहे. त्यांचं सामान वगैरे जिथे असतं, ती खोली.“

“बरं. ये दाखवतो.” तो आम्हाला आतल्या खोलीत घेऊन गेला. छोटीशीच खोली होती ती. अल्फाने केवळ सर्वत्र नजर फिरवली. कोणत्याही वस्तूला स्पर्श केला नाही. साहजिकच संजयच्या समोर असे करणे योग्य दिसले नसते. पाचेक मिनिटं तो केवळ सर्वत्र नजर फिरवत राहिला. शेवटी त्याचं समाधान झालं आणि आम्ही बाहेर आलो.

“मी जरा फिरून येतो. तुम्ही थांबा इथेच.” अल्फा म्हणाला,”संजय, विक्रमचं घर कुठं आहे इथून?”

विक्रमने त्याला रस्ता सांगितला. अल्फा बाहेर गेला. मी आणि संजय असेच काही वेळ गप्पा मारत बसलो. ऊन उतरायची वेळ झाली आणि अल्फा परतला. त्याच्या चेहऱ्यावर मघासारखेच तटस्थ भाव होते.

“चला, निघायची वेळ झाली.” तो म्हणाला.

“मग शेवटी तुझं काय मत बनलंय या सगळयाबद्दल? विक्रमचा खून कोणी केला असावा? आणि कसा? आज घेतलेला शोध पुरेसा आहे, की तू अजून काही पाहणार आहेस?” संजयने प्रश्नांमागून प्रश्न विचारले. अल्फाने अनिश्चिततेने खांदे उडवले आणि तो म्हणाला,

“मला अजून काहीच अंदाज आलेला नाहीये, की कालचा खून कसा झाला आणि कोणी केला. आज घेतलेला शोध खचितच पुरेसा नाहीये, संजय. अजून काही गोष्टी पाहणे आवश्यक आहे. आम्ही उद्या पुन्हा येऊच. तोपर्यंत शक्यतो मला काही नवीन माहिती मिळाली असेल, अशी अपेक्षा करुया.”

आम्ही तेथून निघालो. संजयही आम्हाला सोडायला म्हणून आमच्यासोबत आला. पूर्ण गाव चालत परत एकदा पार करणं म्हणजे माझ्यासाठी नामुष्कीच होती. पण एकमेकांशी बोलत बोलत आम्ही कधी पुन्हा मुख्य हायवेला आलो, ते कळालंच नाही. अल्फा नेहमीप्रमाणे विविध विषयांवर न थकता बोलत होता. पण पूर्ण रस्त्यात त्याने खूनाचा विषय मात्र काढला नाही. आम्ही मुख्य रस्त्यावरील तुंग गावाची पाटी लिहिलेल्या स्टॉपपाशी आलो.  तिथून आष्ट्याहून सांगलीला जाणारी गाडी आम्हाला पकडायची होती. सूर्य अस्ताला जाऊन अंधार पडत असताना आम्ही बसमध्ये बसलो आणि संजयचा निरोप घेतला.

सुरुवातीला बराच वेळ अल्फा शांतपणे खिडकीतून बाहेर पहात होता आणि मीही काही बोलत नव्हतो. पण माझ्या मनातून काल रात्री घडलेल्या प्रसंगाचं संजय आणि त्याच्या काकांनी केलेलं वर्णन काही जात नव्हतं. एका बाजूने त्या दोघांनी सांगितलेल्या हकिकतीची सत्यता पटतही होती आणि दुसऱ्या बाजूने ती अशक्य, काल्पनिकही वाटत होती. साहजिकच अल्फाने

दिवसभराच्या विचारमंथनानंतर त्यावर काही मते बनवलेली असणारच होती. त्याबद्दल त्याला विचारून मी आमच्यातली शांतता भंग केली,

“मग? काय वाटतंय तुला?” मी म्हणालो,”विक्रम सपकाळचा खूनी खरंच दुसरा कोणीतरी आहे, की संजयचे काका खोटी कहाणी बनवून आपल्या सर्वांची दिशाभूल करतायत?”

त्याने त्याची नजर खिडकीवरून माझ्यावर वळवली आणि तो हलकेच हसला.

“खूपच प्राथमिक प्रश्न विचारलास तू प्रभू. प्राथमिक, पण महत्त्वाचा.. अतिशय महत्त्वाचा! खरं म्हणजे मी तुझे यासाठी आभारच मानले पाहिजेत. या प्रश्नावर विचार आणि चर्चा होणं फारच गरजेचं आहे. खून नक्की कोणी केला? संजयच्या काकांनीच तर नाही? संजयने आणि त्यापाठोपाठ त्याच्या काकांनी सांगितलेली कहाणी कितपत खरी होती? जर ते खरोखरच खरं बोलत असतील, तर इतक्या माईंडब्लोईंग पद्धतीने खून करणारा चाणाक्ष गुन्हेगार कोण असावा? जोपर्यंत या प्राथमिक प्रश्नांची मीमांसा करून आपण एका पक्क्या निष्कर्षावर येत नाही, तोपर्यंत पुढच्या घटनांचा विचारही करणं व्यर्थ आहे.”

त्याने एक मोठा श्वास घेतला आणि तो पुढे म्हणाला,

“मीही संजयचे कथन ऐकल्यापासून प्रत्येक बारीकसारीक गोष्टीवर विचार करतोय, त्यांचं विश्लेषण करतोय. दिवसभराच्या तपासानंतर जर मला तू विचारशील की दत्ताजीच खुनी आहे की नाही, तर मी हे उत्तर देईन – हो – आणि नाही.. दोन्हीही!!”

“म्हणजे?” अल्फाच्या कोड्यात बोलण्याला सरावण्याचा प्रयत्न करत मी विचारलl.

“म्हणजेच, दत्ताजी खुनी आहे आणि आणि नाही, हे दोन्ही दर्शविणाऱ्या गोष्टी आज दिवसभरात मला मिळाल्या आहेत किंवा दिसल्या आहेत असं म्हण. आपण दोन्ही बाजूंनी विचार करून पाहू. मी तुला मला जाणवलेल्या काही गोष्टी सांगतो आणि त्यावर तू विचार कर. पहिली बाजू – खून दत्ताजीनेच केला आहे आणि तो सांगत असलेली सगळी हकिकत बनावट आहे. असं

मला का वाटतं, हे मी तुला सांगतो. पहिलं कारण अगदी सरळसरळ आणि सर्वांना जे वाटतं, तेच आहे – खुनाच्या ठिकाणी दत्ताजी एकटाच होता आणि डेडबॉडीसोबत त्याला अगदी रंगेहाथ म्हणता येईल, असं पकडलं गेलंय. त्याच्या कपड्यांवर, हातांवर रक्ताचे डाग आहेत. त्या रस्त्यावर त्यावेळी दुसरं कोणीही नव्हतं आणि तो सांगत असलेली कहाणीही विश्वास ठेवण्याजोगी नाही. विक्रमच्या डोक्यात दगड घालून खूनी दोन सेकंदांत नाहीसा झाला, यावर एखादा मूर्खही विश्वास ठेवणार नाही. दुसरं कारण – त्या दोघांचे काही वैयक्तिक वाद होते आणि त्याच्याजवळ विक्रमला मारण्याचं कारणही होतं. त्यामुळे त्याच्यावरचा संशय अधिकच बळकट होतो. आणि तिसरं, माझ्या दृष्टीने सर्वात मुख्य कारण म्हणजे विक्रमला ज्याने मारलं गेलं, तो दगड!!”

मी बुचकळ्यात पडलो.

“दगड? त्यावरून तुला काय समजलं?”

“बघ प्रभू, अशा मुख्य पुराव्यांकडे लक्ष देण्याऐवजी लोक वरवरच्या गोष्टींचाच जास्त विचार करत बसतात. तो दगड असा आहे, की क्षणात तो दत्ताजीला डोळे झाकून गुन्हेगार घोषित करू शकतो.”

“ते कसंकाय?”

अल्फाने स्मित केले आणि थोडे थांबून तो माझ्याकडे पहात म्हणाला,

“गणितात एखादा सिद्धांत चूक आहे की बरोबर, हे सिद्ध करण्याची एक पद्धत आहे. जर एखादी गोष्ट चूक आहे हे सिद्ध करायचं असेल, तर सुरुवातीला ती बरोबर आहे, असं गृहीत धरून चालायचं. मग त्यावरून एक एक पायरी करत शेवटी अशा एका पायरीवर यायचं, की जिथं आपण सुरुवातीला बरोबर धरलेल्या गृहीतकातला विरोधाभास आपोआपच समोर येईल आणि ती गोष्ट बरोबर असू शकत नाही, हे आपोआपच सिद्ध होईल. ज्याअर्थी ती बरोबर असू शकत नाही, त्याअर्थी ती चूकच असली पाहिजे! झालं सिद्ध! याला ‘प्रुफ बाय कॉन्ट्रॅडीक्शन’ असे

म्हणतात. अर्थात, तुला तर ठाऊक असेलच हे. तर आता आपण आपल्या मूळ प्रश्नाकडे वळू – तो दगड दत्ताजीला गुन्हेगार कसं घोषित करू शकतो? आपण या प्रश्नाचे उत्तर 'प्रुफ बाय कॉन्ट्रॅडीक्शन' पद्धतीने मिळवण्याचा प्रयत्न करूया. काही वेळासाठी आपण असे मानू, की दत्ताजी गुन्हेगार नाहीये आणि त्यानं सांगितलेली सगळी हकिकत तंतोतंत खरी आहे. त्याने सांगितल्याप्रमाणे खून होण्याच्या वेळी त्याला मागून धपकन् आवाज आला, त्याने मागं वळून पाहिलं, तेव्हा विक्रम खाली पडला होता, त्याच्या डोक्यात कोणीतरी दगड घातला होता आणि त्याचा खून झाला होता. पण पूर्ण रस्ता आणि आजुबाजुचा परिसर रिकामा होता आणि खून करणारी व्यक्ती अचानक नाहीशी झाली होती. आता व्यवस्थित विचार करून मला सांग, की तिथं नक्की काय घडलेलं असू शकतं? खुनी जादूगारासारखा अदृश्य तर होणार नाही. मग नक्की कसं साध्य केलं असेल हे त्यानं? तू या घटनेचं काय स्पष्टीकरण देशील, ज्यामुळे ही हकिकत सत्यतेच्या चौकटीत बसवता येईल?"

मी काही वेळ मेंदूला ताण दिला आणि माझ्या मनात चमकलेली कल्पना मी अल्फाला बोलून दाखवली,

"जर तो दगड लांबून मारला गेला असेल तर?"

"एक्झॅटली!!" अल्फा टाळी वाजवत म्हणाला," जर दगड मारणारा आसपास नाहीये, तर त्याचा सरळसरळ अर्थ असाच आहे, की कोणीतरी तो दगड लांबून मारलाय. हेच योग्य आणि कदाचीत एकमेव स्पष्टीकरण यासाठी दिलं जाऊ शकतं. आता लांबून म्हणजे कुठून? नैसर्गिकपणे जिथे सहज लपता येईल, अशाच ठिकाणाहून गुन्हेगाराने तो दगड मारला असणार.. आणि लपण्यासाठी सर्वात जवळची जागा म्हणजे खून झालेल्या ठिकाणापासून ऐंशी फूट अंतरावर असणारं शेत हे होतं. मग तूच मला सांग प्रभू, जर इतक्या दूर अंतरावरून तो दगड जोराने फेकला गेला असेल, तर तो मोठ्ठा आणि जड असेल का?"

आत्ता माझ्या डोक्यात लख्खकन प्रकाश पडला. मी स्तब्ध होऊन नकारार्थी मान डोलावली.

“लक्षात आला का माझा मुद्दा?” अल्फा चमचमत्या डोळयांनी माझ्याकडे पहात म्हणाला,”ज्या दगडाने विक्रमचा खून झाला, तो दगड मी सकाळी पोलीस स्टेशनमध्ये काळजीपूर्वक पाहिला. तो दगड चांगलाच मोठा आहे आणि वजनाने कमीतकमी दीड-दोन किलो तर नक्कीच असेल. आता असा वजनदार दगड ऐंशी फूट दूर असलेल्या निशाणावर भन्नाट वेगाने तू फेकू शकशील काय?”

“नाही.” मी म्हणालो.

“बरं, याची दुसरी बाजूही मी तपासून पाहिली. समज एखाद्या यंत्राने तो दगड मारला गेला असला, तर तो कदाचित तेवढ्या पल्ल्यावर पोचेलही. पण ते यंत्र काही बंदूकीसारखे खांद्यावर ठेवून मारायचे मुळीच नसणार. एवढा वजनदार दगड मारण्यासाठी ते एका जागी जमिनीवर व्यवस्थित माऊंट करावे लागेल. म्हणजेच ते माऊंट केल्याचे निशाणही आपल्याला त्या शेतापाशी मिळायला हवेत. पण तेही मला कुठेच मिळाले नाहीत. म्हणजेच तो दगड लांबून नाही, तर जवळूनच मारला गेला असला पाहिजे. म्हणजेच, तो दगड मारून खूनी क्षणात नाहीसा होऊ शकत नाही आणि म्हणूनच दत्ताजीने सांगितलेली हकिकतही खरी असू शकत नाही – प्रुफ बाय कॉन्ट्रॅडीक्शन!! निष्कर्ष समोर आहे – तो दगड जवळून विक्रमच्या डोक्यात मारणारा दत्ताजीच असला पाहिजे!!”

अल्फा काही वेळ शांत झाला. त्याचं स्पष्टीकरण ऐकून माझं डोकं हळूहळू बधीर व्हायला लागलं होतं. अल्फाने दिलेल्या तार्किक सिद्धतेचा मी पहिल्या पायरीपासून शेवटपर्यंत पुन्हा विचार केला.

“बरोबर बोलतोयस तू.” अखेर मी म्हणालो.

“म्हणजेच आपल्याकडे तीन कारणं झाली, ज्यांच्या आधारे आपण असं म्हणू शकतो, की खून दत्ताजीनंच केला आहे.” अल्फा म्हणाला.

“पण मघाशी तर तू म्हणालास, की तुला दोन्ही वाटतं – दत्ताजीने खून केला आहेपण आणि नाहीपण? त्या दगडाच्या पुराव्यानंतरही तो खूनी नाही असं तुला का वाटतंय?” मी विचारले.

“हं, ठिकाय. आता आपण आपल्या कथेच्या दुसऱ्या पैलूकडे लक्ष देऊ. दत्ताजी गुन्हेगार का नसू शकतो? कारण जर तो गुन्हेगार असेल, तर त्यानं काल रात्री केलेल्या काही कृत्यांचं स्पष्टीकरण देता येत नाही. आपण पहिल्यापासून एक एक गोष्ट पहात जाऊ. पहिली गोष्ट म्हणजे, तो त्या हॉटेलमधून विक्रमला सोबत घेऊन का निघाला? समजा त्यानं आधीच त्याला मारण्याचा प्लॅन बनवला असेल, तर तो विक्रमच्या काही वेळ आधी निघून त्या सुनसान रस्त्यावर वाट पाहत लपून राहिला असता आणि विक्रम तिथं आल्यानंतर त्याचा खून केला असता. पण त्याने असं केलं नाही. याउलट तो सगळ्या गावाच्या देखत त्याला सोबत घेऊन निघाला. यातून आपला पहिला निष्कर्ष निघतो – जर दत्ताजी खूनी असेल, तर कमीतकमी तो खून पूर्वनियोजित तरी नक्कीच नव्हता.

आता याच्या पुढे जाऊन आपण विचार करू. दत्ताजी आणि विक्रम एकत्र घराकडे जाऊ लागले. दोघंही नशेत होते, दत्ताजीच्या म्हणण्यानुसार विक्रम त्याच्यापेक्षा जास्त नशेत होता. समजा त्या ओसाड शेतजमिनीच्या भागात आल्यानंतर त्यांच्यात काही बोलाचाली झाली, भांडण झालं आणि अनावधानाने दत्ताजीने रस्त्याच्या बाजूला पडलेला एक दगड विक्रमच्या डोक्यात घातला. आता त्याच्यासमोर विक्रम मरून पडलाय आणि गावातून त्या दोघांना एकत्र येताना बऱ्याच जणांनी पाहिलंय. अशा वेळी दत्ताजीला कितीही चढली असली, तरीही ती क्षणात खाडकन उतरेल. त्याला आपल्यावरच्या संकटाची जाणीव होईल. मग पहिली गोष्ट तो काय करेल?”

मी थोडा विचार केला,

“तिथून पळून जाईल?”

“अगदी बरोब्बर!” अल्फा म्हणाला,”कोणी पहायच्या आत तो तिथून धूम ठोकेल. तरीपण तो तिथेच थांबला आणि मदतीसाठी हाका मारत राहिला. का? याचे उत्तर मला सापडत नाही. बरं चल, या परिस्थितीत दत्ताजीला आपण थोडं चालाख बनवू. त्याला लक्षात आलंय, की काहीही झालं तरी आळ त्याच्यावरच येणार आहे आणि पळून जाऊन काही फायदा नाही. म्हणून त्यानं पुढच्या पाच मिनिटांत काहीतरी काल्पनिक कहाणी बनवली आणि रस्त्यावर येणाऱ्यांकडे मदतीची याचना करण्याचे नाटक केले. काय घडलं, असं विचारल्यावर त्यानं ती कहाणी लोकांना ऐकवली. ती कहाणी कशी असेल? ‘आम्ही रस्त्यावरून चालत असताना काही लुटारू आले आणि त्यांनी आमच्यावर हल्ला केला.. विक्रमने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, पण त्याला ठार करून ते पळून गेले. ’ असे काहीतरी... थोडक्यात, काहीही सांगितलं तरी ते लोकांना पटेल असं तो सांगेल. पण त्यानं काय सांगितलं? कुणालाही न पटण्यासारखी एक हकिकत. आता मला सांग, एखादा खूनी स्वतःच्या बचावाकरता असलं काहीतरी सांगेल का? पण तरीही त्यानं तेच सांगितलं. का??”

मी आणि अल्फा क्षणभर एकमेकांकडे टक लावून पहात होतो.

“कारण.. कारण तो खरं बोलत असला पाहिजे..” मी नकळतच बोललो. अल्फा हसला आणि त्याने हात उडवले.

“पाहिलंस, कसा मती गुंग करणारा गोंधळ आहे ते?” तो म्हणाला,”मी दत्ताजीची खोली याच गोष्टीची पडताळणी करण्यासाठी पाहिली, की त्याची जर काही गुन्हेगारी पार्श्वभूमी असेल, तर त्याचे काही पुरावे मला दिसावेत. पण तसं काहीही मला तिथं आढळून आलं नाही. शिवाय मी काही वेळासाठी बाहेर गेलो होतो, तेव्हा तेथील आसपासच्या लोकांना दत्ताजीबद्दल विचारून पाहिले. ते म्हणाले, की त्याने खून करणं फारच धक्कादायक आहे. तो रोखठोक असला तरी स्वभावाने प्रामाणिक आहे. त्यावरून पुन्हा माझ्या दुसऱ्या मताला पुष्टी मिळाली – दत्ताजीने खून केलेला नाही!!”

अल्फाचे स्पष्टीकरण संपलं. माझं मन ते ऐकून चांगलंच ढवळून निघालं होतं. नक्की काय झालं होतं काल त्या रस्त्यावर? दत्ताजी खरं बोलत होता की खोटं?

“मग तू यातून मार्ग कसा काढणार आहेस अल्फा?” मी विचारलं.

“याचं उत्तर आपल्याला सांगलीत मिळणार आहे, मित्रा!“ तो माझ्याकडे बघून डोळे मिचकावत म्हणाला.

“काय? सांगलीत?? तिथे कसंकाय??” मी चाटच पडलो. अल्फा नुसता हसला आणि मग वळून खिडकीतून बाहेर पाहू लागला. त्याने मला नेहमीप्रमाणे गोंधळात सोडलं होतं. सांगलीत कोण बसलं होतं आम्हाला काय खरं आणि काय खोटं ते सांगायला?

काही वेळातच आम्ही सांगलीत पोहोचलो.

*

# 4.

"आता आपण सांगली स्टँडवर उतरलोय. आता तरी सांग!" मी आग्रहाने म्हणालो. अल्फा मघापासून त्याच्या मिश्किल हास्याने केवळ मान डोलावून मला जास्तच अस्वस्थ करत होता. आम्ही बस स्टँडच्या बाहेर येऊन रिक्षा पकडली आणि निघालो. आता आम्ही थेट आमच्या रूमवर जाणार, अशी माझी अपेक्षा होती, पण अल्फाने रिक्षा दुसरीकडे वळवायला सांगून मला बुचकळ्यात पाडलं. काही अंतर कापून आमची रिक्षा सांगलीच्या सिव्हिल हॉस्पिटलच्या आवारात येऊन उभी ठाकली. रिक्षावाल्याचे पैसे चुकते करून आम्ही खाली उतरलो.

"विक्रमची बॉडी इथे ठेवलेली आहे." अखेर अल्फा बोलला.

"ते तुला कसं कळलं?" मी.

"क्राईम केस असल्यामुळे बॉडीची प्राथमिक तपासणी होतेच. मला साधारण अंदाज होताच, की ते बॉडीला इथं आणतील, कारण तुंग गावात मोठं असं हॉस्पिटल नाहीये. मी संजयच्या घरातून बाहेर पडलो होतो तेव्हा विक्रमच्या घरीसुद्धा गेलो होतो. त्याचं गावात कोणी नातेवाईक नाहीये, पण आष्ट्याहून त्याचा एक भाऊ आला आहे. त्याला मी बॉडीबद्दल विचारलं तेव्हा त्याने मला ती सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मिळेल, असं सांगितलं."

"बरं.. मग त्याची डेडबॉडी पाहून तुला काय कळणार आहे?"

"मी ती पाहिल्याशिवाय काहीच सांगू शकत नाही. तू चल तर आधी."

अल्फा मला आत घेऊन गेला. आम्ही तिथे मॉर्च्युअरी रूम शोधली आणि डॉक्टरांची परवानगी घेतली.

"तूच आत जाऊन जे काय पहायचंय ते पाहून ये बाबा. मी थांबतो बाहेरच." मी त्या खोलीच्या बाहेर उभारून म्हणालो. मला ते दगडाने फुटलेलं डोकं मुळीच पाहवलं जाणार नव्हतं. अल्फा मान डोलावून आत गेला आणि मी काही वेळ तिथेच वाट पाहत थांबलो. अखेर, काही मिनिटांच्या प्रतिक्षेनंतर अल्फा बाहेर आला. त्याच्या चेहऱ्याकडे पाहून मी थक्कच झालो. त्याचा नूर पूर्णपणे पालटला होता. त्याच्या डोळयांत एक वेगळाच उत्साह भरून आला होता. चेहऱ्यावरील मघाची विचारमय, गोंधळलेली भावना जाऊन त्याजागी एक निश्चय प्रकट झाला होता, एक तेज आलं होतं. त्याला विक्रमच्या बॉडीमध्ये निश्चितपणे काहीतरी चित्तवेधक मिळालं होतं. माझ्या प्रश्नार्थक चेहऱ्याकडे पाहून तो म्हणाला,

"आपल्या प्रश्नाचं उत्तर मिळालंय, प्रभू. विक्रमचा खून दत्ताजीने केलेला नाहीये!!"

पुढचा काही वेळ मला माझे सगळे प्रश्न आणि त्यामागची उत्सुकता खूपच प्रयासाने धरून ठेवावी लागली. कारण अल्फा मला म्हणाला होता – 'रूमवर गेल्यानंतर सर्व समजावून सांगतो'! त्यामुळे आणखी काही वेळ मध्ये गेला आणि अखेर आम्ही आमच्या रूममध्ये येऊन विसावलो.

"आईगंऽऽ.. दमलो बुवा!" तो त्याच्या नेहमीच्या खुर्चीवर पाय लांब करून बसत म्हणाला,"आज खूप कष्ट झाले आपले."

"हो ना. सातआठ किलोमीटर तर चालणं झालं असेल!" मलाही बसल्यानंतर खूप आराम वाटला.

“माझ्यासाठी ते कष्ट नगण्य आहेत. खरे कष्ट तर डोक्यात असलेल्या या एक – सव्वा किलोच्या मेंदूने केलेले आहेत!!” तो कानाच्या वरती बोट दाखवत म्हणाला,”काहीही म्हण प्रभू, हे प्रकरण फारच विलक्षण ठरणार आहे, हे मात्र नक्की!”

“आता तरी मला सांग, दत्ताजीने खून केला नाही या निष्कर्षाप्रत तू कसा पोहोचला ते!“ मी विचारले.

“विक्रमच्या डोक्यावरचा घाव, प्रभू! तो घाव!! तोच या प्रश्नाचं उत्तर होता!!” अल्फा म्हणाला,”तुझ्या अजूनही लक्षात आलं नाही का? बरं. मी सांगतो कसं ते. मी हॉस्पिटलमध्ये जाण्याआधीच मनात त्याच्या डोक्यावरचा घाव कसा असेल, याच्या शक्यता मांडून ठेवल्या होत्या. कारण आपल्यासमोर दोन केसेस होत्या – एक म्हणजे दगड दुरून मारला गेला असावा, ज्यात दत्ताजी गुन्हेगार ठरत नाही आणि दुसरी म्हणजे दगड जवळूनच मारला गेला असावा, ज्यात तो दत्ताजीनंच मारलाय, हा निष्कर्ष निघतो. दोन्ही केसेसमध्ये विक्रमच्या डोक्यावर झालेल्या घावाचे स्वरूप वेगवेगळं असणार, असा माझा अंदाज होता आणि तो तंतोतंत खरा ठरला!”

हे सांगताना तो स्वतःच खूप उत्साहीत झाला होता,

“मला त्याच्या डोक्यात एकच जखम मिळाली.. आणि ती एका छोट्या, पण खोल खड्ड्यासारखी आहे, जणू काही एखादी टोकदार आणि टणक वस्तू त्या ठिकाणी त्याच्या डोक्यात घुसली असावी, अशी. आपण पोलीस स्टेशनमध्ये जो दगड पाहिला होता, तो बऱ्यापैकी गोलाकार – किंवा लंबवर्तुळाकार होता म्हटलंस तरी चालेल. पण त्याला असं टोक मात्र निश्चितपणे नव्हतं.”

मला ते ऐकून धक्काच बसला. यातून कथेला नवीनच ट्विस्ट येत होता.

“म्हणजे.. म्हणजे तुला म्हणायचंय की.. पोलीस स्टेशनमध्ये जो दगड ठेवलेला आहे, त्याने विक्रमचा खून झालाच नाहीये??” मी अडखळत विचारले.

“नाहीच मुळी!!” अल्फा खुर्चीच्या हातावर जोरात आपला हात बडवून म्हणाला,”तो दगड बदलला गेलाय प्रभू! आपण जो पाहिला, तो खून झालेला दगड नाहीये. ज्याने खून झाला, तो दगड टोकदार आहे आणि आकाराने छोटा आहे. पण कोणीतरी खून झालेल्या ठिकाणावरून तो काढून घेऊन त्या ठिकाणी तो मोठा दगड ठेवून दिला आहे, जेणेकरून दगड लांबून मारल्याची शक्यताच नाहीशी व्हावी! त्यावर विक्रमचं रक्त वगैरे लावून त्यानेच खून झालाय, असं दाखवण्यात आलंय. खूपच दिशाभूल करणारी खेळी खेळली आहे गुन्हेगाराने. खुनाच्या ठिकाणी मिळालेला मोठ्या आकाराचा असणं हाच विक्रमला गुन्हेगार सिद्ध करणारा मुख्य पुरावा होता. पण ज्याअर्थी आपल्याला दगड बदलला गेलाय आणि मूळ दगड वेगळाच होता हे कळालंय, त्याअर्थी दत्ताजीची हकिकत शंभर टक्के खरीच असली पाहिजे! गुन्हेगाराने दगड दूरून मारला आणि तो दगडही असा टोकदार बनवला, की त्याच्या एकाच फटक्यात जबर जखम होऊन विक्रम तत्काळ मृत्यूमुखी पडला. पुढे असलेला दत्ताजी मागे वळायच्या आत खूनी मागच्या शेतात गडपही झाला.”

“पण गुन्हेगाराने तो दगड नक्की बदलला तरी कधी? आणि कसा?” मी.

“मी अगदी खात्रीशीरपणे नाही सांगू शकणार. पण माझा कयास आहे, की खून झाल्यानंतर पुढच्या काही वेळातच हे काम झालं असलं पाहिजे, तेही तिथे बरेचसे लोक गोळा होण्याआधी. कारण सगळे तिथे उपस्थित असताना गुन्हेगार इतकी मोठी जोखीम उचलणार नाही.” अल्फा आपल्या शब्दांवर जोर देत म्हणाला,”याचाच अर्थ.. संशयितांची यादी खुनाच्या ठिकाणी अगदी सुरुवातीला पोहोचलेल्या काही लोकांपर्यंतच येउन मर्यादित होते!!”

माझ्या ओठांवर ‘माय गॉड!’ असे शब्द उमटले. बाकी सगळयांसाठी हे प्रकरण साधेसरळ आणि सोपे होते, पण आमच्यासाठी मात्र तेच प्रकरण मघापासून विलक्षण रितीने वळणावर वळणे घेत होते.

“संजयने खुनानंतर तिथं आलेल्या लोकांची नावं घेतली होती.” मी आठवण्याचा प्रयत्न करत म्हणालो”सर्वात पहिला तिथं एक मास्तर पोहोचले होते. काय नाव बरं त्यांचं.. हां, मराठे मास्तर! त्यानंतर तो वाडीच्या बाजूने येणारा शेतकरी..”

मला त्याचं नाव आठवत नाही, हे पाहून अल्फा म्हणाला,

“राजाराम चव्हाण. तो वाडीकडून गावाच्या दिशेने आला. आणि त्यानंतर आला, तो संदीप साठे. तो गावातून वाडीच्या दिशेने आला.” अल्फाने सगळया नोंदी त्याच्या डायरीत घेऊन ठेवल्या होत्या,”याच्या पुढचं दत्ताजीने नीटसं सांगितलंच नाही. उद्या त्याला सविस्तर विचारावं लागेल.”

तो खुर्चीवर मागे रेलून बसला आणि माझ्याकडे पाहू लागला. मीही बेडवर मागे सरकून भिंतीला टेकून बसलो. काही वेळ कोणीच काही बोललं नाही. आम्ही चर्चेला कुठून सुरुवात केली आणि कुठे येऊन थांबलो, याचा विचार करत राहिलो. शेवटी एकदम मला लक्षात आलं,

“अल्फा, ज्याअर्थी तो दगड खून झाल्यानंतर काही वेळाने बदलण्यात आला, त्याअर्थी सुरुवातीचा काही वेळ तिथे जुनाच दगड पडलेला असणार – तो छोट्या आकाराचा. हो ना?”

“हो.” अल्फाने माझ्याकडे पहात म्हटले.

“मग दत्ताजीने तेव्हा त्या छोट्या दगडाला पाहिलं असेलच की..” मी म्हणालो,”आपण त्याला पोलीस स्टेशनमधला मोठा दगड दाखवल्यावर तो कदाचित ओळखेल, की तो तोच दगड नव्हता ते.  कदाचित.. कदाचित असंही होऊ शकतं, की त्यानं खुनीला दगड बदलताना पाहिलं असेल आणि त्याला ते आठवत नसेल… कारण ते कृत्य त्याच्या समोरच तर झालंय! थोडं खोदून विचारल्यावर त्याला ते आठवणार नाही का?”

अल्फाने एक दिर्घ सुस्कारा सोडला.

“तुला एक सांगू का प्रभू? जगातल्या सगळया गोष्टींचा बट्ट्याबोळ होण्याचं एकच कारण आहे – दारू!! इतिहास साक्ष आहे!! जर काल दत्ताजी नशेत नसता, तर त्याला या बारीकसारीक

गोष्टी लगेच ध्यानात आल्या असत्या आणि त्यानं तिथल्यातिथे खऱ्या खुनीला पकडलं असतं. पण दुर्दैव!! आपण हे सगळं त्याला उद्या विचारूच. असं काही घडल्याचं त्याच्या आठवलं, तर देवच पावला म्हणायला पाहिजे! असो. ते आपण उद्यावर सोडू. आजच्यापुरतं एवढंच पुरे. खुपच विचारमंथन केलंय आज यावर. आता जेवून येऊ आणि मस्तपैकी ताणून देऊ!!"

आणि आमच्या संवादातून तो विषय बाजूला पडला. पण माझ्या मनात, आणि मला खात्री होती की अल्फाच्या मनातही, तो विषय रात्रभर घोळत राहणारच होता...

सकाळी दहा वाजल्यानंतर मी आणि अल्फा तुंग गावाच्या दिशेने निघालो. अल्फाने आज निघण्याआधी संजयला फोन केला नव्हता. त्यामागे काहीतरी विशेष कारण नक्कीच असावं. आम्ही तुंग फाट्यावर उतरलो आणि माझ्या नशिबाला पुन्हा तीच कालची पायपीट आली. पण आज मी भरपूर नाश्ता केला होता आणि सोबत एका बॅगेत पाण्याच्या बाटल्या आणल्या होत्या. त्यामुळे अगदी रुबाबात मी अल्फाच्या सोबत चालण्यास सुरूवात केली. तुंग फाट्यापासून मुख्य गाव बरंच आत होतं. मध्ये अधूनमधून बरीचशी हॉटेलं लागत होती. अल्फा चालता चालता अचानक एका हॉटेलसमोर थांबला आणि आत शिरला. मीही त्याच्या मागोमाग गेलो. जाता जाता मी वरचे नाव वाचले – 'लक्ष्मी धाबा'!

अल्फा थेट काऊंटरपाशी गेला आणि तिथे बसलेल्या गलेलठ्ठ माणसाला त्याने आपला मोबाईल दाखवत विचारले,

"परवाच्या रात्री दहा ते बाराच्या दरम्यान हा माणूस इथे आला होता का?"

तो माणूस निर्विकारपणे आमच्याकडे पाहत म्हणाला,

"तुम्ही कोण?"

“पोलीसमित्र म्हणा हवं तर.” अल्फाने पोलीसांचा शिक्का असलेला लिफाफा हळूच खिशातून अर्धा बाहेर काढला आणि अर्थपूर्ण नजरेने त्या माणसाकडे पहात पुन्हा आत सरकवला. अल्फाची ही ट्रिक जुनी होती. त्यानं कुठून तो लिफाफा मिळवला होता कुणास ठाऊक. पण नेहमी चौकशी करायच्या आधी तो ते दाखवायचा. त्यामुळे समोरचा माणूस चुपचाप चौकशीला तयार व्हायचा. आमच्या समोरच्या माणसावरही त्याचा अपेक्षित परिणाम झाला आणि त्याने पुढे होऊन कुजबुजल्यासारख्या आवाजात विचारले,

“विक्रम सपकाळ खून प्रकरणावर तुम्हाला लावलंय काय पोलीसांनी?”

अल्फाने गुप्तता राखण्याचा प्रयत्न करत असल्याचे नाटक करत नुसती मान हलवली.

“पण त्यात अजून शोध काय घ्यायचाय? दत्ताजीनंच मारलंय त्याला. सगळ्या गावाला माहिताय हे!”

छोट्या गावांत बातम्या वाऱ्यासारख्या पसरतात, हे खरंच.

“मी जेवढं विचारतोय तेवढंच सांगा.” अल्फा मोबाईल पुढे करत म्हणाला,”हा परवा रात्री इथे आला होता का?”

“हाच तर दत्ताजी आहे. आपल्या चांगला ओळखीचा आहे हा. होय, आला होता की. साडेनऊ वाजता आला होता.”

“आणि किती वाजता इथून गेला?”

“बारा-सव्वाबारा वाजले असतील बघा.”

“त्याने किती दारू घेतली होती?”

“अं.. फार काही घेतली नव्हती. आजकाल तो थोडी कमी घेत होता.”

“कितपत नशेत होता तो?”

“खून करण्याइतक्या नशेत तर वाटला नाही बाबा तो मला. व्यवस्थित नेहमीसारखा चालतबोलत तर होता. पुढं जाऊन काय झालं कुणास ठाऊक!”

“विक्रमही त्याच वेळेस इथं आला होता का?” अल्फा.

“होय. दोघं सोबतच बाहेर पडले.”

“विक्रमने केवढी घेतली होती?”

“विक्रम! तो तर फुल्ल टाईट होता!! त्याचं नेहमीचंच आहे. धड चालताही येत नव्हतं त्याला.”

“त्या दोघांवर नजर ठेवणारं वगैरे असं कोणी कस्टमर इथे बसलेलं जाणवलं का तुम्हाला?”

त्या माणसाने थोडं आठवल्यासारखं केलं आणि तो म्हणाला,”नाही बुवा.. रात्रीच्या वेळेला एवढे कस्टमर असतात. कोण काय करतंय, याच्याकडे लक्ष देत बसत नाही आम्ही.”

“ओके. धन्यवाद. पोलीसांना तुम्ही केलेल्या योग्य सहकार्याबद्दल मी नक्की सांगेन.” अल्फा म्हणाला. ते ऐकून तो माणूस खूश झालेला दिसला. आम्ही तिथून बाहेर पडलो आणि पुन्हा चालू लागलो.

“काही गोष्टींची खात्री करून घ्यायची होती, बस्स.” अल्फा म्हणाला. यासाठीच त्यानं संजयला बोलावलं नव्हतं तर. आता त्याने त्याला फोन करून पोलीस ठाण्यात यायला सांगितलं. तो आणि आम्ही साधारण एकाच वेळी तिथे पोहोचलो. सब इन्स्पेक्टर राठी काहीतरी लिहीत होते. आम्ही आत शिरताच त्यांनी आमच्याकडे एक ओझरता कटाक्ष टाकला आणि पुन्हा आपल्या कामात मग्न झाले. आम्ही जिथे दत्ताजीला ठेवले होते, त्या लॉकअप रूमपाशी गेलो.

“दत्ताजी..” अल्फाने हाक मारली,”आम्ही आहोत.”

आम्हाला पाहताच दत्ताजी जवळ आला.

"काय झालं? तुम्ही शोध सुरू केला का? काही मिळालं का कालच्या दिवसभरात??"त्याने अधीरपणे विचारले. एक दिवस तुरुंगाची हवा खाल्ल्यानंतर त्याच्यामधली हवाच निघून गेली होती.

"सांगतो, सांगतो." अल्फा त्याला शांत करत म्हणाला,"पण त्याआधी मला तुमच्याकडून एकदोन प्रश्नांची उत्तरे हवी आहेत. आणि ती देताना तुम्ही काल रात्री घडलेल्या खुनाचा प्रसंग व्यवस्थित डोळ्यांसमोर आणावात, अशी माझी इच्छा आहे."

"हो हो.. तुम्ही विचारा. मी शक्य तेवढं आठवून सांगण्याचा प्रयत्न करतो." तो म्हणाला. संजयला आमच्या कालच्या चर्चेतील काहीच माहित नसल्यामुळे तो अल्फा काय विचारतोय, हे लक्ष देऊन ऐकू लागला.

"काल रात्री तुम्ही आणि विक्रम त्या रस्त्यावरून रात्री साडेबाराच्या सुमारास जात होता, बरोबर? तुम्ही पुढे असताना मागून कोणीतरी विक्रमच्या डोक्यात दगड मारला आणि तो खाली पडला. तो कोणी मारला, कसा मारला, यावर मी नंतर बोलेनच; पण सध्या याच एका घटनेकडे तुम्ही तुमचे लक्ष केंद्रित करा. तुम्ही जेव्हा काय झालं, हे पहायला विक्रमच्या जवळ जेव्हा गेलात, तेव्हा तुम्ही खाली पडलेला दगड पाहिलात का? ज्याने विक्रमचा खून झाला, तो दगड?"

दत्ताजीने थोडा विचार करून म्हणाला,

"होय.. पाहिला तर होता."

"तो हाच होता का?" अल्फाने त्याचा मोबाईल पुढे करत म्हटलं. त्यावर कालच्या पोलीस स्टेशनमध्ये आम्ही पाहिलेल्या दगडाचा फोटो होता. दत्ताजीनं त्याच्याकडे डोळे बारीक करून पाहिले. संजय काही न समजून आमच्याकडे पाहत होता. मी आणि अल्फाने उत्सुकतेने दत्ताजीकडे पाहिले.

“अं… एवढं आठवत नाहीये..” तो अनिश्चित आवाजात म्हणाला आणि आमचा उत्साह भस्सकन ढासळला!

“पुन्हा एकदा आठवा. तुम्ही दगडाकडे फारसं लक्ष दिलं नसणार, हे मला ठाऊक होतं. पण तरीही ओझरतं पाहता पाहता नकळत काहीतरी तुमच्या ध्यानात राहिलं असेल कदाचित..”

दत्ताजीला आम्ही त्या दगडाबद्दल एवढं खोदून खोदून का विचारतोय, हेच कळत नव्हतं. पण तरीही तो पुन्हा आठवू लागला.

“त्या दगडाचा आकार आठवा.. तो एवढा मोठा होता का? की यापेक्षा लहान होता?” अल्फा त्याला हिंट देत म्हणाला. पण दत्ताजीच्या डोक्यात काही केल्या प्रकाश पडेना.

“अं.. मला खरंच नाही आठवत.” अखेर त्याने हार मानली,”त्यावेळी मी एवढा बावरलो होतो, की मी त्याला पाहिलं असलं तरीही मी नाही सांगू शकणार. पण तुम्ही त्याच्याबद्दल मला का विचारताय?”

अल्फाने एक सुस्कारा सोडला.

“जर तुम्ही तो दगड व्यवस्थित पाहिला असता, तर कदाचित तुम्हाला अटकच झाली नसती, दत्ताजी.” तो म्हणाला. दत्ताजी डोळे विस्फारून पाहू लागला. मग अल्फाने त्याला तिथं नक्की काय घडलं होतं आणि तो दगड कसा बदलला गेला होता, हे थोडक्यात सांगितलं.

“तुम्ही काल प्यायला नको होती.” अल्फा हताशपणे म्हणाला.

“खरं बोलताय तुम्ही. या सगळ्या भानगडीचे मूळ तिथंच आहे. मी काल घेतली नसती, तर कदाचित मला त्या दगडाबद्दल आठवलं असतं… एवढंच काय, मी प्यायला तिथे गेलो नसतो, तर विक्रम मला भेटलासुद्धा नसता आणि हे सगळं लचांड माझ्या मागं लागलंच नसतं. देवाशप्पथ मी आयुष्यात परत कधी दारूकडे ढुंकूनही पाहणार नाही!”

“दॅट्स गुड.” अल्फा म्हणाला,”असो. मला तुमच्याकडून आणखी माहिती हवी आहे. खून झाल्यानंतर पुढच्या काही वेळात तिथे कोणकोण आलं आणि प्रत्येकाने कायकाय केलं हे तुम्ही सविस्तर सांगावं, अशी माझी अपेक्षा आहे. लक्षात घ्या, की यांतलंच कोणीतरी एक म्हणजे खरा खूनी आहे.”

“सांगतो.” दत्ताजी म्हणाला. अल्फाने आपली डायरी काढली,”खून झाल्यानंतर सगळयात पहिला तिथं आलेले मराठे मास्तर होते.”

“मागे मास्तर लागलंय याचा अर्थ शिक्षकच असणार.” अल्फा.

“होय. इथल्या प्राथमिक शाळेत शिक्षक आहेत ते.” दत्ताजी..

“कसे आहेत ते एकूणच माणूस म्हणून?”

“चांगला माणूस आहे, शिकला-सवरलेला आहे.”

“खून करतील असं वाटतं?”

“नाही बुवा. गावात सगळे त्यांचा आदर राखून आहेत. गरजेच्या वेळी ते लोकांना मदत करायला पुढे असतात. खून वगैरे करतील असं नाही वाटत.”

“विक्रमशी काही संबंध होता त्यांचा? चांगला, वाईट..?”

“माहीत नाही. पण मास्तर आणि विक्रम एकदम विरुद्ध स्वभावाचे होते. त्यामुळे मास्तरांचे त्याच्याबद्दल फार काही चांगले मत नसावे.”

“बरं.. परवा रात्री, जेव्हा खून झाला आणि मास्तर तिथं आले, त्यावेळी त्यांनी कायकाय केलं?”

“पहिला ते सायकलवरून उतरले. त्यांनी खाली पडलेल्या विक्रमला पाहून ‘याला काय झालं’ असं विचारलं. मी काहीच बोलत नाही, हे पाहून ते विक्रमच्या जवळ गेले.”

“ते खाली वाकले होते?“ अल्फाने मध्येच विचारले.

“होय. ते विक्रमला नक्की काय झालंय, हे बघायला खाली वाकले होते.”

“तो दगड विक्रमपासून किती दूर होता?”

“फार नाही.. हातभर लांब होता.”

“म्हणजे मास्तरांना दगड बदलण्याची संधी होती, हो ना?”

“होती तर खरी.” दत्ताजी म्हणाला. अल्फाने डायरीत नोंद केली. मग तो पुढे म्हणाला,

“मास्तर गेले आणि त्याच दिशेने आला राजाराम चव्हाण. या राजारामबद्दल थोडी माहिती सांगा.”

“राजाराम आमच्या घराजवळच राहतो. तो माझा चांगला मित्र आहे. तोही शेतकरीच आहे आणि आम्ही बऱ्याचदा यायला-जायला एकत्र असायचो. मात्र तो अतिशय रोखठोक आहे आणि कुणाला तोंडावर वाईट बोलायला मागंपुढं बघत नाही. त्याला हा विक्रम मुळीच आवडायचा नाही. विक्रमची जमीन माझ्या आणि राजारामच्या मध्ये होती. त्यामुळे जसे त्याचे माझ्याबरोबर वाद होते, तसेच राजारामबरोबरही होते.”

“थोडक्यात, त्याच्याकडे खून करण्याचे कारण होते.” अल्फा म्हणाला.

“होय.”

“त्यानं आल्यावर काय केलं? तुम्ही काल म्हणालात की तोही विक्रमच्या प्रेताजवळ गेला होता.”

“होय. तोही तिथं गेला होता. त्यानं विक्रमला थोडं हलवून पाहिलं आणि तो मेलाय, हे लक्षात येताच तो माझ्याकडे आला.”

“अच्छा.. त्याच्या हालचालींमध्ये संशयास्पद काही जाणवलं?”

“आठवत नाही. मी तेव्हा खरंच विचार किंवा निरीक्षण करण्याच्या अवस्थेत नव्हतो.”

“ठिकाय.. त्यानंतर गावाकडून तुमच्या वाडीच्या दिशेने येत असलेला संदीप साठे तिथे येऊन थांबला, असं तुम्ही काल म्हणालात. त्याच्याबद्दल सांगा.” अल्फा डायरीचे पान पलटत म्हणाला.

“संदीप साठे पाटलांच्या शेतात काम करणारा एक शेतमजूर आहे. तो फारसा कुणाशी बोलत नाही. तो आणि त्याची बायको, असा दोघांचाच परिवार आहे आणि ते सर्वांपासून आलिप्त असतात. तोही वाडीतच राहत असूनसुद्धा एवढ्या वर्षांत माझं त्याच्याशी दोनतीनदाच बोलणं झालंय. त्यामुळे मी त्याच्याबद्दल फार काही सांगू शकणार नाही. पण मला जेवढं माहिताय, त्यावरून तर तो साधा आणि गरीब माणूस आहे.”

“विक्रमशी काही घेणंदेणं?”

“ठाऊक नाही.”

“खून झाल्यानंतर हा संदीप कधी आला?” अल्फा.

“राजाराम आल्यानंतर काही वेळातच तो आला होता.” दत्ताजी.

“त्यानं कायकाय केलं आल्यावर?”

“त्याच्याबद्दल मी निश्चितपणे सांगू शकणार नाही, कारण तो आला तेव्हा राजाराम जोरजोरात माझ्याशी बोलत होता. त्याला वाटलं होतं की मी नशेत खून केलाय, त्यामुळे तो मला गदागदा हलवून जाब विचारत होता. या सगळयाच्या दरम्यान संदीप तिथे आला. त्यामुळे त्यानं आल्यापासून कायकाय केलं, हे काही मला सांगता येणार नाही. मला जेवढं आठवतंय, त्यानुसार तो घाबरला होता आणि माझे आणि राजारामचे बोलणे ऐकत उभारला होता.”

“तो सायकलवरून येत होता असं तुम्ही काल म्हणालात.”

“होय.”

“तोही विक्रमच्या प्रेताजवळ गेला असण्याची शक्यता आहे का?”

“शक्यता तर आहेच.”

“हं..” अल्फा म्हणाला. तो लिहून घेण्यासाठी थोडा थांबला आणि त्याने विचारले,”त्यानंतर कोण आलं?”

“त्यानंतर तर मास्तरच पुन्हा आले, वाडीतल्या लोकांना घेऊन.” दत्ताजी.

“म्हणजे तिथे सगळे लोक जमायच्या आधी केवळ तीनच लोक पोहोचले होते – मराठे मास्तर, राजाराम आणि संदीप, बरोबर?”

“होय.”

“नक्की याव्यतिरिक्त दुसरं कोणीच विक्रमच्या आजूबाजूला आलं नाही?”

“नाही.”

“ओके..” अल्फा प्रश्नोत्तरे संपवण्याच्या आवेशात म्हणाला,”या तिघांनाही विक्रमच्या जवळ पडलेला दगड बदलण्याची संधी होती, असं म्हणता येईल. सगळे लोक आल्यानंतर गर्दीच्या गोंधळातही एखाद्याने चालाखपणे दगड बदललेला असण्याची शक्यता आहे. तसं असलं, तर सगळं अवघड होऊन बसणार आहे. पण जुना दगड उचलणं, तो लपवून त्याजागी नवा दगड ठेवणं, त्यावर सर्वत्र व्यवस्थित रक्त लागेल अशी व्यवस्था करणं हे सगळं त्या गर्दीच्या समोर कोणी करेल, हे मला जरा अशक्यच वाटतंय. त्यामुळे आपण आपल्या आशा जिवंत ठेऊया.”

“माझ्यानंतर आलेल्या तिघांपैकी एकाने खून केला असावा, यावर माझा विश्वासच बसत नाहीये. तिघंही चांगली माणसं आहेत ती.” दत्ताजी म्हणाला.

“बाहेरून कोणीही चांगलं दिसत असलं, तरी आतून कसं असेल, हे आपण सांगू शकत नाही. प्रत्येकजण वेगवेगळ्या परिस्थितीतून जात असतो आणि तीच परिस्थिती माणसाला चमत्कारिक कामं करायला भाग पाडते.. चांगलीही आणि वाईटही. आम्ही शोध घेतोच आहे. तुम्ही खुनाच्या प्रसंग आणखी खोलात जाऊन आठवावा, अशी माझी इच्छा आहे. काही मनात आलं, तर कधीही कळावा.”

आमचं बोलणं संपतं न संपतं, तोच राठी तिथे डोकावले.

“काय रे, तुम्ही इथं येऊन गप्पाच रंगवायला लागलात की! एवढा वेळ तर आम्ही वकीलांना पण देत नाही! चला बाहेर!”

“झालंच बघा आमचं सर.”अल्फा उठत म्हणाला,”तुमच्याकडेच येणार होतो आत्ता. थोडं बोलायचंय तुमच्याशी.”

“मी आत्ता कामात आहे. नंतर बोला जे काय बोलायचंय ते. पण आधी बाहेर निघा तिथून!” ते खेकसले. आम्ही बाहेर आलो आणि समोरच्या बाकड्यावर राठींचे काम होण्याची वाट बघत बसलो. अखेर अर्ध्या-पाऊण तासाने त्यांचे काम उरकले आणि त्यांनी आम्हाला बोलावलं.

“हं बोला.” ते आमच्याकडे न पाहताच म्हणाले.

“विक्रमच्या खुनाबद्दल आम्ही काही तर्कवितर्क केले आहेत, ज्यांबद्दल आम्हाला तुमच्याशी बोलायचं आहे. त्यावर तुमचं मार्गदर्शन आणि सल्ला हवा आहे.” अल्फा म्हणाला. त्याची समोरच्याला महत्त्व देऊन खूश करण्याची पद्धत मला माहीत होती.

“सांगा तुमचे तर्कवितर्क.” राठी थोड्या मिश्किल नजरेने आमच्याकडे पाहात म्हणाले. त्यांना हे सगळं मनोरंजन वाटत असावं. अल्फाने आम्ही काल केलेली चर्चा आणि त्यातून काढलेले निष्कर्ष त्यांना थोडक्यात समजावून सांगितले. हळूहळू राठींच्या चेहेऱ्यावर हसण्याचा भाव जाऊन उत्सुकता निर्माण होत होती. अल्फाने जेव्हा त्यांना विक्रमच्या डोक्यावर झालेली जखम

आणि पोलीस स्टेशनमध्ये जमा झालेला दगड यांच्यातला विरोधाभास दाखवून दिला, तेव्हा त्यांच्या तोंडून आश्चर्योद्गार बाहेर पडले.

“कमाल आहे! तुमच्या बोलण्यात थोडं का होईना, पण तथ्य आहे, असं हा फोटो बघून मला वाटायला लागलंय.” ते म्हणाले.

“प्लीज यात आम्हाला मदत करा सर. खऱ्या खुनीला पकडल्यावर तुम्हीच या प्रकरणाचं क्रेडिट घ्या हवं तर, आम्हाला त्याचं काही नाही. फक्त दत्ताजी निरपराध आहेत, एवढंच आम्हाला सिद्ध करायचंय.”

राठींच्या डोळयांसमोर प्रमोशनचे तारे चमकताना आम्हाला दिसले.

“ठीक आहे. मी तुम्हाला मदत करायला तयार आहे. काय हवंय तुम्हाला?” त्यांनी विचारलं.

“तुम्ही मराठे मास्तर, राजाराम चव्हाण आणि संदीप साठे या तिघांना इथं चौकशीसाठी बोलवा. दगड यांच्यापैकीच एकाने बदलला असल्याची मला खात्री आहे.” अल्फा पटकन म्हणाला.

“ठिकाय. आज संध्याकाळी चार वाजता बोलावू त्यांना. तुम्ही हजर रहा तेव्हा इथं.” राठी म्हणाले. आम्ही माना डोलावून तिथून उठलो आणि तिथून बाहेर पडलो. बाहेर आल्यानंतर संजय आम्हाला म्हणाला,

“मला तुला काहीतरी दाखवायचंय.”

“काय?” अल्फाने विचारले.

“काल मला ते इतकं महत्त्वाचं वाटलं नाही, पण आत्ता तू सांगितलेल्या गोष्टींवरून मला ते तुला सांगणं आवश्यक वाटतंय.” संजय.

“काय आहे ते?” अल्फाने उत्सुकतेने विचारले.

“एक व्यक्ती आहे, जिला तुम्हाला भेटवायचंय. चला माझ्यासोबत.” तो म्हणाला आणि आम्ही त्याच्या मागे चालू लागलो. काही अंतर चालवत तो आम्हाला गावात घेऊन गेला आणि एका घरासमोर जाऊन आम्ही उभे राहिलो. संजयने दारावर टकटक केली. दार उघडून एक गृहिणी बाहेर आली.

“काकू, मन्या आहे काय घरी?” संदीप.

“हो, पाठवते एक मिनिट.” त्या आत गेल्या. ‘मनोज, माझा मित्र’ असे संजय हळूच आमच्या कानात पुटपुटला. पुढच्याच क्षणी आतून एक कोवळा, नुकताच मिसरूड फुटलेला, आमच्यापेक्षा तीनचार वर्षांनी लहान वाटणारा एक मुलगा बाहेर आला.

“बोल की संजादादा.. काय म्हणतोस..” तो म्हणाला. बोलण्याच्या शैलीवरून तो जरा टपोरी कॅटेगरीत मोडणारा वाटला.

“तू काल जे मला सांगितलंस, ते यांनाही सांग एकदा.” संजय म्हणाला. मनोजने आमच्याकडे वरून खालपर्यंत पाहिले आणि तो म्हणाला,

“बरं, सांगतो. या बसा इकडे.” तो बाजूच्या कट्ट्याकडे बोट दाखवत म्हणाला. आम्ही बसलो आणि तो सांगू लागला,”आम्ही काल रात्री शेतात गेलो होतो, संजय ज्या वाडीमध्ये राहतो, त्या बाजूकडच्या शेतात. मी आणि माझे दोन मित्र. आम्ही असं कधीमधी शेतात चोरून ऊस तोडायला जातो. फक्त कुणाला हे सांगू नका, नाहीतर माझी काही खैर नाही. आम्ही मुद्दाम रात्री उशिरा जातो, कारण सकाळी शेतात मालक असतो, शेतमजूर असतात. रात्रीच्या वेळी गेलं, की तिथं सामसूम असतं. आम्ही शेतात शिरून ऊस तोडतो आणि ते घरी आणून चुपचाप विकतो. गेले सहा महिने आमचा हा उद्योग चालू आहे.

काल रात्री असेच रात्री बाराच्या सुमारास आम्ही बाहेर पडलो आणि वाडीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दिशेने गेलो. आम्ही मुख्य रस्त्यावरून जात नाही. कुणाला दिसू नये, म्हणून आम्ही पायवाटेनं जातो.”

“एक मिनिट, ही पायवाट कुठं आहे?” अल्फाने त्याला मध्ये अडवत विचारले.

“रस्त्याच्या डाव्या बाजूला शेत आहे आणि त्याच्याही डाव्या बाजूला, शेत संपल्यानंतर एक पायवाट आहे.” मनोज.

“थोडक्यात, शेताच्या एका बाजूला मुख्य रस्ता आहे आणि एका बाजूला पायवाट आहे.” अल्फा.

“बरोबर.” अल्फाचं समाधान झालंय, हे पाहून तो पुढे म्हणाला,”काल त्या पायवाटेनं आम्ही पुढं गेलो. आमचा मगदुमांच्या शेतात जाण्याचा बेत होता, पण तिथं गेल्यावर आम्हाला आतून कसलीतरी खुसफुस ऐकू आली.”

“मगदुमांचं शेत म्हणजे खून झाल्याच्या जागेपासून ऐंशी फुटांवर जे शेत आपण पाहिलं होतं, तेच शेत!!“ संजय म्हणाला.

“ओऽह..” अल्फाने हर्षोद्गार काढला,”म्हणजे आत कोणीतरी होतं, बरोबर ना?”

“होय, शेतात नक्कीच कोणीतरी होतं. ते आमच्यापासून बरंच लांब होतं म्हणा. आम्ही पायवाटेच्या बाजूला होतो आणि तो जो कोणी होता, तो विरुद्ध बाजूला रस्त्याच्या दिशेला होता. पण तेव्हा शांतता असल्याने आम्हाला तो आवाज ऐकू आला. मग आम्हाला वाटलं, की शेताचा मालक आत आहे. म्हणून आम्ही तिथून पळ काढला.”

“हं..” अल्फा विचार करत म्हणाला,”किती वाजले होते तेव्हा?”

“असेच साडेबारा वगैरे वाजले असतील.” मनोज.

“तुम्ही कुणाला शेताच्या आत जाताना किंवा बाहेर येताना नाही पाहिलं?” अल्फा.

“नाही. त्या पायवाटेवरती कोणीच नव्हतं.” मनोज.

“एखादी सायकल उभी असलेली दिसली का तिथं?“ अल्फा.

“नाही.” मनोज.

“अच्छा..” अल्फा मान हलवत बोलला. मनोज आणखी काही प्रश्न आहेत का, हे त्याच्या चेहऱ्याकडे बघत अजमावू लागला.

“आणखी काही तुला संशयास्पद दिसलं का? किंवा वाटलं का? त्या शेतात कोण होतं, याचा अंदाज बांधता येण्यासारखं?” अल्फाने विचारले.

थोडा विचार करून मनोजने उत्तर दिले,

“नाही.”

“ठीक आहे. तू दिलेल्या माहितीबद्दल आभारी आहे” अल्फा उठला. त्यामागोमाग आम्हीही उठलो.

“काका बरा आहे ना?“ मनोजने संजयला विचारले,”काळजी घ्यायला सांग.”

संजयने मान डोलावली आणि आम्ही तिथून बाहेर पडलो.

“थोडक्यात, मी मांडलेली थिअरी अगदी बरोबर आहे. खुनीने त्या शेतातूनच दगड मारला आहे!” अल्फा विजयी सुरात म्हणाला.

“पण मला एक शंका आहे.” संजय म्हणाला,”तू म्हणतोयस ना, की त्या शेतात लपून कोणीतरी तो दगड मारला, त्यात मला थोडी गडबड वाटतेय.”

“काय?” संजयने म्हटलेल्या वाक्यामुळे अल्फाला आश्चर्याचा धक्काच बसला,”कसली गडबड वाटतेय तुला?”

“तुझं लॉजिक तर बरोबर आहे, त्यावर मी शंका उपस्थित करत नाहीये. पण ते शंभर टक्के बरोबर आहे हे सिद्ध करण्यासाठी अजून एका गोष्टीचे स्पष्टीकरण आपल्याला मिळवावे लागणार आहे.” संजय म्हणाला,”काल रात्री वाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर धुकं होतं. काल काकाने सांगितलंच आहे ते. अगदी घनदाट नसलं तरी तुरळक होतं. पण त्या शेतातून रस्त्यावरची खून झालेली जागा धूसर दिसत होती. मग तिथं लपलेल्या गुन्हेगारानं एवढ्या लांबवर अचूक नेम कसा मारला?”

अल्फा थोडा गोंधळला.

“तू हे कशावरून सांगू शकतोस?” त्याने विचारले.

“आम्ही सर्वजण अर्ध्या तासात तिथं पोहोचलो होतो, तेव्हा मी पाहिलं.”

“तुला नक्की खात्री आहे का, की तिथून रस्ता न दिसण्याएवढं धुकं होतं?” अल्फा.

“न दिसण्याएवढं मी म्हणणार नाही. पण थोडं अस्पष्ट दिसलं असतं.”

“पण काल तर चांगला चंद्रप्रकाश होता ना. त्यामुळे गुन्हेगाराला विक्रमला टिपता आलं असेल.” मी स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला.

“चंद्रप्रकाश असला तरी त्या दोघांच्या मध्ये जर धुक्याचा पडदा असेल, तर दूरचे दृश्य धूसर होणारच.” संजय म्हणाला,”अर्थात, खूनी तरबेज असेल, तर नक्कीच नेम धरून मारू शकेल. पण मला शंका आली म्हणून मी बोलून दाखवली. एकदा खात्री करून घेतलेली चांगली.”

“हं.. हरकत नाही. या शंकेचं निराकरण व्हायलाच हवं, कारण गुन्हेगार बचाव म्हणून हा मुद्दा उपस्थित करू शकतो. त्यावर आपलं उत्तर तयार असायला हवं.” अल्फा म्हणाला आणि तो स्वतःशीच ‘धुकं.. धुकं… ‘ असे पुटपुटत चालू लागला. मला काही संजयची ती शंका फार

महत्त्वाची वाटली नाही, त्यामुळे मी ती गोष्ट काही वेळाने विसरून गेलो. आता आम्हाला चार वाजेपर्यंत वेळ काढायचा होता आणि त्यानंतर संशयित पोलीस स्टेशनमध्ये आम्हाला भेटणार होते. आम्ही संजयच्या घराकडे चालू लागलो.

*

# 5.

बरोबर चारच्या ठोक्याला आम्ही पोलीस स्टेशनमध्ये हजर झालो. मधल्या वेळात आम्ही मगदुमांच्या शेतात, म्हणजे खुनाच्या जागेपासून सर्वात जवळ असलेल्या शेतात जाऊन पुन्हा तपासणी केली. मनोजने सांगितलेल्या हकिकतीवरून अल्फाच्या तर्काला बळकटी आली होती आणि तिथे पुन्हा तपासणी करणे आवश्यक होते. आम्ही मनोज सांगत असलेली पायवाटही जाऊन पाहिली. पण दुर्दैवाने कोणत्याही प्रकारच्या खाणाखुणा आम्हाला मिळाल्या नाहीत. कारण एकतर जमीन कोरडी होती आणि दुसरं म्हणजे कालच्या दिवसभरात तिथून बऱ्याच जणांनी ये-जा केलेली असणार होती. त्यामुळे आम्हाला हव्या असलेल्या खुणा त्यामध्ये कधीच पुसून गेल्या होत्या.

आम्ही पोचलो, तेव्हा सब इन्स्पेक्टर राठी काचेच्या ग्लासमधून चहाचे भुरके मारत होते. आम्ही समोर दिसताच त्यांनी आमच्याकडे पाहिलं आणि एकवार घड्याळाकडे नजर टाकली.

“तुमचा उत्साह दांडगाच आहे म्हणायला पाहिजे!!“ ते आम्हाला म्हणाले,”असे लोक पोलीस डिपार्टमेंटला भरती झाले, तर खरंच लोकांचं कल्याण होईल!”

आता ही स्तुती होती की टोमणा, हे त्यांनाच ठाऊक! पण आम्ही मात्र हसून चुपचाप तिथे बसलो.

“तुम्ही सांगितल्याप्रमाणे त्या तिघांनाही मी इथं बोलावलंय. एक एक करून ते येतील.” राठी म्हणाले. आम्ही वाट पाहू लागलो. पाच मिनिटांनी एक साधारण पस्तीशीतला, मध्यम उंचीचा, सडपातळ बांध्याचा आणि साधासुधा असा वाटणारा चश्मेवाला माणूस खांद्यावरची पिशवी सावरत आत आला. पेहरावावरून हेच मराठे मास्तर असावेत, हे मी ओळखलं. त्यांनी राठींना अभिवादन केलं आणि ते खुर्चीत बसले. राठींच्या मागे खुर्च्या लावून आम्हीही तिथंच बसलो.

“मला बोलावलंत?” त्यांनी मऊ आवाजात विचारले.

“होय. थोडी चौकशी करायची होती, विक्रम सपकाळच्या खुनासंदर्भात. तिथे सर्वात आधी पोहोचणारे तुम्हीच होता ना?” राठींनी थेट मुद्द्याला हात घातला.

“होय.”

“इतक्या रात्री तुम्ही गावात कशासाठी गेला होता?” राठी.

“कशासाठी.. म्हणजे.. मी प्रवचनासाठी गेलो होतो, मारुती मंदिरात.” ते म्हणाले. पण प्रश्न ऐकून त्यांची झालेली क्षणिक गडबड आमच्या नजरेतून सुटली नाही. कदाचित त्यांना हा प्रश्न अपेक्षित नसावा.

“किती वाजता गेला होता?” राठी.

“रात्रीचं जेवण झाल्यावर, नऊच्या सुमारास.” मास्तर.

“आणि मंदिरातून निघाला किती वाजता?”

“निघालो.. अं.. साडेबारा वाजले असतील.” मास्तर आठवून म्हणाले.

“पूर्ण तीन तास मंदिरातच होता?”

“हो.”

“मंदिरातून थेट वाडीचा रस्ताच पकडला, की आणखी कुठे थांबला होता?” राठी.

“नाही.. थेट.... घराकडेच निघालो.” ते चश्मा सावरत म्हणाले..

“नक्की का?” राठींनी थोडं गुरकावून विचारलं.

“होय. आणखी कुठे जाणार?” ते म्हणाले. त्यांचा चेहरा फिक्का पडला होता.

“बरं.. घरी येताना वाटेत कोणी दिसलं का?” राठींनी विचारले.

“नाही.. कोणीच नाही. थेट विक्रमच्या प्रेताजवळ पोहोचलो मी. दत्ताजीही होता तिथंच.” मास्तर.

राठी थोडे थांबले. मग त्यांनी पॉलीथीनच्या पिशवीत असलेला दगड काढून टेबलावर ठेवला.

“हा दगड ओळखता का?” राठी.

“हा.. हा विक्रमच्या खुनाच्या जागी पडलेला दगडच आहे का?” मास्तरांनी त्याला निरखून पाहत उलट विचारले.

“तुम्ही पाहिला होता का हा त्या जागी?” राठी.

“अं.. हो.. पाहिला तर होता.”

“तो हाच होता, हे खात्रीने सांगू शकता का?” राठी.

मास्तरांनी थोडा वेळ त्या दगडाला पाहिले.

“हाच होता बहुतेक.” ते म्हणाले.

“बहुतेक?”

“म्हणजे, त्यावेळी अंधारात एवढं लक्ष दिलं नाही मी.”

“जर तुम्ही लक्ष दिलं नव्हतं, तर मी न सांगता हा विक्रमच्या खुनाचा दगड आहे, हे कसं ओळखलं तुम्ही?“

“मी.. मी तर फक्त अंदाज लावला.” मास्तर चाचपडत म्हणाले.

“बरं, तुम्ही पुढे गेल्यानंतर तुम्हाला राजाराम भेटला, बरोबर?”

“बरोबर.”

“तो कुठून येत होता?”

“तो नुकताच त्याच्या शेतातून बाहेर येत होता.”

“त्याच्या वागणुकीत काही वेगळेपण जाणवलं का? तो धापा टाकत होता, किंवा उत्साहीत झाला होता, भेदरला होता असं काही?”

“तसं काही मला नाही वाटलं.”

“हं.” त्यांच्यावर रोखलेली बारीक नजर हटवून अल्फाकडे पाहात राठी म्हणाले,”तुला काही विचारायचंय का?”

अल्फाने केवळ एकच प्रश्न विचारला,

“तुम्ही ही जी पिशवी आणली आहे, ती त्या रात्रीही मंदिरात सोबत घेऊन गेला होता का?”

ते ऐकून मी, संजय आणि राठी, तिघांनीही विचित्र नजरेने अल्फाकडे पाहिलं. मराठे मास्तरही हा ‘गटात न बसणारा’ प्रश्न ऐकून चक्रावले.

“अं.. काय?” त्यांनी विचारले.

“मी विचारलं, की तुम्ही ही पिशवी त्या रात्रीही सोबत नेली होती का?”

“हो हो.. माझ्या चश्म्याची केस, पाण्याची बाटली वगैरे किरकोळ सामान या पिशवीत असतं. ती मी सोबतच घेऊन फिरतो. परवा रात्रीही माझ्यासोबत होतीच ही.”

“ठीक आहे. धन्यवाद!” अल्फा म्हणाला.

“या आता तुम्ही. काही लागलं तर बोलावतो.” राठी म्हणाले. जरासे चाचरतच मराठे मास्तर निघून गेले. पाचदहा मिनिटांत आमचा दुसरा संशयित आला.

“बस, राजाराम.” राठी आमच्या समोर उभ्या असलेल्या हट्ट्याकट्ट्या तरुणाला म्हणाले. तो तिशीच्या आतलाच असावा. अंगावर साधे कपडे होते, केस काळे आणि घनदाट होते. शेतात राबून अंग चांगलेच पिळदार बनलं होतं. त्याच्या नजरेला धार होती.

“काय झालं साहेब? अचानक बोलावलं?” तो बसत म्हणाला.

“होय. विक्रमच्या खुनाच्या रात्री काय घडलं होतं हे पुन्हा एकदा तुझ्या तोंडून आम्हाला ऐकायचंय.” राठी म्हणाले. राजारामने आमच्याकडे पाहिले.

“हे सांगलीहून आलेत. साहेबांना शोधात मदत करायला.” संजयने आमची ओळख करून दिली. राजारामने हलकेच मान डोलावली आणि तो म्हणाला,

“ठीक आहे, सांगतो. मी त्या रात्री माझ्या शेतात गेलो होतो…”

“इतक्या रात्री?” राठी मध्येच म्हणाले.

“होय. शेताला पाणी सोडायला गेलो होतो.” राजाराम.

“किती वाजता गेला होतास?” राठी.

“अकरा साडेअकराला असेन गेलो.”राजाराम.

“तू नेहमी रात्रीच जातोस का शेताला पाणी द्यायला?” राठी.

“होय. रात्री अर्धा एक तास शेताला पाणी सोडायचं आणि परत घरी यायचं, हे माझं रोजचं काम आहे.” राजाराम.

“एकटाच जातोस?” राठी.

“होय, मग? घरातल्या सगळयांना घेऊन थोडीच जाणार आहे!” एकामागोमाग एक प्रश्न येऊ लागल्याने तो थोडासा चिडला,”झाले तुमचे प्रश्न? सांगू का मी पुढची हकिकत?”

“बरं सांग.”

“मी माझं काम आटपून घराकडे निघालोच होतो, तेवढ्यात मला मराठे मास्तर गावाकडून जोरजोरात सायकल चालवत येताना दिसले. मी त्यांना थांबवून विचारलं, की काय झालंय. त्यावर ते म्हणाले, की दत्ताजीने विक्रमला डोक्यात दगड घालून ठार मारलंय. तो या रस्त्यावरच पुढे उभा आहे. मला ते ऐकून धक्काच बसला. मी त्यांना वाडीतल्या लोकांना घेऊन येण्यास सांगितलं आणि स्वतः दत्ताजीच्या दिशेने गेलो. तो तिथंच उभा होता, घाबरून घट्ट झाला होता. मी पहिला विक्रमला पाहिले, मग दत्ताजीजवळ गेलो. त्यानं पिऊन ठेवलीय, हे मला लक्षात आलं आणि मी त्याला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न केला. थोड्या वेळात लोक गोळा झाले. पुढचं तुम्हाला माहितच आहे.”

“तू विक्रमला पाहिलंस तेव्हा त्याच्यापाशी तो खून झालेला दगडही होता का?”

“होय, तिथं बाजूलाच पडला होता.”

“तो हाच होता का?” समोरच्या दगडाकडे बोट दाखवत राठींनी विचारलं. राजारामने भुवया जवळ आणून त्या दगडाकडे पाहिलं.

“हाच असणार ना. तुम्हीच घेतला आहे तिथून. आणि यावर रक्त वगैरेपण लागलंय. ते रक्त विक्रमचंच आहे का, ते तपासून घ्या एकदा.” तो फार विचार न करता म्हणाला.

“ते आम्हाला सांगू नकोस. तू फक्त एवढंच सांग, की तो दगड तू नीट पाहिला होतास का? असशील, तर तो हाच होता की नाही?” राठी.

“आता तिथं एक मुडदा पडलाय आणि एक खूनी समोरच उभारलाय. मग अशा वेळी मी तो दगड काय आहे, कसा आहे, हे बघत बसू का सांगा तुम्हीच.”

“म्हणजे तू नक्की सांगू शकत नाहीस, की तो दगड हाच होता की नाही ते.” राठी.

“नाही बुवा.” राजाराम म्हणाला.

राठींच्या चेहऱ्यावर हळूहळू निराशा दिसू लागली होती. त्याउलट अल्फा अगदी उत्सुकतेने सगळे ऐकत होता.

“माझ्यातर्फे शेवटचा प्रश्न.” राठी म्हणाले,”तू शेतातून बाहेर येत होतास, तेव्हा तुला मराठे मास्तर भेटले, असं तू म्हणालास. तेव्हा ते खरंच घाबरलेले होते का? त्यांचं घाबरणं नैसर्गिक वाटलं का?”

त्याने थोडा विचार केला.

“हां.. मला असं वाटलं खरं, की ते घाबरलेत. पण तिथं तसा अंधारच होता. चंद्राच्या प्रकाशात चेहऱ्यावरचे भाव कितीसे दिसणार! घाबरले असतीलही, किंवा नसतीलही!” तो म्हणाला. राठींनी एक सुस्कारा टाकला आणि अल्फाकडे पाहिलं. अल्फा पुढे होत म्हणाला,

“मला एकच प्रश्न विचारायचाय तुम्हाला, राजाराम. तुम्ही घालत असलेल्या सगळ्या पँटा अगदी अशाच आहेत का? आत्ता तुम्ही घातलीये तशा?”

मला क्षणभर असं वाटलं, की मीच काहीतरी चुकीचं ऐकतोय. पण राठी, संजय आणि राजारामच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून मला खात्री पटली, की मी तेच ऐकलं होतं, जे अल्फा बोलला होता. त्याचं डोकं ताळ्यावर तर होतं ना?

“अं.. हो.. हो..” राजाराम उत्तरला.

“सगळ्याच्या सगळ्या? परवाच्या रात्री तुम्ही जी पँट घातली होती तीसुद्धा?” अल्फा.

“होय. मी एकाच टेलरकडून सगळे कपडे शिवून घेतो. त्यामुळे माझ्या पँटा सगळ्या सारख्याच आहेत. पण.. पण तू हे का विचारतोयस?” राजारामने विचारले.

“काही नाही, सहजच.” अल्फा म्हणाला आणि त्याने त्याच्या डायरीत काहीतरी खरडलं.

“ये तू.” राठी म्हणाले आणि राजाराम गेल्यावर अल्फाकडे वळले,”तू काऽऽय विचारतोयस या लोकांना? म्हणजे, काहीतरी संदर्भ लागू दे ना!! तुला असे संशयितांना प्रश्न विचारायची सवय नसणार हे मला ठाऊक आहे, तरीपण?”

“मी विचारतोय, ते प्रश्न या केसला धरूनच आहेत, सर.” अल्फा हलकेच हसत म्हणाला.

“डोंबल माझं!” राठींनी हतबलपणे मान हलवली आणि समोर येऊन वाट पहात उभ्या असलेल्या बुटक्या माणसाला त्यांनी बोलावलं,

“ये रे, बस.”

अर्थातच तो संदीप साठे असणार होता. तो समोरच्या खुर्चीवर येऊन बसला. वर्णाने सावळा, बसक्या केसांचा, कृश म्हणता येईल असा तो माणूस होता. त्याच्या हालचालींत एकप्रकारचा बुजरेपणा होता. दत्ताजीने सांगितल्याप्रमाणे तो कोणाशी फार बोलत नसावा, हे त्याच्याकडे पाहूनच माझ्या लक्षात आलं. तो आमच्याकडे न पाहता खुर्चीवर बसला.

“काय संदीप, कसंकाय चाललंय?” राठींनी खुर्चीवर रेलून बसत विचारलं.

“चाललंय की साहेब.” तो म्हणाला. त्याच्या आवाजात आत्मविश्वासाची कमी होती. कदाचित त्याचे कारण त्याच्या व्यवसायामुळे वाटणाऱ्या कमीपणात असेल.

“आज मालकानं शेतावरून लवकर सोडलं का?” राठींनी विचारलं.

“नाही, मीच लवकर आलो. तुम्ही बोलावलंय असं सांगितलं मालकाला.” संदीप म्हणाला.

“बरं.. विक्रमच्या खुनाच्या रात्री तू गावात गेला होतास?”

“हो.”

“एवढ्या रात्री कुठं गेलेलास?”

“प्रवचनाला गेलेलो साहेब.. मंदिरात.”

“किती वाजता गेला होतास?”

“नऊ वाजता.”

“किती वाजेपर्यंत होतास तिथं?”

“साडेबारा-पाऊण वाजेपर्यंत होतो.”

“पूर्णवेळ तिथंच होतास?”

“होय.”

“मराठे मास्तर दिसले का तुला तिथं? किंवा येता जाता भेटले का?”

“अं.. इतकं नाही पाहिलं मी.” तो साशंक आवाजात म्हणाला.

“तू खुनाच्या ठिकाणी कसा पोहोचलास? आणि तिथं गेल्यावर काय केलंस?”

"मी मंदिरातून घरी निघालो आणि वाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर मला दत्ताजी आणि राजाराम काहीतरी जोरजोरात बोलताना दिसले. तिथं विक्रम खाली पडला होता आणि आजुबाजूला रस्त्यावर रक्त पसरलं होतं. नक्की काय घडलंय, हे समजून घेण्यासाठी मी त्या दोघांचं बोलणं ऐकण्याचा प्रयत्न करू लागलो, तेवढ्यात वाडीतून काही लोक तिथं पोहोचले आणि मला सगळा प्रकार कळला."

"तू विक्रमच्या प्रेताच्या जवळ गेला होतास का?"

"जवळ म्हणजे केवढ्या जवळ?"

"त्याला हात लावू शकशील एवढ्या जवळ."

"नाही साहेब. ते रक्त वगैरे बघून माझं जवळ जायचं धाडसच झालं नाही."

"म्हणजे तू विक्रमच्या प्रेताच्या जवळ गेलाच नाहीस?"

"नाही."

"मग तू ज्या दगडाने विक्रमचा खून झाला होता, तो दगडही पाहिला नसशीलच." राठींना या चौकशीतून काही निष्पन्न होणार नाही, असं वाटायला लागलं होतं.

"नाही साहेब. मी सगळा वेळ राजाराम आणि दत्ताजीकडेच बघत होतो." संदीप भावनाशून्य चेहऱ्याने म्हणाला.

"छान! मग तुला तर दगडाबद्दल विचारण्यात काही अर्थच नाही!" राठी वैतागून म्हणाले आणि मग ते अल्फाकडे वळले,"तू काही विचारणार असलास तर विचार बाबा!"

अल्फा जराही कंटाळला नव्हता. तो मघापासून डायरीत काहीतरी काहीतरी लिहून घेत होता. राठींनी संधी देताच त्याने विचारले,

"ती बाहेर उभी असलेली सायकल तुमचीच आहे काय?"

त्याने खिडकीतून बाहेर बोट दाखवले. बाहेर एक जुनी लेडीज सायकल उभी होती.

“होय, माझीच आहे.” संदीप म्हणाला.

“खून झालेल्या रात्री तुम्ही तीच सायकल घेऊन गावात गेला होता का?” अल्फा.

“होय.” संदीप.

“ठिकाय. धन्यवाद!”

मला वाटतच होतं, की अल्फा पुन्हा काहीतरी असंबद्ध प्रश्न विचारणार. माझी अपेक्षा त्याने मुळीच फोल ठरू दिली नाही. संदीप गेला आणि चिडलेले राठी आमच्यावर ओरडलेच,

“झाली चौकशी तुमच्या मनाप्रमाणं? काहीही स्पष्ट झालं नाही यातून!! नुसता माझा वेळ वाया गेला. सगळ्यांची जबानी एकमेकांशी जराही विसंगत नाहीये. असं वाटतंय की सगळे खरंच बोलतायत. माझा तर तुमच्या त्या ‘दगडा'च्या कथेवरून विश्वासच उडू लागलाय. आणि त्यात तू एकावर एक विचित्र प्रश्न विचारत चाललायस! नक्की काय हवंय तुला?”

“शांत व्हा, शांत व्हा राठीसाहेब. तुमचा वेळ मुळीच वाया गेलेला नाहीये.” अल्फा म्हणाला,”आपल्याला बरंच काही महत्त्वपूर्ण मिळालंय या चौकशीतून.”

“काय महत्त्वाचं मिळालंय? या सर्वांनी जे सांगितलं, ते आपल्याला आधीपासूनच ठाऊक होतं!” राठी म्हणाले.

“होय, पण आता त्यांनी ते स्वतः पोलीस स्टेशनमध्ये येऊन चार लोकांच्या समोर स्वतःच्या तोंडाने सांगितलंय. त्यामुळे आता त्यांनी सांगितलेलं सगळंकाही खरंच आहे, हे आपल्याला तपासून पहायचं आहे आणि जर ते खोटं निघालं, तर आपण त्यांना कायद्याच्या कात्रीत पकडू शकतो.”

अल्फाचे म्हणणे त्यांना पटल्यासारखे वाटले. ते जरा नरम झाले.

“बरं बरं.. मी यात माझा यापेक्षा अधिक वेळ देऊ शकत नाही. तुम्ही म्हटल्याप्रमाणे मी तिघांनाही बोलावून चौकशी केली आहे. यातून मार्ग कसा काढायचा आणि पुढे काय करायचं, हे तुमचं तुम्ही बघा!” ते अंग काढून घेत म्हणाले.

“पुढे काय करायचं, हे मला व्यवस्थित ठाऊक आहे, सर.” अल्फा मंदपणे हसत म्हणाला. त्याच्या डोळयांत एक वेगळीच चमक मला दिसत होती.

आम्ही बाहेर पडलो तेव्हा पश्चिमेकडून मावळत्या सूर्याची तांबूस किरणे आमच्या डोळयांवर पडत होती. अल्फाने संजयला सांगितले, की त्याला काही गोष्टींचा शोध घ्यायचा होता आणि त्यासाठी त्याचं गावातच थांबणं आवश्यक होतं. संजय त्यासाठी तयार झाला आणि त्याने आम्हाला त्याच्या घरीच थांबण्याची विनंती केली. मला पुन्हा सांगलीतील आमच्या खोलीवर जायचा पर्याय होताच. पण मी गावातच थांबायचं ठरवलं. तसं केल्याने मला अल्फाच्या जवळ राहता आलं असतं आणि त्याचा शोध कोणत्या दिशेने चालू आहे, याबद्दल नियमित अपडेट्स मिळाल्या असत्या.

पण दुसऱ्याच दिवशी माझ्या लक्षात आले, की माझा समज किती चुकीचा होता. संध्याकाळी आम्ही वाडीतील संजयच्या घरी गेलो. रात्री जेवण झाल्यानंतर अल्फा ‘जरा बाहेर जाऊन येतो’ असे म्हणून जो गेला, तो आम्ही झोपल्यानंतर मध्यरात्री कधीतरी परतला. दुसऱ्या दिवशी मी उठून पाहतो, तर अल्फा पुन्हा गायब! आम्ही उठायच्या आधीच तो पुन्हा कुठेतरी पसार झाला होता (तो रात्री आला तरी होता की नाही, अशी शंका माझ्या मनात काही वेळासाठी येऊन गेली). त्याला फोन लावला, मेसेज केला तरी काही उत्तर नाही. माझ्या लक्षात आलं, की अल्फा आता त्याच्या ‘मोहीमे’वर होता. प्रत्येक प्रकरणामध्ये असा एक टप्पा यायचा, जिथे अल्फाला अधिक माहितीची गरज असायची. अशा वेळी तो तहानभूक विसरून दिवसदिवस घराबाहेर असायचा. आणि या मोहीमा अशा होत्या, की जेव्हा त्याला कोणीही सोबत नको असायचं. त्यामुळे तो कुठे आहे, काय करतोय, हे मला सांगण्याचे कष्ट न घेता अदृश्य व्हायचा.

त्यामुळे आता तो रोजच्यारोज छानपैकी एका जागी बसून मला सगळं सविस्तर सांगेल, ही अपेक्षा मी सोडून दिली होती. माझ्या दृष्टीने आयुष्य फारच रिकामं होतं. सुट्टी सुरु असल्याने करायला विशेष असं काहीच नव्हतं. संजयसोबत राहून मी गावाकडचं अनोखं वातावरण अनुभवत होतो. तसं माझं कोणा नवीन व्यक्तीशी पटकन जुळत नाही, पण संजय आणि त्याच्या घरातील लोक हे मनानं फारच साधे आणि मोकळया प्रवृत्तीचे होते. त्यामुळे त्यांच्यासोबत दोन दिवस राहताना मला कधी अवघडल्यासारखं वाटलं नाही. अर्थात, दत्ताजीच्या अटकेचं सर्वांवर दडपण होतंच. पण मी आणि अल्फा त्यांना या प्रकरणात मदत करायला सांगलीहून आलो, या गोष्टीचा त्यांना एकप्रकारे आदर होता. संजयने मला त्यांचं शेत दाखवलं, गाव आणि आजुबाजुचा परिसर फिरवून आणला. तिथली मोकळी हवा आणि ताजंतवानं वातावरण यांमुळे माझं मन खुपच प्रसन्न झालं.

विक्रमच्या खुनाचा विचार तर सतत डोक्यात चालू होताच. संजय आणि मी त्याबद्दल चर्चा करायचो आणि काही नवे धागे मिळतायत का, हे अजमावून पहायचो. पण अल्फासारखं बसल्याजागी झपाझप तर्क रचणं आम्हाला काही जमलं नाही. एवढंच काय, त्या दिवशीच्या पोलीस स्टेशनमधील चौकशीमधून काय निष्पन्न झालं, हेही अजून आम्हाला कळालं नव्हतं. त्यात अल्फाच्या विचित्र प्रश्नांनी राठींसारखे आम्हीही बुचकळयात पडलो होतो. पण अल्फाच्या मनात काहीतरी आराखडा तयार झाला होता, हे नक्की. त्यानुसारच तो काम करत होता आणि गुन्हेगाराचा माग काढत होता.

दुसऱ्या दिवशी रात्री झोपण्याआधी मी त्याला पुन्हा एकदा मेसेज केला,

“अरे आहेस कुठे तू? कधी येतोयस घरी?’

रिप्लाय येईल, अशी माझी अपेक्षा नव्हती, पण आश्चर्यकारकरीत्या तो आला,

‘मोहीमेवर आहे प्रभू. तुम्ही झोपा. रात्री उशिरा येईन. ‘

‘तपासात काही प्रगती?’ त्या संधीचा फायदा उठवून मी पुन्हा मेसेज केला. काही वेळ त्याचा रिप्लाय आला नाही. मग अचानक माझा फोन वाजला. अल्फाने रिप्लाय केला होता-

‘फार प्रगती अशी नाही. पण तीन महत्त्वाच्या गोष्टी कळाल्यात. पहिली – त्या रात्री संदीप साठे मंदिरात होता, पण तो कधी गेला हे कोणीच पाहिले नाही. दुसरी - राजाराम खुनाच्या वेळी नक्की शेतातच होता की नाही, याला कोणताही ठोस पुरावा नाही. आणि तिसरी – मराठे मास्तरांनी पोलीस स्टेशनमध्ये जे सांगितलं, ते खोटं आहे’!!

*

# 6.

पुढचा पूर्ण दिवस अल्फाचा तो मेसेज वारंवार माझ्या मनात घोळत राहिला. तीन संशयित होते आणि तिघांकडेही खून करण्यासाठी मुबलक संधी उपलब्ध होती. त्यात जे मराठे मास्तर खोटं बोलत होते, असं अल्फा म्हणाला, ते तर फारच धक्कादायक होतं. त्यांच्यासारख्या साधासरळ दिसणाऱ्या माणसाने असं का करावं? ते जर खोटं बोलत असतील, तर खून झालेल्या रात्री ते नक्की कुठं होते? आणि काय करत होते? अखेर तिसऱ्या दिवशी रात्री जेवणाच्या वेळी अल्फा संजयच्या घरी परतला आणि हे सगळे प्रश्न त्याला विचारण्याची मला घाई झाली. तो खूपच थकलेला वाटत होता. त्याचा चेहरा घामाने आणि धुळीने पार कळकट झाला होता. पहिला आम्ही एकत्र बसून जेवण केले. आल्यापासून जेवण होईपर्यंत अल्फा काहीच बोलला नाही. त्याच्या मनात कसलेतरी विचारचक्र जोराने फिरत होते, हे त्याच्या चेहऱ्यावरून दिसत होतं. जेवण झाल्यावर आम्ही अंगणातल्या खाटेवर येऊन बसलो. त्या अंगणात दिवा नव्हता. त्यामुळे आम्हाला एकमेकाला पहायला चंद्राचा हलका प्रकाशच काय तो उपलब्ध होता. नोव्हेंबरचा महिना असल्याने कडाक्याची थंडी पडली होती आणि हवेत थोडं थोडं धुकं पसरू लागलं होतं. आम्ही तिघेही स्वेटर घालून तिथे बसलो.

“तू काल मेसेजमध्ये..” मी अल्फाला माझ्या मनातले साठून राहिलेले प्रश्न विचारायला निघालो होतो, पण अल्फाने केवळ हात वर करून मला थांबायला सांगितले.

“थांब.. थांब..” तो संथ आवाजात म्हणाला,”बऱ्याच वेळापासून मी एका धाग्यावर विचार करतोय आणि ते करता करता मी आता बऱ्याच खोलात आलोय. आत्ता काही विचारून माझी विचारांची साखळी तोडू नकोस. लवकरच मी सर्वकाही उलगडून सांगेन.“

ते ऐकून आम्ही दोघेही खट्टू झालो. आम्हाला अल्फाचे गेल्या तीन दिवसांचे संशोधन कधी एकदा ऐकतो, असं झालं होतं. पण अल्फाचा आत्ता काहीतरी वेगळाच मूड होता. तो खाटेवर न हलता शांतपणे बसून राहिला. कदाचित त्याने डोळे मिटले असावेत आणि तो त्याच्या ‘त्या धाग्या’वर पुन्हा विचार करू लागला असावा. मी पुन्हा अंधारात पाहू लागलो. तेथील शांतता म्हणजे खरंच भयाण म्हणता यावी, अशी होती. आत्ता केवळ रात्रीचे दहा वाजले होते, पण तरीही सर्वत्र सामसूम होती. त्या वाडीत राहणारे जेवढे लोक होते, ते आता आपापल्या घरात होते. बाहेर रस्त्यावर कोणीच नव्हतं. मी आणि संजय काहीच न बोलता अल्फाने मौन सोडण्याची वाट पाहू लागलो. अचानक माझा फोन वाजला आणि तेथील शांततेचा भंग झाला. मी पहिला तर दचकलोच. तो माझ्या आईचा फोन होता. मी या प्रकरणात भाग घेतल्यापासून घरी फोन लावायचे विसरूनच गेलो होतो. मी अपराधी भावनेने फोन उचलला आणि तिची माफी मागितली. मी पुढे एकदोन वाक्यं बोलतो न बोलतो, तोच बाजूने एकदम कोणीतरी धडपडत पळत गेल्याचा आवाज आला. मी धक्का बसून तिकडे पाहिलं. तिथून अल्फा गायब झाला होता!

“तो एकदम उठला आणि त्या दिशेने पळत गेला.” संजय माझ्याकडे पहात म्हणाला,”मला कळालंच नाही त्याला काय झालं ते.”

आम्ही दोघंही काही क्षण काय करावं, हे न सुचून तिथंच खिळून राहिलो. मला तर काहीच कळेना. या अल्फाला काय झालं एकदम?

“चल, आपल्याला त्याला शोधायला हवं.” अखेर मी फोन ठेवत म्हणालो आणि अल्फा ज्या दिशेने गेला, तिकडे धावलो. संजयही माझ्या मागोमाग आला. अल्फा घराजवळच्या रस्त्याकडे

गेला होता. आम्ही रस्त्यावर आलो आणि दोहोबाजुंना पाहिले. तो कुठेच नव्हता. माझी छाती धडधडू लागली. रस्त्यावर दिवे नव्हते आणि सर्वत्र कुट्ट अंधार होता.

“कुठं गेला तो?” संजयने विचारले. त्याचा आवाजही भेदरल्यासारखा वाटत होता. आम्ही चंद्राच्या प्रकाशात जेवढं दिसत होतं, तेवढ्यात अल्फाला शोधण्याचा प्रयत्न करू लागलो.

रस्त्याच्या बाजूने सगळया घरांची कुंपणे होती आणि त्यामागची घरं अंधारात गुडूप झाली होती. थंडगार वाऱ्याची एखादी झुळूक अधुनमधून येत होती आणि ती अंगावर शहारे आणत होती. त्या वाडीत तुरळकच घरं होती आणि त्यापुढे सर्व बाजूंनी उंच वाढलेले शेत होते. अल्फा तो लोकवस्तीचा परिसर सोडून बाहेर गेला असला, तर त्याला शोधणं खुपच अवघड जाणार होतं. शिवाय अशा एकाकी जागी असलेले धोके वेगळेच..

“तो नेहमी असेच करतो का?” कापऱ्या स्वरात संजयने विचारले.

“नाही.. मीपण हा प्रकार पहिल्यांदाच पाहतोय.” मी जोरात मान हलवत म्हणालो. थंडीपासून बचाव करण्यासाठी मला जोरात श्वास घ्यावा लागत होता.

“त्याला वेडाचा झटका तर आला नसेल ना? तो मघापासून जास्तच विचार करतोय, असं मला वाटत होतं.” संजय म्हणाला. मला तो विचार वेडगळ वाटला. अल्फाला कसलाही झटकाबिटका येणं शक्यच नव्हतं. त्याला काहीतरी सुचलं होतं, कदाचित तो आल्यापासून ज्या ‘धाग्या’बद्दल बोलत होता, तो जुळून आला होता! पण म्हणून असं अचानक धावत सुटावं? मला काळजी वाटू लागली. विक्रमचा खूनी अजूनही मुक्त फिरत होता. आम्ही त्याचा माग काढतोय, हेही एव्हाना त्याच्या लक्षात आलं असणार होतं. तो अंधारात कुठेतरी दबा धरून बसला नसेल ना? अल्फावर निशाणा साधून.. विक्रम सारखंच…!!

“अल्फा!!” मी त्याला हाक दिली. त्या शांततेत माझा आवाज मला फार मोठा भासला. प्रत्युत्तर आलं नाही.

आम्ही जोरात पावले टाकत चालू लागलो. कोणत्या दिशेला जायचे, हेच आमच्या लक्षात येईना. तो गावाच्या दिशेने पळत गेला असावा का? की वाडीतल्या घरांच्या दिशेने गेलाय? कसा माग काढावा त्याचा? त्याला एवढ्या रात्री थंडीत कोणाला भेटायला जायचं होतं??

थंडीमुळे माझ्या संवेदना हळूहळू कमी होत चालल्या होत्या. आम्ही वळलो आणि गावाच्या दिशेने चालू लागलो. कदाचित अल्फा पोलीस स्टेशनला गेला असावा. हीच एक योग्य वाटणारी शक्यता होती. आम्ही काही पावले चालतो न चालतो, तोच मागून आम्हाला कोणाचातरी हाक मारण्याचा आवाज आला. आमचे पाय जागीच खिळून राहिले. पण तो आवाज ऐकून माझा मात्र जीव भांड्यात पडला.

“इकडे इकडे.” अल्फा वाडीत जाणाऱ्या रस्त्याकडून आमच्याकडेच येत होता. आम्ही वळून धावतच त्याच्याकडे गेलो.

“अरे काय झालं काय? केवढं घाबरवलंस!! कुठे गेला होतास अचानक?” मी विचारले. तो चांगलाच धापा टाकत होता.

“ते नंतर सांगतो. संजय, तुझ्या घरची बाईक काढ पट्कन! आपल्याला पोलीस स्टेशनला जायचंय, तुझ्या काकाला भेटायला. आत्ता लगेच!”

“होय होय, आलोच.” असं म्हणून संजय पळतच गेला. अल्फाने माझ्या खांद्यावर हात ठेवला आणि तो जोरजोरात श्वास घेत राहिला.

“काहीतरी भन्नाट शोध लागलाय तुला. बरोबर बोलतोय ना मी?” मी विचारले.

“खूपच भन्नाट! या प्रकरणाला संपूर्णपणे कलाटणी मिळण्याची वेळ आली आहे असं मला वाटायला लागलंय, प्रभू.”

“असं काय मिळालंय तुला अल्फा? किती सस्पेन्स ठेवशील लेका! एका शब्दात तरी सांग..” मी अधीरतेने म्हणालो.

“धुकं!! धुकं प्रभू, धुकं!!” अल्फा मला गदागदा हलवत म्हणाला,”या एका शब्दावर आपण पोहोचेपर्यंत विचार कर. बघ काही लक्षात येतंय का!!”

ते ऐकून मी विचारांच्या भोवऱ्यात सापडलो. धुकं? धुक्यात काय ठेवलंय असं? अल्फा बाहेर धुकं बघायला गेला होता??

संजय त्याची बाईक घेऊन आला. ती बरीच जुनी होती. आम्हाला तिघांना ती पेलवू शकेल की नाही, याबाबत मी साशंक होतो. त्याने गाडी सुरू केली आणि मोठ्या कष्टानेच ती गाडी आम्हा तिघांना घेऊन पुढे पळू लागली. मी संजय आणि अल्फाच्या मध्ये बसलो होतो. त्यामुळे समोरून आणि आजुबाजुने येणाऱ्या थंड वाऱ्यापासून माझा बचाव होत होता. आम्ही ती वाडी मागे सोडली आणि पुढे नजरेच्या पल्ल्याच्या पलीकडे जात असलेल्या त्या सुनसान, एकाकी रस्त्यावरती आलो. दोन्ही बाजुला घनदाट शेतं होती आणि अखंड रस्त्यावर चिटपाखरूही नव्हतं. निशाचर पक्ष्या-प्राण्यांच्या आवाजाने मधूनच तेथील शांतता भंग होत होती. वाऱ्याचा कानांवर फडफडाट होत होता. आम्ही शेतांमधून निघून त्या मधल्या ओसाड जमिनीच्या पट्ट्यात आलो. इथेच तीन दिवसांपूर्वी विक्रमचा खून झाला होता. मी वळून तो परिसर नीट पाहिला. रात्री त्या भागाला एक वेगळीच छटा आली होती. चंद्राचा प्रकाश जणूकाही वातावरणातले गूढ अजूनच वाढवत होता. सर्व वातावरण चमत्कारिक, मंतरलेलं वाटत होतं. आणि त्यात होतं ते हलकं, बेचैन करणारं धुकं..

काय आहे त्या धुक्याचं रहस्य??

आम्ही गाडीचा फटफट आवाज करत पोलीस स्टेशनपाशी पोहोचलो. अल्फा उडी मारून उतरत आतमध्ये धावलाच. आम्हीही गाडी लावून पळत गेलो.

“एऽऽ एऽऽ.. कोण, कुठं??” आम्ही आत शिरताच तिथे असलेल्या दोन पोलीसांपैकी एकजण आमच्यावर ओरडला.

“संजय, त्यांना सांग, आम्हाला राठी साहेबांनी पाठवलंय. अल्फा लॉकअप रूमकडे जाता जाता म्हणाला. संजय मागं थांबला आणि मी आणि अल्फा आत गेलो. तिथे दत्ताजी जमिनीवर साधे पांघरूण लपेटून मुटकूळे करून झोपला होता.

“दत्ताजी! दत्ताजी!! उठा दत्ताजी!!” अल्फा तुरुंगाच्या गजांवर धडाधड हात आपटत ओरडला. दत्ताजी त्या आवाजाने खडबडून जागा झाला आणि इकडेतिकडे पाहू लागला. आम्ही त्याला हात केला. मी तिथे बाजूला असलेला दिवा लावला.

“तुम्ही..?? इतक्या रात्री??” तो डोळे मोठे करुन टकामका आमच्याकडे पाहू लागला.

“मला तुम्हाला अत्यंत महत्त्वाचं काही विचारायचंय. तुम्ही पूर्णपणे जागे झाला आहात का?” अल्फाने विचारलं. दत्ताजीने डोळे चोळले आणि तो म्हणाला,

“होय होय.. मी व्यवस्थित जागा आहे. काय विचारायचंय तुम्हाला?”

आमच्या मागे संजय आणि तो पोलीसही आला. आम्ही अल्फा काय विचारतोय, ते पाहू लागलो.

“ त्या रात्री तुम्ही मागे वळल्यानंतर विक्रमचा खून झालाय, हे तुमच्या लक्षात आलं. तुम्ही म्हणालात, की त्यानंतर तुम्ही मदतीसाठी ओरडू लागला, बरोबर? मला सांगा, तुम्ही तसं का केलंत?”

अल्फाचा प्रश्न ऐकून दत्ताजी गोंधळला.

“म्हणजे?” त्याने विचारलं.

“म्हणजे, तुम्ही हाका मारून मदत का मागितलीत?”

“हाका.. अं..” दत्ताजीला आणि आम्हालाही अल्फाच्या प्रश्नाचा रोख लक्षात येत नव्हता.

"मला म्हणायचंय की, तुम्ही मोबाईल वापरता ना? मग ओरडून मदत मागण्यापेक्षा तिथल्यातिथं गावातल्या किंवा वाडीतल्या लोकांना एक फोन का नाही केला?"

दत्ताजी कसून आठवण्याचा प्रयत्न करू लागला. अचानक त्याच्या चेहऱ्यावर चमकल्याचे भाव आले.

"कारण.. कारण…" तो म्हणाला, आणि त्याचे वाक्य अल्फाने पूर्ण केले,

"कारण तुमच्या खिशातून मोबाईल गायब झाला होता!!"

दत्ताजीचे डोळे विस्फारले गेले होते आणि तो एकटक अल्फाकडे बघत होता. आमचेही श्वास त्या वाक्यामुळे रोखले गेले.

"तुम्ही विक्रमला मेलेला पाहताच कुणालातरी फोन करून बोलावण्यासाठी खिशात हात घातला होता, पण तुमचा मोबाईल खिशात नव्हताच! त्यामुळे तुम्ही रस्त्यावर किंवा आजुबाजुला कोणी दिसतंय का, हे पाहण्यासाठी ओरडू लागलात. बरोबर बोलतोय ना मी?" अल्फाने विचारले.

"होय होय... बरोबर आहे. माझा मोबाईल नव्हता माझ्या खिशात.." दत्ताजी म्हणाला.

"पण हे कसं शक्य आहे? पोलीस जेव्हा काकाला घेऊन जात होते, तेव्हा त्यांनी त्याच्या सगळ्या वस्तू आमच्याकडे सोपवल्या होत्या. त्यात त्याचा मोबाईलसुद्धा होता." संजय म्हणाला.

"कोण होता तो पोलीस?" अल्फाने विचारले.

"मीच होतो तिथं." आमच्या मागं उभारलेला हवालदार म्हणाला,"त्या रात्रीही माझीच नाईट ड्युटी होती. मला वाडीतून फोन आला आणि मी लगेच तिथं पोहोचलो."

"तुम्हाला तो मोबाईल कुठे मिळाला होता?" अल्फा.

"तिथे रस्त्यावर पडला होता. विक्रमच्या डेडबॉडीजवळ."

“दत्ताजी, तुम्हाला तुमचा मोबाईल असा पडल्याचं वगैरे आठवतंय का?” अल्फाने दत्ताजीकडे वळून विचारले.

“नाही. माझा मोबाईल नेहमी माझ्या पँटेच्या खिशात असतो. तो खाली पडणं शक्य नाही. खुनाच्या जागी तर तो नक्कीच पडला नव्हता.” दत्ताजी उत्तरला.

“तुम्ही त्या धाब्यावरून निघाला तेव्हा तुमच्याकडे तो होता का?” अल्फाने विचारले. दत्ताजी विचारात पडला.

“आठवत नाही?” अल्फाने पुन्हा विचारले. दत्ताजीने थोडा वेळ घेऊन कबूल केले.

“नाही आठवत.. घेतलेला असायला तर पाहिजे..”

“बुल्स आय!!” अल्फा उत्साहाने चित्कारत म्हणाला,”तुम्ही तेथून निघताना तुमच्याकडे मोबाईल नव्हताच, दत्ताजी! तो गायब झाला होता. विक्रमचा खून होईपर्यंत तो तुमच्यापाशी नव्हता आणि अचानक खून झाल्यानंतर तो तिथे अवतरला!”

दत्ताजीने असह्य होऊन केस उपटले. आमच्यावरही तीच वेळ आली होती.

“या सगळयाचा नक्की अर्थ काय?” त्याने विचारले.

“सांगतो.” अल्फा संजयकडे वळला,”त्याआधी एक काम कर संजय. आत्ता लगेचच्या लगेच तुझ्या घरी फोन लाव आणि तुझ्या बाबांना सांग, की दत्ताजींचा मोबाईल जिथे कुठे ठेवलाय, तिथून उचलून एका प्लॅस्टिकच्या पिशवीत घाला आणि कपाटात सुरक्षित ठेवा. त्यावर गुन्हेगाराचे फिंगरप्रिंट्स आहेत!”

हे सगळंच अद्‌भुत आणि अनाकलनीय पद्धतीनं घडत होतं. अल्फाने हे सगळं कसं शोधून काढलं आणि तो एवढ्या खात्रीशीरपणे कसं सांगतोय, हेच आम्हाला कळत नव्हतं. संजयने गडबडून घरी फोन लावला आणि अल्फाच्या सूचनेप्रमाणे सांगितलं.

“दत्ताजी, तुम्ही स्वतःच्या पायावर कितीदा धोंडे मारून घेतलेत, याची तुम्हाला कल्पनासुद्धा नाहीये!” अल्फा म्हणाला,”चुटकीसरशी सुटणारं प्रकरण तुम्ही दुर्लक्ष केल्याने एवढं किचकट होऊन बसलंय. गुन्हेगाराने तुमच्या डोळयांदेखत कितीतरी गोष्टी केल्या आणि त्याचा तुम्हाला थांगपत्ताही लागला नाही! गुन्हेगार चालाख आहे, खूपच चालाख! पण हरकत नाही. मीही शेरास सव्वाशेर आहे!! बसा सगळेजण, मी त्या रात्री नक्की काय घडलं ते सांगतो.”

अल्फाने तिथेच जमिनीवर बसकण मारली. मी आणि संजय बाजूला बसलो. पोलीसमामाही अल्फाचे म्हणणे रस घेऊन ऐकू लागले.

“आपण त्या वेळेपासून सुरूवात करू, जेव्हा दत्ताजी आणि विक्रम एकाच वेळी त्या धाब्यात बसले होते. माझ्या अनुमानानुसार गुन्हेगारही त्याच धाब्यात अथवा त्याच्या आजूबाजूला कुठेतरी बसला होता. त्याचा विक्रमला मारण्याचा प्लॅन पक्का होता आणि तो विक्रम तेथून निघण्याची वाट बघत होता. एकदा का विक्रम गावातून बाहेर पडून वाडीकडच्या रस्त्यावर गेला, की मग गुन्हेगार आपलं काम फत्ते करणार होता. पण अनपेक्षितपणे त्याच्या योजनेत दोन अडचणी निर्माण झाल्या. पहिली म्हणजे दत्ताजींनी विक्रमला सोबत देऊ केली आणि तिथं गडबड झाली. गुन्हेगाराचा विक्रमला पहिल्यापासून दुरूनच मारण्याचा कट होता. रस्त्यावर चुकून कोणी उगवलं, तर आपण रंगेहाथ पकडले जायला नको, असा त्याने विचार केला असावा. पण तरीही दत्ताजीं सोबत असताना असं करणं म्हणजे रिस्क होती. पण दत्ताजींनीही थोडी प्यायलेली असल्याने गुन्हेगाराने ती रिस्क घेतली.

आणि, त्याच्यासमोर उद्भवलेली दुसरी अडचण म्हणजे- धुकं! विक्रमला दुरून मारायचं झालं, तर तो व्यवस्थित दिसायला तर पाहिजे! गुन्हेगाराने धुकं हा घटक प्लॅन करताना लक्षातच घेतला नव्हता. पण जशीजशी रात्र होईल, तसंतसं धुक्याचं अस्तित्व जाणवू लागलं आणि यावर काहीतरी उपाय करायला हवा, हे त्याच्या लक्षात आलं. त्याचवेळी धाब्यातून दत्ताजीला विक्रमसोबत निघताना पाहून त्याला एक अफलातून कल्पना सुचली. दत्ताजींचं विक्रमसोबत असणं आपल्या फायद्याचं ठरू शकतं, हे त्याच्या ध्यानात आलं. त्यानं ज्या वेगाने हा सगळा विचार

केला, त्याची खरंच दाद दिली पाहिजे. ते दोघं बाहेर पडायच्या आधी गुन्हेगाराने दत्ताजींचा मोबाईल हस्तगत केला. हातचलाखीने की कसं, ते ठाऊक नाही. पण केला. त्यानंतर तो या दोघांच्याही पुढे गेला आणि त्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या शेतात जाऊन लपून बसला.

इकडे दत्ताजी आणि विक्रम हळूहळू चालत वाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावरून येत होते. रात्रीचे साडेबारा वाजून गेले होते आणि रस्त्यावर कोणीच नव्हतं. खून करण्यासाठी अतिशय अनुकूल परिस्थिती तयार झाली होती. शेतात लपून विक्रमवर नेम धरायचा आणि त्याला यमसदनाला धाडायचं, हा बेत आधीपासूनच ठरला होता. त्यासाठी एक मुद्दाम घासून टोकदार बनवलेला दगड आणि रबरासारखी एखादी वस्तू, कदाचित लगोर, हे सगळं गुन्हेगारानं आधीच सोबत घेतलं होतं.

विक्रम ठरलेल्या जागी येऊन पोहोचला. दत्ताजी थोडं पुढे होते. अपेक्षेप्रमाणं हवेत धुकं चढलं होतं आणि रस्त्यावरचा विक्रम गुन्हेगाराला अस्पष्ट दिसत होता. त्यावेळी त्याने दत्ताजींचा फोन काढला आणि त्यावरून विक्रमला फोन लावला. आपला फोन वाजतोय, हे विक्रमच्या लक्षात आलं आणि त्याने फोन खिशातून काढून कानाला लावला. बस्स! हेच गुन्हेगाराला हवं होतं. त्याने फोनमधून येणाऱ्या प्रकाशाच्या बाजूला नेम धरला आणि दगड थेट विक्रमच्या डोक्यात घुसला. विक्रम जमिनीवर कोसळला. खून यशस्वी झाला..

त्या ठिकाणी असलेले दत्ताजी एकप्रकारे त्या खुनात फसले होते. खुनीने त्यांना अजून खोलवर फसवायचं ठरवलं. तो त्या शेतातून बाहेर पडला आणि सोबत एक मोठा दगड घेऊन विक्रम जिथे पडला होता, तिथे आला. त्याने कोणाच्या नकळत तो दगड तिथे रक्तात टाकला, दत्ताजींचा मोबाईल बाजूला टाकला आणि मूळचा दगड उचलला. काम संपलं. कुणालाही संशय नाही, कुणालाही काही वेगळं घडल्याचा थांगपत्तासुद्धा लागला नाही!!”

आम्ही सगळे ते ऐकून निःशब्द झालो होतो. त्या रात्री इतक्या सगळ्या घटना घडल्या असतील, हे कुणाच्या स्वप्नातसुद्धा येणं शक्य नव्हतं. अल्फाने तो प्रसंग आमच्यासमोर एखाद्या चित्रपटासारखा उभा केला होता आणि ते ऐकून आम्ही थक्क झालो होतो.

“हे सगळं तुला आपण मघाशी अंगणात बसलो होतो तेव्हा सुचलं का?” संजयने विचारले.

“सगळं नाही. काही भाग मला आधी लक्षात आला होता. तू मला त्या दिवशी धुक्याबद्दल सांगितल्यानंतर मी त्यावर थोडा विचार केला. पण बाकीच्या शोधात मी त्या मुद्द्याला फारसं महत्त्व दिलं नव्हतं. पण जेव्हा अंगणातील अंधारात मी प्रभवला फोनवर बोलताना पाहिलं, तेव्हा मला एक ब्रेनवेव्ह आली – असंही असू शकतं! एकदा विक्रमचा फोन चेक करून याची खात्री करून घेणं आवश्यक होतं मी पळतच विक्रमच्या घरी गेलो. तिथे त्याच्या भावाकडून त्याचा फोन मागितला आणि त्यावरची कॉल हिस्टरी पाहिली. त्यावर बरोबर तीन दिवसांपूर्वी, रात्री बारा वाजून सदतीस मिनिटांनी एक फोन आला होता – हीच ती खून झाल्याची वेळ! माझा तर्क बरोबर ठरला. मला अपेक्षा होती, की खुनीने स्वतःच्या फोनवरूनच फोन केला असावा. पण तो माझ्या अपेक्षेपेक्षा जास्तच हुशार निघाला. त्यावर आलेला फोन दत्ताजीच्या नंबरवरून आला होता. म्हणजेच, खुनाच्या वेळी दत्ताजीचा फोन गुन्हेगाराकडे होता! दत्ताजी म्हणाले होते, की विक्रम मेलाय, हे लक्षात आल्यानंतर मी मदतीसाठी तिथे हाका मारू लागलो. मग मला क्लिक झालं, की मोबाईल खिशात नाही, हे समजल्यानंतरच त्यांनी हाका मारायला चालू केलं असणार आहे. आणि अशा वेळी मोबाईल कुठे गेला, काय झालं, हे कोणीच बघत बसणार नाही. थोडक्यात, मला तो शेवटचा धागा मिळाला!”

“तीन दिवसांनंतर माझ्या मोबाईलवर गुन्हेगाराचे फिंगरप्रिंट्स शिल्लक असतील का?” दत्ताजीने विचारले.

“जर कोणी घासूनपुसून त्याला साफ केलं नसेल, तर ते असायलाच पाहिजेत!” अल्फा म्हणाला,”खून कसा झाला, हे आपल्याला कळालं असलं, तरी तो कोणी केला हे अजूनही

गुलदस्त्यात आहे. मला खात्री आहे, की ते नाव बाहेर येण्यासाठी आपल्याला फार वाट पहावी लागणार नाही. प्रभू आणि संजय, तुम्ही दोघांनी उद्या एक काम करायचंय. मी तुम्हाला तीन लेटर्स तीन लिफाफ्यांत घालून देतो. तुम्ही उद्या सकाळी लवकर मराठे मास्तर, राजाराम आणि संदीप या तिघांच्या घरी जायचं आणि प्रत्येकाची सही घेऊन यायचं."

"कसले लेटर्स?" संजयने विचारले.

"दत्ताजी सातपुते यांच्यावरचा गुन्हा सिद्ध झाला आहे आणि घटनास्थळी सर्वात पहिला पोहोचणारे साक्षीदार म्हणून त्यांची सही मागणारं ते लेटर आहे." अल्फा म्हणाला.

"आंऽ! काय बोलतोयस काय तू!!" दत्ताजीला धक्काच बसला.

"काळजी करू नका. आतला सगळा मजकूर म्हणजे भंकस आहे. आपल्याला काय महत्त्वाचं असेल, तर ते म्हणजे त्या तिघांचे फिंगरप्रिंट्स!! चला, खूप काम झालं आज. थोडी झोप घेऊ. पोलीसमामा, इतक्या रात्री तसदी दिल्याबद्दल क्षमस्व आहे. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद!!" अल्फाने विषय गुंडाळून टाकला. तरीही आम्ही सर्वजण त्याच्याकडे पाहतच राहिलो होतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी नऊच्या सुमारास अल्फाने आमच्या हातात तीन लिफाफे ठेवलेसुद्धा होते. इतक्या लवकर त्याने मजकूर टाईप करून प्रिंट वगैरे कुठून करून घेतली, हे मला शेवटपर्यंत एक कोडंच राहिलं. सकाळच्या बोचऱ्या थंडीत मी आणि संजय एक एक करून आमच्या तिन्ही संशयितांच्या घरी जाऊन आलो. मराठे मास्तरांनी दार उघडलं, फार काही न बोलता सही केली आणि पुन्हा दार लावून घेतलं. राजारामने त्याउलट बरीच चौकशी केली. कसलं लेटर, कशासाठी हवंय, आता गुन्हा सिद्ध झाला म्हणजे पुढं काय होणार वगैरे वगैरे. त्याच्या प्रश्नांना उत्तरे देताना आमची पुरेवाट झाली. पण अखेर त्याने आम्हाला सही दिली. त्यानंतर आम्ही गेलो

संदीप साठेच्या घरी. त्याने आम्हाला आत बोलावलं, पाणी वगैरे विचारलं. पण फार चौकशा न करता सही देऊन टाकली. आम्ही संजयच्या घरी परत आलो तेव्हा अल्फा म्हणाला,

“भले शाब्बास! मला आता सांगलीला जावं लागेल. ते लिफाफे आण इकडं, अगदी जपून न्यावं लागेल त्यांना. शिवाय मी दत्ताजींचा मोबाईलही घेतला आहे. आता माझ्या ओळखीच्या ठसेतज्ञाचे घर गाठतो आणि या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावून टाकतो! तुम्ही असं करा, संध्याकाळी बरोबर सहा वाजता पोलीस स्टेशनमध्ये या. मी तिथंच तुम्हाला भेटेन.”

अल्फा सांगलीला निघून गेला आणि आज या केसचा निकाल लागणार, हे आमच्या ध्यानात आलं. आम्ही दिवसभर अस्वस्थपणे वाट बघत राहिलो. अल्फा खऱ्या खुनीला पकडण्याच्या जवळ पोहोचला आहे, हे कळताच संजयच्या घरच्यांना आश्चर्य वाटलं आणि संजयच्या वडीलांनी संध्याकाळी आमच्यासोबत पोलीस ठाण्यात यायचं ठरवलं. दुपारी जेवण करून आम्ही एक झोप काढली. संध्याकाळी साडेपाच वाजता उन्हे कलण्याच्या वेळी आम्ही घरातून चालतच बाहेर पडलो. पोलीस स्टेशनमध्ये काय होणार हाच विचार मनात घोळत असल्याने मला संजयच्या घरापासून ते ठाण्यापर्यंतचे अंतर चालत पार करताना जराही दमल्यासारखं झालं नाही. ठाण्यात एका टेबलापाशी सब इन्स्पेक्टर राठी आणि अल्फा चर्चा करत बसले होते. आम्हाला पाहताच राठी म्हणाले,

“या या. सातपुते साहेबपण आलेत वाटतं. बसा. संजय, तुझा हा सांगलीतून आलेला मित्र भारीच आहे बरं का! त्याची विचार करायची पद्धत एकदम आगळीवेगळी आहे! त्यानं या खुनाचा असा काही शोध घेतलाय, की त्यातले सगळे फासेच पलटले आहेत. दत्ताजी सुटणार, असं आता मलाही वाटायला लागलंय. तुम्ही इथे बसा. आपण आता वाट पाहुया. गुन्हेगार इकडंच येत असेल.”

आम्ही बसलो आणि वाट पाहू लागलो. सहा वाजून दहा मिनिटं झाली तरी कोणीच आलं नाही. अल्फाच्या चेहऱ्यावर सहजपणाचे भाव होते. आमची नजरानजर झाल्यानंतर त्याने

हलकेच एक स्मित केले. एकदम बाहेर कोणीतरी ठाण्याच्या पायऱ्या चढत असल्याचा आवाज आला. क्षणभरच. आम्ही श्वास रोखून पाहू लागलो.

आणि पुढच्याच सेकंदाला संदीप साठे आतमध्ये शिरला.

*

# 7.

“ये संदीप.” राठी म्हणाले,”बस.”

संदीपनं तिथे जमलेल्या गोतावळ्याकडे पाहिलं आणि तो जरा गडबडला. त्याला इथे बोलावण्याचा आमचा उद्देश त्याच्या लक्षात आला आहे की नाही, हे काही मला त्याच्या चेहऱ्यावरून कळालं नाही. त्याचा चेहरा तसाच बुजलेला, सर्वांपासून नजर चुकवणारा होता. तो आखूड पावले टाकत राठींच्या टेबलासमोर आला आणि खुर्चीत बसला.

“काय.. झालं साहेब? परत बोलावलंत..” तो बारीक आवाजात म्हणाला.

“होय. त्यादिवशी तुला एक प्रश्न विचारायचा राहिलाच अरे. म्हणून परत बोलावलं.” राठी म्हणाले.

“क.. कोणता प्रश्न?” आता मात्र त्याच्या चेहऱ्यावर संशय आणि भिती स्पष्ट दिसून आली.

“हाच, की तू रात्रीच्या वेळी मगदुमांच्या शेतात बसून दूर उभ्या असणाऱ्या विक्रमवर एवढा अचूक नेम कसा काय मारलास?” राठींनी थेट विचारले. संदीप ते ऐकून भेदरला. पण स्वतःला सावरत तो म्हणाला,

“मगदुमांच्या शेतात.. कधी? तुम्ही काय म्हणताय.. हे मला कळत नाहीये..”

"कळत नाहीये? बरोबर आहे. तुला ते आता आठवतसुद्धा नसणार, नाही का? मी आठवण करून देतो." राठी म्हणाले,"चार दिवसांपूर्वी वाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर मध्यरात्रीच्या सुमारास विक्रमचा खून झाला. दत्ताजी सातपुते तिथे उपस्थित असल्यामुळे त्यानेच तिथे पडलेल्या दगडाने विक्रमचा खून केला, असा आरोप त्याच्यावर लागला. पण मुळात खून त्या दगडाने झालाच नव्हता. खून तर तिथून काही अंतरावर असलेल्या शेतातून आलेल्या एका लहान टोकदार दगडाने झाला होता. आणि तो दगड तिथून फेकणारा दुसरातिसरा कोणी नसून तूच होतास, संदीप साठे!"

"नाही! मी तर त्यावेळी मंदिरात होतो, प्रवचन ऐकत होतो." संदीप म्हणाला. तो आता बराच सावरला होता आणि त्याने बचाव करायचा पूर्ण निर्धार केला होता, असं दिसत होतं.

"कोण बसलं होतं तुझ्या आजुबाजूला?" राठी.

"मी लोकांच्या गर्दीत बसत नाही साहेब. मी मागे मंदीराचे जे दार आहे, त्याच्या आडोशाला बसतो. माझ्या आजुबाजूला कोणीच नव्हतं. सगळे पुढे बसले होते."

"व्हेरी गुड. म्हणजे तुझ्याकडे कोणताही पुरावा नाही, जो सांगेल की तू मंदिरात होतास."

"तिथं मला पाहिलेले बरेच लोक असतील, साहेब. तुम्ही नीट चौकशी केली नसेल."

"मस्त पिंजून पिंजून चौकशी केली आहे. तू साडेबारा-पाऊण वाजेपर्यंत मंदिरात होतास, असं गेल्या वेळी म्हणाला होतास. पण तुझ्या या स्टेटमेंटला ठोसपणे पुष्टी देणारा एकही माणूस आम्हाला मिळाला नाही. कारण तू तिथं एवढा वेळ नव्हतासच. तू मंदिरात गेला होतास, बरोबर, पण तिथून अकरा वाजताच बाहेर पडलास आणि तिथून थेट लक्ष्मी धाब्याकडे गेलास…"

"नाही हे खोटं…" संदीपने काही बोलण्याचा प्रयत्न केला, पण राठींनी आवाज मोठा करून त्याला चूप केले,

“... लक्ष्मी धाब्यावर तू विक्रमवर तासभर नजर ठेवलीस. अखेर सव्वाबाराच्या सुमारास विक्रम उठला. पण दत्ताजीही त्याच्या सोबत येण्याची चिन्हे दिसू लागली. मग तू चालाखी केलीस आणि दत्ताजीचा मोबाईल चोरलास.”

मोबाईलचा विषय निघताच संदीप एकदम फिक्का पडला. त्याच्या तोंडून शब्द फुटणे बंद झाले.

“काय, बरोबर बोलतोय ना मी?” राठींनी गुरकावून विचारलं. संदीपने काहीच उत्तर दिलं नाही. राठी पुढे म्हणाले,”तू असं केलंस, कारण हवेत धुकं पडायला लागलं होतं आणि अशात तुला शेतातून रस्त्यावर नेम धरता येईल की नाही, याबद्दल शंका वाटू लागली होती. पण तुझा हा डाव पूर्णपणे यशस्वी झाला. तू पुढे गेलास आणि शेतात लपून राहिलास, विक्रम आल्यानंतर त्याला दत्ताजीच्या मोबाईलवरून फोन लावलास आणि त्या फोनच्या प्रकाशावरून तू त्याला टिपलंस. एका दगडात दोन पक्षी मेले – विक्रमचा खुनही झाला आणि दत्ताजीवर आळही आला. आता तुला दोनच गोष्टी करायच्या होत्या – एक म्हणजे तो लहान टोकदार दगड तिथून काढून टाकायचा होता, जेणेकरून तो लांबून मारलाय, असा कोणाला संशय येऊ नये, आणि त्याजागी एखादा मोठा दगड ठेवून द्यायचा होता. आणि दुसरी म्हणजे दत्ताजीचा मोबाईल तिथंच जवळपास टाकायचा होता. कदाचित तुझ्या आधी मराठे मास्तर आणि राजारामचं तिथं येणं तुला अपेक्षित नव्हतं. पण तुझ्या सुदैवाने त्या दोघांनीही तिथे पडलेला दगड नीट पाहिला नाही. मग राजाराम आणि दत्ताजी बोलत असताना हळूच मागच्यामागे तू या गोष्टी केल्यास. या दोन्ही गोष्टी करून तू सगळया पुराव्यांपासून मुक्तता मिळवलीस. पण एक पुरावा तर तू मागे सोडलासच – तो म्हणजे दत्ताजीच्या मोबाईलवरचे फिंगरप्रिंट्स! आम्ही ते तपासलेत आणि तुझ्या फिंगरप्रिंट्सबरोबर ते मॅच झाले आहेत.“

राठींनी आपलं बोलणं संपवलं आणि विजयी मुद्रेने ते संदीपकडे पाहू लागले. संदीप खचला होता, पण त्याने हार मानलीये, असं मला वाटत नव्हतं.

“माझे फिंगरप्रिंट्स त्याच्यावर असणारच ना साहेब. मी तिथं पोहोचलो, तेव्हा माझ्या पायाला तो मोबाईल लागला होता. तो मी हाताने बाजूला सरकवला होता, जेणेकरून त्यावर कोणी पाय वगैरे देणार नाही. त्यावरून मी त्याचा मोबाईल चोरला, त्याला फोन लावला, हे तर सिद्ध होत नाही ना!”

त्याच्या त्या वाक्याने तिथे एकदम सन्नाटा पसरला. राठीसाहेब जरासे गोंधळले. संदीप लेचापेचा नाहीये आणि त्यानं खुपच हुशारीने डाव पलटवला आहे, हे त्यांच्या लक्षात आलं. अखेर अल्फाने या संभाषणात प्रवेश केला आणि तो सहज, पण  आत्मविश्वासपूर्ण आवाजात म्हणाला,

“संदीप, तुम्ही चौकशीच्या दिवशी जी सायकल आणली होती, तीच घेऊन खून झालेल्या रात्री गावात गेला होता, असं तुम्ही सांगितलं होतं ना?”

“होय.” संदीप म्हणाला. अल्फा पुढे म्हणाला,

“ती लेडीज सायकल आहे, जिला पुढे वस्तू ठेवण्यासाठी कॅरिएज आहे. तुम्ही चौकशीला येऊन गेल्यानंतर तुमच्या नकळत मी एकदा येऊन त्या कॅरिएजचं निरिक्षण केलं होतं. त्यावरच्या मेटलचे टवके उडाल्याचं माझ्या लक्षात आलं. आतल्या मेटलच्या चकाकीवरून ते एकदोन दिवसांपूर्वीच उडाले आहेत, हे स्पष्ट दिसत होतं. त्याचे फोटो मी काढून घेतले आहेतच. मी निश्चितपणे सांगू शकतो, की तुम्ही विक्रमच्या प्रेताजवळचा लहान दगड बदलण्याच्या हेतुने शेतातून निघताना एक मोठा दगड घेतला आणि तो त्या कॅरिएजमध्ये टाकून घटनास्थळी आणला. मग तिथून लहान दगड उचलून हा मोठा दगड तिथं ठेवून दिला. मोठा दगड आणताना सायकलला बसलेल्या हादऱ्यांमुळे कॅरिएजचं काही मेटल निघालं. अर्थात, तुम्ही असंच म्हणणार, की ते टवके दगडामुळंच पडलेले आहेत, हे सिद्ध होत नाही. त्यात दुसरं काहीतरी ठेवल्यामुळे ते पडलेत. मी तो दगड मायक्रोस्कोपखाली तपासून पाहिला आणि त्यावर हलकेसे मेटलचे कण मिळालेत, आणि तुमच्या सायकलच्या कॅरिएकजचं जे मेटल आहे, त्याच्याशी ते तंतोतंत जुळताहेत.

बरं, आता तुम्ही हे म्हणणार, की माझ्यासारख्या सायकली बऱ्याच जणांकडे आहेत आणि त्यांवर वापरलेलं मेटलही माझ्या सायकलसारखंच आहे. मग ते कण माझ्याच सायकलवरचे कशावरून? ठिकाय, तुम्ही तिथे टाकलेल्या दगडाचं सोडा. आपण तुम्ही तिथून उचललेल्या दगडाकडे वळूया. तो तर तुम्ही उचलून तुमच्या खिशात टाकला असणार, कारण आजुबाजूला टाकला असता, तर तो कोणाच्यातरी नजरेला पडण्याची भीती होती. त्यामुळे त्या दगडावरचं रक्त तुमच्या खिशाला लागलेलं असणार. आता तो खिसाच सिद्ध करेल, की गुन्हेगार तुम्हीच आहात."

अल्फाचे बोलणे ऐकून संदीपवर काहीच फरक पडला नाही. उलट तो जास्तच धीट झाल्यासारखा वाटला.

"ठीक आहे. तुम्ही घरी येऊन माझ्या सगळ्या पँटा आणि शर्ट घेऊन जाऊ शकता. एकाही खिशात तुम्हाला रक्ताचा थेंबही मिळणार नाही." संदीप म्हणाला. त्याच्या बचावाला एक वेगळाच आत्मविश्वास आला होता. पण अल्फाचे मंद स्मित पाहून तो आत्मविश्वास क्षणात कोलमडून पडला.

"तुमचे कपडे घेऊन जाण्याची परवानगी दिल्याबद्दल धन्यवाद. आमचं काम तुम्ही खुपच सोपं केलंत." अल्फा म्हणाला,"मला ठाऊक आहे संदीप, की तुम्ही घरी गेल्या गेल्या तुम्ही तो खिसा स्वतःच्या हातांनी स्वच्छ धुवून चकाचक केला आहे. जो गुन्हेगार एवढं परफेक्ट प्लॅनिंग करत असेल, त्याने रक्त असलेले कपडे तसेच सोडून देणं शक्यच नाही, हे मला ठाऊक आहे. पण मला अजून एक गोष्ट ठाऊक आहे, जी तुम्हाला ठाऊक नाही."

संदीप चरकून पाहू लागला. अल्फा म्हणाला,

"तुम्ही ल्युमिनॉल या सोल्युशनचं नाव ऐकलं आहे का? तुमचा चेहराच सांगतोय, की तुम्ही हे नाव कधीच ऐकलं नाही. खून झालेल्या ठिकाणी पडलेल्या रक्ताच्या डागांचा अभ्यास

करण्यासाठी या सोल्युशनचा वापर करतात. हे सोल्युशन एखाद्या वस्तूवर स्प्रे केले आणि त्या वस्तूवर आधी कधीतरी रक्त पडलं असेल, तर ते रक्तातील हिमोग्लोबीनमधल्या लोहासोबत रिॲक्ट होतं आणि निळा रंग तयार होतो. तुमच्या दुर्दैवाने, जर रक्त पडलेली वस्तू स्वच्छ धुतली जरी असेल, तरीही तिच्यावर ल्युमिनॉल टाकताच तिचा रंग निळा होईल. कारण धुतल्यानंतर रक्ताचा केवळ रंग निघून जातो, पण त्यातील हिमोग्लोबीन आणि लोहाचे सूक्ष्म कण काही प्रमाणात वस्तूवर तसेच राहतात. तुम्ही आम्हाला तुमचे कपडे पहायची परवानगी दिली आहेच. आता फक्त एवढंच सांगा, की त्यातले कुठले कपडे तुम्ही खून झाल्याच्या रात्री घातले होते. त्यांच्या खिशांवर आम्ही ल्युमिनॉल टेस्ट करू. जर एकाही खिशात निळा रंग तयार झाला, तर त्याला रक्त लागलं होतं आणि ते नंतर धुण्यात आलं, हे सिद्ध होईल. मग पुढे तुम्हाला आणखी स्पष्टीकरण द्यायचे असेल, तर ते द्यायला तुम्ही मोकळे आहातच."

अल्फाने आपलं बोलणं संपवलं. संदीप आमची नजर चुकवून खाली पाहात होता. त्याच्या हातांना आणि पायांना हळूहळू कापरं भरू लागलं होतं. इतके सगळे पुरावे आपल्या विरोधात गेल्यानंतर आपण यातून सुटू शकणार नाही, याची बहुधा त्याला हळूहळू खात्री होऊ लागली होती. पराभव झाल्याचीही एक भावना त्याच्या चेहऱ्यावर दिसत होती.

"तुम्ही खुपच हुशार आहात, संदीप. खून केल्यानंतर इतक्या बारीकसारीक गोष्टींचा तुम्ही विचार केला, हे पाहून मी थक्क झालो होतो. पण दुर्दैवाने, जितक्या बारकाईने मी विचार करतो, तितका तुम्ही करू शकला नाही!!" अल्फा म्हणाला. पुढच्याच क्षणी, काय होतंय हे समजायच्या आत संदीप उठून दरवाजाकडे धावला. पण राठींनी दरवाजाबाहेर दोन पोलीसांना आधीच तैनात करून ठेवले होते. त्यांनी संदीपला पकडले आणि त्याला बेड्या ठोकल्या. तो निसटण्यासाठी पाच मिनिटे झटपट करत होता, पण अखेर त्याने शरणागती पत्करली.

"यू आर अंडर अरेस्ट, संदीप साठे!" राठी म्हणाले. संदीप मटकन गुडघ्यांवर बसला आणि त्याला रडू फुटले.

“तो.. तो नीच होता..” तो हुंदके देत म्हणाला,”त्याची माझ्या बायकोवर नजर होती.. नराधम होता तो… गेल्या महिन्यात दोनदा त्यानं तिची छेड काढली होती. दारूच्या नशेत नाही नाही ते बोलला होता. संतापाने माझ्या अंगाची लाही लाही झाली होती… म्हणून मी त्याला संपवलं.. मारून टाकलं त्याला!!”

“त्याने तुझ्या बायकोची छेड काढलेली असताना तू ठाण्यात तक्रारसुद्धा नोंदवली नाहीस? का?” राठींनी विचारलं.

“कारण त्यामुळे तो फारफार तर तुरुंगात गेला असता.. पण नाही… त्याला ती शिक्षा खूप कमी आहे.. त्याच्यासारख्या दुष्ट माणसाला मृत्यू हीच खरी शिक्षा आहे! त्याच्यासारख्या तमाम स्त्रीलंपट आणि निर्लज्ज लोकांना कळायला पाहिजे, की एका स्त्रीची कदर केली नाही, तर त्याचा काय परिणाम होतो ते!”

“अशा लोकांना शिक्षा व्हायलाच पाहिजे संदीप, तुमचं बरोबर आहे, पण ती शिक्षा द्यायला आपली न्यायव्यवस्था समर्थ आहे!” अल्फा म्हणाला,”कोणाला काय शिक्षा द्यायची, हे ठरवण्याचा अधिकार तुम्हाला नाही. मलाही नाही. तो अधिकार कायद्याकडे आहे. त्यासाठीच तर कायदेव्यवस्था अस्तित्वात आली आहे. कोणताही गुन्हा आढळताच तो पोलीसांच्या लक्षात आणून देणं, हे प्रत्येकाचं कर्तव्य आहे. पण तुम्ही त्याचं उल्लंघन केलंत. विक्रमला शिक्षा ही मिळणारच होती. पण तुम्ही कायदा हातात घेतल्यामुळे तुम्ही स्वतःही गुन्हेगार ठरलात. आता शिक्षा तुम्हालाही होणार.. जी थोडा विचार केल्याने टाळता आली असती.”

हवालदार संदीपला लॉकअपमध्ये घेऊन गेले. दत्ताजी सातपुतेची निर्दोष मुक्तता झाली. अर्थात, पुढच्या कोर्टकचेऱ्या होऊन हे सगळं व्हायला काही महिने गेलेच. संजयने दत्ताजीने आणि त्यांच्या परिवाराने अल्फाचे पुन्हा पुन्हा आभार मानले. नवीन वर्ष सुरू व्हायच्या वेळेला त्यांनी आम्हाला घरी जेवायला बोलावलं आणि खमंग चवदार पदार्थ खाऊ घातले. सब इन्स्पेक्टर राठींचे प्रमोशन होणार असल्याची बातमी आम्हाला नंतर समजली. त्यांनीही संजयकडून अल्फाचा नंबर

मिळवून त्याचे आभार मानले आणि गरज असेल तेव्हा मदत करत राहण्याची विनंती केली. संजयच्या घरून जेवण करून येत असताना मी अल्फाला म्हणालो,

“तू चौकशीच्या वेळी त्या तिघांना विचारलेल्या चित्रविचित्र प्रश्नांचा असा अर्थ होता तर!”

अल्फा हसला.

“सरळच गोष्ट होती ती नाही का प्रभू. तुम्हाला ते विचित्र का वाटलं, हे मला कळालंच नाही. गुन्हेगाराने खून झालेला दगड बदललाय, हे आपल्याला ठाऊक होतं. मग तो बदलण्यासाठी दुसरा मोठा दगड त्यानं सोबत घेऊन यायला हवा ना! तो दगड कोणाला आणि कसा आणणं शक्य होतं, हे मी अजमावून पाहात होतो. मास्तरांकडे पिशवी होती, ज्यात तो दगड मावला असता. राजारामच्या पँटेचे खिसे बरेच मोठे होते आणि तो म्हणाला, की त्याच्या सगळया पँटा तशाच आहेत. त्यामुळे तो दगड खिशात लपवून आणू शकला असता. आणि संदीपकडे सायकल होती, ज्याला पुढे कॅरिएज होतं. थोडक्यात, तिघांपैकी कोणीही तो दगड तिथे घेऊन येऊ शकत होतं.”

“ओह्.. अच्छा..” मी म्हणालो,”बाय द वे, ते ल्युमिनॉल सोल्युशनचा वापर करणं एकदम भन्नाट होतं बरं का! मला माहिती नव्हतं, की असं काही असतं ते.”

“म्हणून मी म्हणत असतो, अभ्यास सोडून दुसरी पुस्तकं वाचत जा!” अल्फा थोडा थांबला आणि म्हणाला,”तुला ठाऊकाय का, मला बऱ्याच आधीपासून अंदाज होता, की खूनी संदीपच असावा म्हणून.”

“ते कसंकाय?”

“कारण दत्ताजीने आपल्याला सांगितलं होतं, की संदीप काहीसा आलिप्त असा माणूस आहे. तो फार लोकांशी बोलत नाही, लोकांच्यात मिसळत नाही. त्यामुळे लोकही त्याच्याकडे फार लक्ष देत नसणार, किंवा फारसं त्याला ओळखत नसणार. म्हणजे, त्याला कोणीही फार दखल न घेता मंदिरातून किंवा कुठूनही येणं जाणं तुलनेनं सोपं होतं. याचमुळे तो लक्ष्मी धाब्याचा मालकही

संदीप तिथे आलेला असला, तरी त्याला ओळखू शकला नसता. पण तेच जर मराठे मास्तर किंवा राजाराम त्या धाब्यात आले असते, तर त्यानं पटकन ओळखलं असतं आणि आपल्याला सांगितलंही असतं."

"असं आहे तर.." मी म्हणालो आणि मला एकदम आठवलं,"अल्फा, तू तर मला म्हणाला होतास, की मराठे मास्तर खोटं बोलताहेत! म्हणजे त्यांनी मी मंदिरात होतो असं सांगितलं, पण ते मंदिरात नव्हते. मग ते नक्की कुठं होते? आणि त्यांनी ते आपल्याला का नाही सांगितलं?"

माझ्या त्या प्रश्नावर अल्फा खदखदून हसला. मी त्याचं हसणं संपण्याची वाट पहात राहिलो. अखेर तो म्हणाला,

"मराठे मास्तर त्यावेळी त्यांच्या प्रेयसीला भेटायला गेले होते!!"

"काय?? मराठे मास्तरांना गर्लफ्रेंड आहे??" मी उडालोच. तो साधाभोळा चेहरा आणि दया येईल असा पोषाख आठवून मला अल्फाच्या सांगण्यावर विश्वासच बसेनासा झाला. अल्फा अजून हसला.

" तिला 'गर्लफ्रेंड' म्हणता येईल की नाही, ठाऊक नाही. ती त्यांचीच एक विद्यार्थीनी आहे. गावातलीच आहे. नुकतंच तिचं कॉलेज पूर्ण झालंय. मास्तर आणि तिच्यात चांगलं दहा बारा वर्षांचं अंतर असेल. मास्तर अजूनही अविवाहितच आहेत. गावातले लोक हे पचवून घेतील की नाही, या भीतीने ते दोघं रात्रीच्या वेळी लपूनछपून भेटत असतात. जुळले असतील बंध, काय सांगावं! म्हणतात ना, प्रेमाला वयाचं अंतर नसतं!!"

ते ऐकून मीही हसलो. अल्फा म्हणाला,

"हसतोयस काय लेका! तुला तर लाज वाटायला पाहिजे! बघ, त्या पस्तीस वर्षांच्या मास्तराने पोरगी पटवली. आणि तू! अभ्यासाची पुस्तकं रद्दीत गेली म्हणून एवढंसं तोंड करून बसतोस! शिक त्यांच्याकडून काहीतरी!!"

मी अल्फाला एक गुद्दा लगावला. तो बराच वेळ जोरजोरात हसत राहिला...

माझ्या डायरीतलं ते 'द मूनलाईट मर्डर' प्रकरण अखेर वाचून संपलं आणि मी गालातल्या गालात हसतोय, हे माझ्या लक्षात आलं. आता अल्फाला फोन लावणं 'मँडेटरी' होतं.

"हॅलो अल्फा." अल्फाने फोन उचलताच मी म्हणालो.

"काय प्रभू, डायरीतलं 'मूनलाईट मर्डर' प्रकरण वाचून झालं वाटतं!" तो हसऱ्या आवाजात म्हणाला.

"देवाशप्पथ तुला हे सगळं कसं कळतं, हे मला अजूनही समजलेलं नाहीये!" मी ओरडलो.

"डायरी माझ्याकडेसुद्धा आहे, मित्रा! तुझ्यासारखी अगदी 'रोजनिशी' टाईप नसली तरीही माझ्या नोंदींची डायरी आहेच की! त्यात मी व्यवस्थित तारीखबद्ध लिहिलंय सगळं."

"ग्रेट आहेस तू!" मी हसून म्हणालो.

"बोल, कधी भेटतोयस." अल्फा म्हणाला.

"तू घेऊन ये एखादं इंटरेस्टिंग गूढ प्रकरण. आलोच मी!" मी म्हणालो. त्यावर अल्फा बोलला,

"लवकरच आणेन!!"

# समाप्त

कशी वाटली अल्फाची नवीन कथा?

प्रतिक्रिया कळवायला विसरू नका!!



सौरभ गणेश वागळे
एमटेक सेकंड इयर,
आयआयटी मुंबई, पवई,
मुंबई, 400076
Ph/ whatsapp : 8983234042
Mail : sourabhwagale@yahoo.com
Facebook: https://www.facebook.com/sourabh.wagale

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. सौरभ वागळे यांचं ई साहित्यवरचं हे पाचवं पुस्तक.**

सौरभ वागळे हे शिक्षण आणि व्यवसायाने इंजिनियर. आय आय टी मधल्या अभ्यासासोबतच त्यांनी आपला लेखनाचा छंद जोपासायचे ठरवले. आणि तोही केवळ करायचे म्हणून नाही. अत्यंत गंभीरपणे ते आपल्या लेखनाकडे पहातात. त्यांना येणाऱ्या सर्व अभिप्रायांवर ते विचार करतात. आपल्या लेखनावर मेहनत करून ते जास्तीत जास्त अपीलिंग व्हावे याचा ते प्रयत्न करतात. निव्वळ हौशी म्हणून नाही तर आज ना उद्या ते एक यशस्वी व्यावसायिक साहित्यिक बनणार आहेत. बनणारच आहेत. आताच त्यांच्या फ़ॅन्सची संख्या काही हजारांत आहे. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत.

नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, राजा कदम, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक आता येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान